
१९६२
सं. ठाणे
वारिम
१०२८

# अळूवरचं पाणी



REFBK-0012389

अ. ना. परांजपे

[illegible]
[illegible] ...৩২০২৫... দিঃ [illegible]
[illegible] ...৭০২৮... [illegible] ...২।৭।৫৮

॥ श्री ॥

# अळवावरचं पाणी

अ. ना. परांजपे

REFBK-0012389
REFBK-0012389

तीन रुपये

ग्रंथप्रकाशक व ग्रंथविक्रेते
श्रीराम प्रकाशन
ठाकुरद्वार, मुंबई २.

: प्रकाशिका :
**सौ. शैलजा भावे**
श्रीराम प्रकाशन,
ठाकुरद्वार, मुंबई २

प्रथमावृत्ति
मकर संक्रांत
१०।१।१९६२

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

: मुद्रक :
**मा. अ. मेहेंदळे**
जीवन मुद्रणालय,
५५१ बुधवार, पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 32024 वि: ५२१७
क्रमांक 9020 नों. दि: ३/५/६२

*प्रिय वाचक,*

माझे मित्र श्री. रंगनाथ कुलकर्णी यांनीं लिहायला लावलेली व '**वीणा**' मासिकाचे संपादक श्री. उमाकांत ठोंबरें व श्री. श्रीकृष्ण घोटगे, यांनीं हप्त्याहप्त्यानें '**वीणा**'मध्यें प्रसिद्ध केलेली ही माझी वृत्तपत्रीय जीवनकथा 'श्रीराम प्रकाशन' चे श्री. भावे यांनीं मनावर घेतल्यामुळें आज पुस्तकरूपानें तुमच्या हातीं पडत आहे. '**वीणा**'मध्यें ही लेखमाला येत असतां अनेक विद्वानांनीं व वृत्तपत्रें–साप्ताहिकें यांनीं तिचें कौतुक केलें. त्याचप्रमाणें मला प्रत्यक्ष भेटलेल्या अनेक मंडळींनीं, 'तुम्हीं फार चांगल्या शैलींत आपली कहाणी सांगितली आहे.' असें म्हणून मला उत्तेजन दिलें. म्हणून या सर्व मंडळींचे आभार मानण्याची ही संधी मी साधीत आहें. पुस्तकरूपानें प्रसिद्ध होणारी ही कहाणी वाचतांना, केवळ माझ्या बऱ्यावाईट अनुभवांकडेच केवळ न पहातां मी मधून मधून माझे जे सामाजिक व राजकीय विचार व्यक्त केले आहेत त्यांकडेहि वाचकांनीं लक्ष द्यावें एवढीच माझी विनंति आहे.

मकर संक्रांत
ता. १०।१।६२

आपला सर्वांचा
*अनंत नारायण परांजपे*

ग्रंथालय ठाणे
१२३८९

# अळवावरचं पाणी

माझें दुय्यम शिक्षण कै. वा. देशभक्त बाळूकाका कानिटकर सेवक सेवानंद यांच्या हाताखालीं चिंचवड ( जि. पुणें ) येथें त्यांच्या 'अनाथ विद्यार्थी गृहांत' व पुढें स्वावलंबन राष्ट्रीय पाठशाळेंत झालें. सन १९१७ ते १९२२ सालापर्यंत मी त्या शाळेंत होतों आणि तेथूनच पुण्याच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची 'प्रवेशपरीक्षा' पास झालों. छापखान्याच्या धंद्याचें आणि वृत्तपत्र व्यवसायाचें शिक्षणहि मी तेथेंच घेतलें. मराठी भाषेंत लेख, निबंध, गोष्टी, कविता लिहितां येण्यासाठीं आमचीं हस्तलिखित साप्ताहिकें व दैनिकें होतीं. १९२० सालीं लोकमान्य टिळक वारले तेव्हां आमच्या शाळेंतल्या 'आश्रम' नांवाच्या दैनिकाचा मी संपादक होतों. लोकमान्य टिळकांचा आजार वाढतांच बाळूकाका कानिटकर मुंबईस आले होते. त्यांच्याकडून लोकमान्यांच्या आजाराची रोजच्या रोज आम्हाला बातमी येत असे. ३१ जुलैची मध्यरात्र उलटल्यावर लोकमान्य टिळक स्वर्गवासी झाले. तेव्हां बाळूकाकांनीं लगेच आम्हाला तारेनें तें वृत्त कळविलें. सगळे मास्तर

आणि आम्ही मुलें जागतच बसलों होतों. लोकमान्यांच्या निधनाची बातमी समजतांच मी आणि माझे सहकारी संपादक खास शोकांक काढण्याच्या तयारीस लागून सकाळपूर्वी अंक लिहून तयार केला. 'गेला, गेला, हिंदुस्थानचा सूर्य मावळला, आर दिसेनासा झाला' अशी सुरवात करून मी लोकमान्यांबद्दलचा मृत्युलेख लिहिला होता.

१९२१ सालच्या एप्रिलमध्यें मी मॅट्रिकच्या वर्गांत गेलों. पण तोंपर्यंत आमची शाळा 'राष्ट्रीय शाळा' बनली होती. सरकारी विद्यापीठावर बहिष्कार पडून राष्ट्रीय असें 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठ' निघालें होतें. त्याचें माध्यम मराठीच असल्यामुळें आम्हाला मॅट्रिकचा अभ्यास तसा फारसा कठीण वाटत नव्हता. पण इंग्रजी हा विषय आमचा कच्चा होता. कारण सुरवातीच्या काळांत आमच्या इंग्रजी भाषा शिकण्याचे बाबतींत बरेच प्रयोग झाले होते. म्हणून शेवटच्या वर्षीं तरी आमचें इंग्रजी चांगलें सुधारावें यासाठीं आमचे इंग्रजीचे शिक्षक बाबा लिमये हे खूप मेहनत घेत. रोजच्या-रोज स्वतःच्या बुद्धीनें कांहीं तरी इंग्रजी लेखन आम्ही करावें असा त्यांचा आग्रह असे. म्हणून 'दि सन' या नांवाचें हस्तलिखित इंग्रजी दैनिक मी आणि दुसरे एक सहाध्यायी (वामन गणेश जोशी) असे आम्ही दोघांनीं मिळून सुरू केलें होतें.

अशा रीतीनें आम्हीं अभ्यासांतच जास्त डोकें घालण्याच्या सुमारास चरख्यावर सूत काढण्याचें काम आमच्या शाळेंत सुरूं झालें. त्यावेळच्या महात्मा गांधी–प्रणीत चळवळीचीं चरखा–खादी–राष्ट्रीय शिक्षण–कौन्सिलांवरील बहिष्कार–मद्यपान निषेध हीं सूत्रेंच होतीं. सूत कांतण्याला आमचा विरोध नव्हता पण त्यावर्षीं आमचा अभ्यास चांगला होणें आवश्यक असल्या-मुळें, मॅट्रिकच्या वर्गांतील आम्हां विद्यार्थ्यांवर रोज सूत कांतण्याची सक्ति होऊं नये एवढेंच आमचें म्हणणें होतें. पण शाळेच्या चालक बोर्डानें आमचें म्हणणें ऐकलें नाहीं. तेव्हां आमच्या 'आश्रम' नांवाच्या मराठी दैनिकासाठीं लिहिलेल्या अग्रलेखांत मी त्या सक्तीविरुद्ध टीका केली. 'देश-भक्तांचे कारखाने काढून कांहीं देशभक्त तयार करतां येत नाहींत' वगैरे

विचार मी त्या लेखांत व्यक्त केले होते. त्यामुळें आमचा तो अंक जप्त होऊन माझ्यावर शिक्षकबोर्डापुढें खटलाहि चालावयचा होता. पण दुसऱ्या कांहीं कारणामुळें तें प्रकरण तेथेंच राहिलें. तथापि त्या शाळेनेंच मला देश-भक्तीचा गुण शिकवला, हें मात्र कांहीं खोटें नाहीं. स्वदेश, स्वराज्य, स्वधर्म, स्वभाषा असें मागें स्व—स्व लावण्यासारखें जें कांहीं आहे त्याचा जाज्वल्य अभिमान ाला बाळूकाकांच्या राष्ट्रीय शाळेनेंच शिकविला हें मी कबूल करायलाच पाहिजे.

## कोण कुणाला बाटलीनें दूध पाजतें ?

सन १९२५ ते १९२८ अशीं तीन वर्षें 'नवाकाळ' वर्तमानपत्रांत प्रूफ करेक्टर म्हणून मी नोकरी केली. त्यापूर्वीं १९२३ सालीं पुणें येथें 'लोक-संग्रह' छापखान्यांत १०—१५ दिवस कंपॉझिटरचें काम केलें. दरमहा १८ रुपये पगार ठरला होता. नंतर मुंबईस आल्यावर २०—२२ दिवस पुढें 'विविधवृत्त' साप्ताहिक छापलें जाऊं लागलेल्या लक्ष्मीनारायण छाप-खान्यांत 'कंपॉझिटर' होतों आणि पुढें कांहीं महिने 'विनय' छापखान्याचे मालक पांडुरंग नारायण जव्हेरी यांच्या 'कल्पलता' नांवाच्या साप्ताहिका-मध्यें 'प्रूफ करेक्टर' म्हणून काम केलें. त्यावेळीं मी माझगांव भागांत 'शांतारामाची चाळ' नांवाच्या चाळींत राहात असे. 'नवाकाळ'चे मालक काकासाहेब खाडिलकर यांच्या चुलत घराण्यांतील मंडळींचेंहि तेव्हां तेथें एक बिऱ्हाड होतें. 'नवाकाळ'चे त्या वेळचे जनरल मॅनेजर बाळाजी-पंत व 'सेलपर्चेस' मॅनेजर विष्णुपंत हे त्यांत होते. तसेंच आतांचे एक पुढारी रघुनाथराव खाडिलकर हे तिथेंच राहात असत. तेथेंच त्यांची आणि माझी ओळख झाली. रघुनाथराव इंग्रजी शाळेंत शिकत असतांनाच 'नवा-काळ'मध्यें 'प्रूफ करेक्टर'चें काम काम करीत असत. १९२५ सालीं ते मॅट्रिकची परीक्षा पास झाले आणि पुण्याच्या कॉलेजांत शिकायला जाण्याचें त्यांचें ठरलें तेव्हां 'नवाकाळ'मध्यें त्यांच्या जागीं माझी प्रूफ करेक्टर

म्हणून नेमणूक झाली. मजकूर लिहिण्याची मला हौस होतीच; पण नेमणूक 'प्रूफ करेक्टर' म्हणून असल्यामुळें लिहायला मिळण्याचा हक्क नव्हता. तरीपण न. र. फाटक आणि का. म. ताम्हनकर या दोन सहसंपादकांपैकीं ताम्हनकर हे मला लिहिण्याची संधी देत असत. तेव्हां मी लिहिलेला 'हिंदी प्रजेचा पैसा आणि ब्रिटिशांचें कल्याण' या मथळ्याखालील एक मजकूर संपादकीय स्फुट म्हणून त्यांनीं स्वीकारला होता आणि १६ नोव्हेंबर १९२७ च्या 'नवाकाळ'मध्यें तो प्रसिद्धहि झाला होता. पु. वा. कुलकर्णी हे केव्हां कांहीं सात्विक बातम्या मला करायला देत.

मी 'नवाकाळ'मध्यें नोकरीस असल्यावेळच्या या कालांत सोलापूरच्या डी. एस्. पी. नें काकासाहेबांवर अब्रूनुकसानीची फिर्याद केली होती. तेथें त्या सुमारास झालेल्या, हिंदुमुसलमानांच्या दंग्यांत त्यानें पक्षपात केल्याचा आरोप करणारें जें बातमीपत्र 'नवाकाळ'मध्यें प्रसिद्ध झालें होतें त्याबद्दल ही फिर्याद होती. लोकमान्य टिळकांच्या वेळचे त्यांचे सहकारी बॅ. बॅप्टिस्टा हे काकासाहेबांतर्फे काम चालवीत असत. त्या फिर्यादीचें काम चालू असतांना, एक दिवस सकाळीं सुमारें दहा वाजण्याच्या सुमारास तात्यासाहेब केळकर, बाबूराव गोखले, डॉ गोपाळराव पळसुले आणि अंतुकाका फडणीस हे चौघे जण मोटारीनें 'नवाकाळ' क्लबच्या दाराशीं येऊन उतरले. (हल्लीं आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलची जेथें इमारत आहे तेथें तेव्हां 'किर्लोस्कर भुवन' नांवाचा एक जोड बंगला होता. त्यांतील एका भागांत निमकर वकील रहात असत आणि दुसऱ्या भागांत 'नवाकाळ' क्लब होता. ज्यांचीं लग्नें झालेलीं नाहींत किंवा ज्यांची स्वतःची खोली नाहीं असे सडे संपादक व कारकून या क्लबांत राहात. जागेचें भाडें व दामूअण्णा ओक नांवाच्या आचाऱ्याचा पगार एवढा खर्च काकासाहेब सोशीत आणि सगळ्यांच्या जेवणाचा व चहाचा खर्च सगळ्यांनीं सारखा वांटून घ्यावयाचा असे. जाहिरात मॅनेजर बाबासाहेब जोग असि. जाहिरात मॅनेजर भा. ग. जोगळेकर, गो. बा. महाशब्दे, उ. भि. राऊत, विष्णुपंत खाडिलकर, मी आणि सुमंत व कुवळेकर (मॅनेजर

खात्यांतले दोन कारकून ) हे या क्लबाचे कायम मेंबर होतों. दुसरे कांहीं-जण येऊन जाऊन असत. तात्यासाहेब केळकर व त्यांचे सरकारी क्लबच्या हॉलमध्यें येऊन बसल्यावर, ते आल्याचें आम्ही काकासाहेबांना आणि बाबूराव फाटकांना कळविलें. खटाव मकनजीच्या वाडींतच त्यांचीं तेव्हां बिऱ्हाडें होतीं. काकासाहेब क्लबांत आल्यावर फिर्यादीबद्दल बोलणें निघालें. डी. एस्. पी. नें बाई ठेवली असल्याच्या आरोपाबद्दल त्यानें 'डिफेन्स' काय दिला असें तात्यासाहेबांनीं विचारल्यावर "ती 'बाई' नसून 'दाई' आहे असें त्यानें सांगितलें.". असें काकासाहेबांनीं म्हणतांच तात्यासाहेब चटकन् उद्गारले, 'कोण कुणाला बाटलीनें दूध पाजतें ?'

## तात्यासाहेबांनीं माझी प्रॉमिसरी नोट परत पाठविली

'नवाकाळ' पत्रांत नोकरीस असतांना, 'बंगालमधले सुप्रसिद्ध देशभक्त देशबंधु चित्तरजनदास हे बंगालमधल्या अनेक होतकरू तरुणांना पैशांची मदत करतात,' असें मी ऐकलें–वाचलें होतें. मला माझ्या जीवनांत पैशाची सदोदित विवंचना करावी लागली आहे. 'नवाकाळ' पत्रांत नोकरी असतांनाहि माझ्यापुढें दर महिन्यास कोणा ना कोणा देणेंकऱ्याच्या देण्याची काय सोय करावी हा प्रश्न असेच. एक दिवस मनांत आलें––देशबंधु दास हे जसे बंगालचे सर्वश्रेष्ठ पुढारी आहेत तसे तात्यासाहेब केळकर आपल्या महाराष्ट्रांतले सर्वश्रेष्ठ पुढारी आहेत. तेव्हां आपली अडचण त्यांना सांगून त्यांजकडून पैसे मागावे. मनांत आलेल्या विचाराचा लगेच अंमल केला. माझ्या अडचणीचें सविस्तर वर्णन करणारें पत्र लिहून १०० रुपये रकमेची प्रॉमिसरी नोट मी तिकीट लावून व त्यावर सही करून त्यांजकडे पुण्याला पाठवून दिली. तिसऱ्या दिवशींच त्यांजकडून माझ्या नांवें एक बंद पाकीट आलें. त्यांत त्यांनीं माझी प्रॉमिसरी नोट परत पाठविली होती आणि मोडीमध्यें मला लिहिलेल्या पत्रांत 'तुम्हाला वाटतें तसा मी श्रीमंत नाहीं आणि लोकांना द्यायला माझेजवळ जास्त पैसेहि नाहींत.' असें लिहून

'आधीं सही करून माझ्याकडे प्रॉमिसरी नोट पाठविलीत तशी दुसऱ्या कोणाला पाठवीत जाऊं नका' असा मला उपदेश केला होता.

पुढें तात्यासाहेब केळकरांना मी पत्र लिहिण्यासारखें पुन्हां एकदां कारण घडलें. त्यावेळीं तात्यासाहेब केळकर यांनीं मुंबई विद्यापीठाच्या बी. ए. परीक्षेच्या मराठी विषयाच्या परीक्षकाचें काम स्वीकारलें होतें. 'नवाकाल' क्लबमध्यें रोज दुपारीं आमच्या ऑफीसमधील सहकारी मंडळी चहा पिण्यासाठीं जमत (त्याबद्दल दरमहा २ रु. त्यांना द्यावे लागत). तेव्हां अनेक गोष्टींवर चर्चा होई. एक दिवस श्री. न. र. फाटक यांनीं हा केळकरांसारख्या मराठी साहित्यसम्राटानें बी. ए. चा मराठीचा परीक्षक म्हणून काम करण्यास मान्यता दिल्याचा विषय काढला. मी केळकरांचा विशेष अभिमानी. म्हणून मला उद्देशून ते म्हणाले, "वास्तविक मुंबई युनिव्हर्सिटीनेंच त्यांना परीक्षकपद देऊं करायला हवें होतें. तिनें तें देऊं केलें नसतां केळकरांनीं स्वतःच 'मला एम्. ए. चा मराठीचा परीक्षक नेमा' असा अर्ज केला आणि एम्. ए. च्या परीक्षकाच्या कामासाठीं अर्ज केला असता, मुंबई युनिव्हर्सिटीनें त्यांना बी. ए. चें परीक्षकपद देऊं केलें यांत केळकरांना आपला कांहींसुद्धां अपमान वाटू नये! त्यांनीं तें काम कसें पत्करलें?" केळकरांनी केलें तें बरें केलें नाहीं, असें मलासुद्धां वाटलें. तेव्हा त्याच दिवशीं मी त्यांना पत्र लिहिलें आणि 'आपल्या या करण्याचा काय अर्थ समजावा? आपण प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक करणारे असल्यामुळें आपल्या या कृतीमागें कोणता विचार आहे?' असें मी त्यांस विचारलें. त्या पत्राचेंहि मला तिसऱ्या चौथ्या दिवशीं उत्तर मिळालें. 'मुंबई युनिव्हर्सिटी राष्ट्रीय वृत्तीच्या माणसांपासून अगदीं दूर राहिली आहे. तिच्याशीं कसा तरी आपला संबंध आला पाहिजे. एकदां चंचुप्रवेश झाला म्हणजे मग तीमध्यें आपल्याला भरपूर हात घालायला संधी मिळू शकेल' अशा अर्थाचें त्यांचें तें उत्तर होतें. मला तें तितकेसें पटलें नाहीं आणि पुढेंहि चंचुप्रवेश केलेल्या तात्यासाहेबांनीं मुंबई विद्यापीठांत मुसलप्रवेश केल्याचें कधीं दिसून आलें नाहीं.

अनुक्रम 3.2021 दि: २४.११.२१
क्रमांक 9026 नोंदी दि. २/१/२१

# बोंबा आणि बावला

मी 'नवाकाळ' वर्तमानपत्रांत नोकरीला असतांनाचीच हीहि एक गोष्ट आहे. शिमगी पौर्णिमा आदल्याच दिवशीं झाली होती आणि धूलिवंदनाची आम्हाला त्या दिवशीं सुट्टी होती. आजूबाजूला मधून मधून बोंब मारल्याचा आवाज येई त्यामुळें आम्हालाहि तिची आठवण होई. पण 'नवाकाळ' पत्रासारख्या अत्यंत सभ्य वातावरण असलेल्या वर्तमानपत्रांत नोकरी करणारी आम्हीं पांढरपेशी मंडळी! आम्ही शहरांत बोंब कशी मारायची ? तेव्हां रात्रीं ऑपोलो बंदरवर जाऊन पडाव ठरवायचा आणि किनाऱ्यापासून दूर समुद्रांत जाऊन तिथें तोंडाचा चिकटा घालवायचा असें ठरलें. त्याप्रमाणें भा. ग. जोगळेकर, महाशब्दे, राऊत, नाना खाडिलकर, विष्णुपंत खाडिलकर, धुरंधर, बाजीराव जोशी, लक्ष्मणराव ओक, नाना कुलकर्णी, कुवळेकर आणि मी इतकी छोटी आणि बाबूराव फाटक व 'महाराष्ट्रकुटुंबमाला'कार ना. वि. कुलकर्णी ही बडी मंडळी ऑपोलो बंद रवर गेलों. ठरल्याप्रमाणें पडाव केला आणि समुद्रांत दूरवर जाऊन बोंबा मारण्याची आणि फाका म्हणण्याची हौस भागविली. अश्लील समजल्या जाणाऱ्या इतरहि कांहीं वाङ्मयाचा उद्धार झाला. बाबूराव फाटक पंजाबांत राहिलेले असल्यामुळें त्यांनीं हिंदींतलेंहि खास ठेवणींतलें असें कांहीं 'शिमगावाङ्मय' ऐकविलें.

पण एक तासापुरताच पडाव ठरविला असल्यामुळें परत किनारा गाठावा लागला. आमच्या 'क्लबा'पर्यंत चालत येईतों रात्रींचे फक्त ११-११॥ च वाजले होते. सुट्टी असल्यामुळें लवकर झोंपायचें मनांत येईना. दिवसा पत्ते झोडून झालेले असल्यामुळें पत्त्यांचें नांव कोणी काढीना. शेवटीं तसेंच पुढें 'मलबारहिलवर' जावें असें ठरलें आणि आम्ही चालत पुढें निघालों. 'बाँबे गॅरेज'च्या पुढें जाऊन टेकडीवर चढण्याच्या वाटेशीं जातों तों तेथें एका पोलिसानें आम्हाला अडविलें. 'रात्रीं वर जाण्याची बंदी आहे.' असें तो आम्हाला सांगूं लागला तसें आम्ही विचारलें 'कां ? वर कां जायचें

नाहीं ?' 'नुकताच हिलवर एक खून झालेला आहे. त्यामुळें लोकांनीं रात्रीचें वर जाण्यांत धोका आहे.' असें त्यावर त्यानें उत्तर दिलें. 'पण आम्ही इतकेजण आहोंत. आम्हाला कोण धोका देणार ?' आम्ही त्याला असें उलट विचारलें मात्र तोंच तो उत्तरला, 'तुम्हाला कोणी धोका देणार नाहीं तर तुम्हीच कोणाला धोका द्याल ?' त्याचें हें वाक्य ऐकून आम्ही सर्दच झालों. त्याचें म्हणणें खरेंच होतें. कारण त्याच्या दृष्टीनें सगळेच सारखे होते.

त्यानें मलबारहिलवर झालेल्या ज्या खुनाचा उल्लेख केला तो बावला नांवाच्या एका खोजा शेठियाचा मुमताज बेगमसाठीं झालेला खून होय. एका संस्थानिकाच्या प्रेरणेनें तो खून झाल्याची वार्ता होती. कॅ. कर्णिक आणि महंमद शफी असे दोघे त्या प्रकरणीं फांशीं गेले आणि एक सरदार वेडा झाल्यामुळें येरवड्यांत जाऊन पडला !

## सज्जनाचा संताप

काकासाहेब खाडिलकर स्वभावानें रागीट होते, पण हाडाचे सभ्य असल्यामुळें त्यांच्या तोंडून कधीं अपशब्द निघत नसे. त्या वेळीं वरेरकर-मामांनीं लिहिलेली 'विधवा कुमारी' ही कादंबरी फार गाजली होती. तिचे लेखक म्हणून वरेरकरमामांचें नांव मागाहून फुटलें. पुस्तकाची लेखिका 'एक गतभर्तृका' असेंच त्या कादंबरीवर छापलेलें आहे. त्या कादंबरीची जाहिरात करण्याचें काम वसंतराव मराठे हे करीत असत. इतर वृत्तपत्रां-प्रमाणें 'नवाकाळ'मध्येंहि त्या कादंबरीची जाहिरात प्रसिद्ध होत असे. त्या कादंबरीचे लेखक वरेरकरमामा आहेत हें समजलेलें नसल्यामुळेंच, 'केसरी'मध्यें तिच्यावर अनुकूल अभिप्राय प्रसिद्ध झाला आणि मामांचें नांव फुटल्यावर मग 'केसरी' कचेरींत चुळबुळ झाली अशी पुढें बातमी उठली होती. 'नवाकाळ'मध्येंहि तेव्हां कोणाला त्या कादंबरीचे खरे लेखक माहिती नव्हते.

पण ' त्या कादंबरींत तुमची निंदा आहे. ' असें कोणी तरी काकासाहेब खाडिलकरांना सांगितलें होतें म्हणतात. तें कसेंहि असो. एक दिवस सकाळीं मॅनेजर बाळाजीपंत खाडिलकर ऑफिसांत येतांच काकासाहेब त्यांच्या खोलींतून (हल्लीं ' मौज ' छापखाना आहे तेथें तेव्हां 'नवाकाळ' कचेरी होती आणि वर चढण्याच्या जिन्याच्या अर्ध्या टप्प्यावर देवदारी फळया मारून काकासाहेबांसाठीं खास खोली बनविलेली होती.) वर आले आणि " आपल्याकडे येत असलेली ' विधवा कुमारी ' कादंबरीची जाहिरात उद्यांपासून बंद करा. " असा त्यांनीं हुकूम केला. पण ' काँट्रॅक्ट केलेलें आहे ' वगैरे सबबी बाळाजीपंत सांगूं लागतांच ' तुम्हाला सांगायला धीर होत नसेल तर मी सांगेन वसंतरावांना काय सांगायचें तें. ' असें सांगून काकासाहेब त्यांच्या खोलींत परत गेले.

त्यांच्या हुकुमाप्रमाणें दुसऱ्या दिवशींच्या ' नवाकाळ 'मध्यें त्या कादंबरीची जाहिरात प्रसिद्ध झाली नाहीं. तेव्हां लगेच वसंतराव मराठे ' नवाकाळ ' कचेरींत आले आणि जाहिरात कशी राहिली वगैरे चौकशी करूं लागले. त्यांना बाकीची मंडळी काय उत्तर देणार ? ' काकासाहेबांनीं सांगितलें ' एवढेंच म्हणून बाळाजीपंत खाडिलकर थांबले आणि ' वसंतराव आले आहेत ' असें काकासाहेबांना कळविण्यांत आलें. काकासाहेब त्यांच्या खोलींतून वर आले ते रागानें थरथर कांपतच आले. म्हातारपणामुळें त्यांचें शरीर थोडें कांपत असेच, त्यांत राग आलेला म्हणून तें जास्त थरथर कांपत असल्याचें दिसलें. आतां हे वसंतरावांना काय म्हणतात अशा प्रश्नांत मंडळी आहे तोंच काकासाहेब एकदम इंग्रजींतच गरजले, ' मि. वसंतराव, आय वाँट टु इन्सल्ट यू. ' आणि त्यानंतरचीं वाक्यें भराभर मराठींतूनच बाहेर पडलीं. ' तुमच्या त्या कादंबरींत माझी निंदा आहे, असें मला समजलें आहे. माझी निंदा करणाऱ्या पुस्तकाची माझ्या पत्रांत जाहिरात होणें मी चालूं देणार नाहीं. म्हणून मीच ती जाहिरात बंद करविली आहे. काँट्रॅक्ट ब्रेक केल्याबद्दल आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या जाहि-

रातीचें बिल दिलें नाहींत तरी चालेल.' वसंतराव मराठे त्यावर कांहीं बोलायच्या आधींच काकासाहेब तेथून निघून गेलेहि होते !

ज्या कोणाचा अपमान करायचा असेल त्याला अपमानास्पद असे शब्द न उच्चारतां 'मला तुमचा अपमान करायचा आहे' असें त्याला फक्त सुनवायचें ही अपमान करण्याची अजबच तऱ्हा नाहीं का ?

## चणचण कायम राहील पण तिचें कांहीं वाटणार नाहीं

'नवाकाळ'चे संपादक काकासाहेब खाडिलकर 'केसरी'मध्यें होते तेव्हांपासूनच परराष्ट्रांतील राजकारणाच्या अभ्यासाबद्दल त्यांची प्रसिद्धि होती. त्यांनीं 'नवाकाळ' काढल्यावरहि त्यांचा परदेशी घडामोडीसंबंधाच्या अभ्यासाचा हव्यास कायमच होता. त्यासाठीं ते 'लंडन टाइम्स', 'डेली हेरल्ड', मॅंचेस्टर गार्डीयन, 'स्फियर', 'ग्राफिक', 'कॅपिटल' ही राजकीय आणि 'टिट् बिट्स', 'जॉन ओ लंडन' वगैरे विनोदी किंवा करमणुकीचें वाङमय प्रसिद्ध करणारीं परदेशी वृत्तपत्रें मागवीत असत. तेव्हां दर शुक्रवारीं विलायतची मेल बोट येत असे. त्या बोटीनें मागील सबंध आठवड्याचीं ब्रिटीश वृत्तपत्रें येत आणि 'बाँबे बुक मार्ट'वाले गोविंद लक्ष्मण खोत यांजकडून ('टाईम्स ऑफ इंडिया' पत्राच्या जुन्या इमारतीला कॉर्पोरेशनच्या इमारतीकडील बाजूस जो दादर होता त्याखालीं गोविंदराव खोतांचें हें वृत्तपत्रांचें दुकान होतें.) आम्ही तीं आणीत असूं. तीं आणण्यासाठीं कित्येकदां मला जावें लागलें होतें आणि त्यामुळें त्यांच्याशीं माझी ओळख झाली होती. पुढें त्यांचें हें दुकान बंद पडल्यावर 'रणगर्जना' नांवाचें साप्ताहिक त्यांनीं सुरू केलें होतें. गं. दे. खानोलकर हे त्या पत्राचे संपादक होते. दर आठवड्याला या पत्रासाठीं एक पानभर देशी–परदेशी 'वर्तमानसार' लिहून देण्याचें काम मी करीत असें. पुढें हें पत्रहि बंद करावें लागल्यावर कसल्याशा औषधांच्या फिरत्या विक्रेत्याचें काम हे खोत करीत असत.

त्यांच्या बाकीच्या धंद्याप्रमाणें त्यांना ज्योतिषहि येतें हें माझ्या कानावर आलें होतें.

पुढें एकदां त्यांची–माझी गांठ पडली तेव्हां ‘ हल्लीं कुठें असतां, काय करतां ? ’ वगैरे वगैरे चौकश्या झाल्यावर, ‘ माझी जरा कुंडली पाहातां काय ? ’ असें मी त्यांना म्हटलें तेव्हां ते म्हणाले, ‘ मला कुंडली नको. तुमची जन्मतारीख, महिना आणि सन सांगा. ’ ‘ १३ सप्टेंबर १९०५ ’ असें मी त्यांना उत्तर देतांच कागदावर त्यांनीं माणसाची एक आकृति काढली आणि मला म्हणाले, ‘ तुम्हाला काय विचारायचें आहे ? ’ मी म्हणालों, ‘ माझ्या मागची पैशाची विवंचना कांहीं चुकत नाहीं. माझ्या गरजा थोड्या असूनहि त्यांनासुद्धां पुरेसा पैसा मिळत नाहीं. तर ही परिस्थिति कधीं बदलणार आहे काय ? ’

त्यांनीं कागदावरील माणसाच्या आकृतींत आंकडे मांडून कांहीं गणित केलें आणि म्हणाले, ‘ तुमच्या वयाच्या ३८ व्या वर्षापर्यंत हें असेंच चालायचें. ’

‘ आणि मग ? ’ मोठ्या उत्सुकतेनें मी विचारलें.

‘ संवय झाल्यामुळें तुम्हांला पुढें त्याचें कांहीं वाटणार नाहीं ! ’ मला उत्तर मिळालें.

## चौपाटी ते गायकवाडवाडा पायीं प्रवास

विमानोड्डाणाच्या धंद्यांत आतां खूपच प्रगति झाली आहे. पण १९२७ सालीं लिंडबर्ग नांवाच्या अमेरिकन वैमानिकानें न्यूयॉर्क ते पॅरीस असें एका टप्पेंत विमानोड्डाण केलें तेव्हां तो एक मोठा विक्रम ठरला होता आणि कागदांच्या राशींत बुडून जाईल इतक्या अभिनंदनपर तारांचा पॅरिस येथें लिंडबर्गवर वर्षाव झाला होता. अमेरिकेंत त्याच्या आईलाहि लोकांनीं डोक्यावर घेतलें आणि तिचा मुलगा पराक्रमी निघाल्याबद्दल तिचें अभिनंदन केलें. या बातम्या वाचीत असतांना मला वाटें आपणाला

नाहीं का असेंच कांहीं करतां येणार ? विचार करतां करतां, माझ्या मर्यादा ओळखून——सीमोल्लंघन म्हणून——नुसतें मुंबईहून पुण्यापर्यन्त चालत जावयाचें मी ठरविलें. काकासाहेब खाडिलकरांकडे आठ दिवसांची रजा मागितली आणि (१९५७ सालच्या) दसऱ्याच्या दिवशीं सायंकाळीं चौपाटीवरच्या टिळक पुतळ्याचें दर्शन घेऊन पुण्यास चालत जायला निघालों.

खांद्यावर घोंगडी घेतली आणि एक पिशवीहि लावली. तींत तांब्या, भांडें, एक नारळ, थोडे पोहे, सुई, दोरा, काड्यांची पेटी, मेणबत्ती, दासबोध आणि मारुतीची छोटी तसबीर एवढें साहित्य घेतलें होतें. हातांत लाठी होती आणि खिशांत चाकू होता. त्या दिवशीं रात्र पडेतों कुर्ल्याला गेलों आणि आमच्या के. रा. पुरोहितांकडे मुक्काम केला. दुसऱ्या दिवशीं दुपारपर्यंत ठाण्याला जाऊन नानासाहेब दामले (आतां ते कै. वा. झालेले आहेत) यांना भेटलों. त्यांच्याकडे भोजन झालें, थोडी झोंप झाली आणि मग त्यांनीं मला त्यांच्या व्यामाम शाळेंत नेऊन तेथें माझा गौरव केला. तेथून पुढें चालूं लागेतों साडेचार पांच झाले होते. चालतां चालतां मुंबरा मागें टाकलें आणि पुढें निघालों. पण दिवस मावळण्याची वेळ आली तरी गांव किंवा माणसाची वस्ती कांहीं आढळेना. शेवटीं सडकेच्या कांठाशींच ओसाड असें एक लहानसें घर दिसतांच तेथेंच रात्रीं मुक्काम करण्याचें मी ठरविलें. सुमारें दहाबारा हात लांबीरुंदीची जमीन, तीन बाजूंस पुऱ्या भिंती आणि चवथ्या बाजूस अर्धी भिंत व अर्ध्या भिंतीएवढें दार, जुन्या काळच्या नळ्यांचें आच्छादन असें त्या घराचें स्वरूप होतें.

मी प्रथम निगडीच्या टाळ्यांनीं त्या घरांतली जमीन झाडली, भिंतींना जीं बिळें होतीं त्यांत दगडगोटे ठासून भरले आणि तांब्यानें जवळच्या ओढ्याचें पाणी आणून तें तेथें शिंपडलें. नंतर माझ्याबरोबर आणलेली घोंगडी आंथरून भिंतीजवळ मारुतीची तसबीर मांडली, तिच्याजवळच 'दासबोध' काढून ठेवला आणि मेणबत्ती लावून त्या जागेचें देऊळ बनविलें. नंतर ओढ्यावर जाऊन हातपाय–तोंड धुवून तांब्याभर पाणी घेऊन आलों. दासबोधाचा एक समास वाचला, 'भीमरूपी महारुद्र' हें स्तोत्र म्हटलें

आणि नारळ फोडून त्यांतील खोबरें व पोहे यांच्यावर ताव मारला. चालून आलेलों असल्यामुळें दमलों होतों म्हणून झोंप येऊं लागली. तेव्हां एकदां घराच्या चारहि बाजूंस नजर टाकून घोंगडीवर आडवा पडलों. मनांत भीति असल्यामुळें तें जागें होतें पण शरीरानें संप केला आणि मला केव्हांशीं झोंपहि लागली.

निदान पांचसहा तास तरी मी झोपलों असेन. जागा झाल्यावर उठून बाहेर पाहिलें तों मध्य आकाश मागें टाकून चंद्र कासराभर पश्चिमेकडे गेला होता. शुद्ध एकादशीचा चंद्र बावीस घटका दिवसा म्हणजे सायंकाळीं सुमारें चार वाजतां उगवलेला असणार. तेव्हां त्यावेळीं १–१।। वाजला असेल. पण पुन: झोंप कांहीं येईना. तेव्हां त्या घराच्या दाराच्या उंबरठ्यावर बसून मी निसर्गाचें रमणीय स्वरूप पाहूं लागलों. शरद् ऋतूंतलें–कवींनीं वाखाणलेलें–चांदणें सर्वत्र पडलें होतें. पावसाळ्यांत भरपूर पाणी मिळाल्यामुळें सगळी वनश्री टवटवीत बनली होती. जवळच असलेला उंच डोंगर हिरवागार दिसत होता. वेळ जाण्यासाठीं तोंडानें माझी पाठांतराची बडबडहि चालू होती. अभंगापासून लावणीपर्यंत सगळ्या पाठांतराची उजळणी होत होती. त्यांतच; समोर मोठा डोंगर पाहिल्यावर 'सौभद्र' नाटकांतल्या 'बरिवर हा सौदागर' या पदाची आठवण झाली आणि तेंहि मी मोठे हेल काढून म्हटलें. 'ललितकले'चे बापूराव पेंढारकर यांनीं प्रसिद्ध केलेला, मामा वरेरकरांच्या 'संन्याशाचा संसार' नाटकांतील 'बारे पांडुरंगा' हा अभंग म्हणांना, वैकुंठापर्यंत आवाज पोंचेल एवढ्या मोठ्यानें मी ओरडत होतों. कारण माझ्या ओरडण्याबद्दल तक्रार करायलाच तेथें कोणी नव्हतें. शेवटीं चामड्याचें तोंड दमलें आणि मी पुन: घोंगडीवर आडवा झालों. मी जेव्हां पून: जागा झालों तेव्हां पूर्वक्षितिजांत सूर्य कासराभर वर आला होता.

## जंगलांतील अविस्मरणीय अनुभव

तेथून पुढें चालत निघालों तों सुमारें बारा वाजण्याच्या वेळीं पनवेल गांवांत शिरलों. त्या गांवांतील मोटार–रस्त्यानें चालतां–चालतां आजूबाजूस

ब्राह्मणाचें घर दिसतें कां तें पहात चालत होतों. रस्त्याला लागून दोन्हीं बाजूला सभोंवतीं कंपौंड असलेल्या वाड्या, त्यांत कांहीं फळझाडें, फुलझाडें, आंगण आणि मग घरें अशी मला त्या गांवाची मांडणी दिसली. अशा त्या वाड्यांच्या फाटकांवर कोठें कोठें मालकांच्या नांवाच्या पाट्याहि आढळल्या. त्यांतच एका ठिकाणीं चित्पावन ब्राह्मण जातीच्या वकिलांच्या नांवाची पाटी दिसली. त्या गांवांत कोठेंतरी माझी जेवणाची सोय लागेल तर बरें असें मनांत होतें. मी ब्राह्मण असलों तरी फक्त शाकाहाराचा आग्रही आहें. तें कोणत्याहि हिंदु जातीच्या गृहस्थाकडचें मला चालतें. तसेंच माझ्या घरींहि माझी ब्राह्मणेतर पाहुणे मंडळी जेवलेली आहे. पण आयत्या वेळीं अतिथि म्हणून जायचें तर ब्राह्मणांच्या घरींच चटकन् सोय होईल म्हणून ब्राह्मणांच्या नांवाच्या पाट्या पहात होतों. त्याप्रमाणें त्या चित्पावन ब्राह्मण वकिलांच्या नांवाची पाटी पहातांच मी वाडीच्या फाटकांतून आंत शिरलों. पण चार पावलें मी पुढें जातों न जातों तोंच सोवळें नेसलेले एक गृहस्थ घराच्या दरवाजांतून बाहेर आले. त्यांच्या उजव्या हातांत थोडासा भात आणि डाव्या हातांत पाणी असलेली पंचपात्री होती. त्यावरून वैश्वदेव करून काकबळी टाकण्यासाठीं ते बाहेर आल्याचें ओळखतां येत होतें. फाटकांतून कोणीतरी आंत आलें आहे एवढें पहातांच ते एकदम ओरडले, ' जा, आधीं फाटकाबाहेर जा ! इथें भिक्षाबिक्षा कांहीं मिळायची नाहीं. ' त्यांचे ते शब्द ऐकून मला राग न येतां गंमतच वाटली. कारण वैश्वदेवाचा काकबळी टाकण्याच्या ऐन वेळीं जर कोणी अतिथि अकस्मात तेथें हजर झाला तर तो प्रत्यक्ष अग्निनारायणच आहे असें समजावें आणि भोजन देऊन त्याला तृप्त करावें असें शास्त्र आहे. त्याची जातपातहि त्यावेळीं पाहावयाची नसते. पण या गृहस्थांनीं मला वाडीबाहेर जायला सांगितलें होतें. म्हणून त्यांच्या पुढें गेलों आणि त्यांना शास्त्र सुनावून मग मागें फिरलों. पुढें एक देऊळ लागलें. तेथें विश्रांति घेतली, तुडुंब भरलेल्या विहिरींत पोहोलों, डाळें–कुरमुरे घेऊन भुकेचें काम भागविलें आणि तेथेंच थोडी झोंप काढली. तेथून पुढें चालू लागतों साडेतीन चार झाले होते.

तेथून पुढें चालतां चालतां संध्याकाळच्या सुमारास खेडवळ वस्तीची एक वाडी लागली. दिवस मावळायची वेळ असल्यामुळें तेथेंच वसतीला राहावें असें मनांत होतें. म्हणून त्या वाडींतल्या एका घरापाशीं जाऊन 'रात्रीपुरती मला येथें वसती करूं द्याल काय?' असें त्या घरच्या माणसाला विचारलें. त्यानें सांगितलें 'पाटलाकडे जाऊन विचारा.' तेव्हां तेथल्या पाटलाकडे गेलों. त्यानें विचारलें दुसऱ्या एका पाटलाला आणि मग दोन्ही पाटलांनीं सांगितलें कीं 'येथून एका हांकेवर धर्मशाळा आहे रस्त्याजवळच. तेथें जा.' त्या गांवांत खायला मिळण्याचें लक्षण दिसत नव्हतेंच. म्हणून 'थोडें दूध विकत मिळेल का?' असें विचारलें तेव्हां उत्तर मिळालें 'आमचें सगळें दूध दुपारींच विकायला गेलें.' या गांवाचें नांव 'बारव' असल्याचें समजलें. शेवटीं तसाच चालत निघालों आणि 'एका हांकेवर' असलेली धर्मशाळा मी अर्धा मैल चालन गेल्यावर मला दिसली. सुमारें चाळीसपन्नास हात लांबीच्या त्या धर्मशाळेला तीन बाजूंस भिंती होत्या आणि रस्त्याकडची सबंध बाजू अगदीं उघडी होती. त्या धर्मशाळेंत गेल्यावर खाणें–पिणें कांहींच नसल्यामुळें अंगाभोंवतीं घोंगडी गुंडाळून घेऊन एका कोपऱ्यांत देवाचें नांव घेत मी पडून राहिलों. चाकू उघडून मुठींत धरून ठेवला होता.

अशा रीतीनें साधारण तास दीडतास मी पडून राहिलों असेन–नसेन तों माणसांचे आवाज येऊं लागले. सगळीकडे झाडांची गर्दी असल्यामुळें चांदणें असूनहि सांवली पडली होती. त्या धर्मशाळेंत मी घोंगडींत स्वतःला गुंडाळून घेऊन पडून राहिल्यापासून 'एकादें श्वापद येऊन मला खाणार तर नाहींना,' अशी मनाला सारखी भीति वाटत होती. माणसांचा आवाज ऐकूं येऊं लागल्यामुळें ती दूर झाली; पण 'हीं माणसेंच चोर–डाकू निघून त्यांची सुरी ते माझ्या मानेवर चालवितील कीं काय,' अशी नवी भीति वाटूं लागली. त्यामुळें मनांतल्या मनांत देवाचें नांव घेत मी अगदीं गुपचूप पडून राहिलों. माझे डोळे आणि कान मात्र अगदीं तत्परतेनें आपापलीं कामें करीत होते. पांच–सात मिनिटें अशीं गेलीं आणि मग मोठ्याशा मिशावाला एक पुरुष, दोन तरणे मुलगे, एक प्रौढ आणि एक नवतरुण अशा दोन बायका,

त्या दोघींतील तरणीच्या डोक्यावर एक देव्हारा, एक म्हैस, तिच्या पाठीवर एका मोठ्या करंड्यांत कांहीं कोंबड्या आणि एकदोन कुत्रीं असें लटांबर त्या धर्मशाळेंत येऊन पोंचलें. तीं माणसें चालून दमलेलीं व भुकावलेलीं असावींत. कारण त्यांतल्या प्रौढ बाईने ताबडतोब तीन धोंडे मांडून चूल पेटविली आणि ती स्वयंपाकाच्या तयारीस लागली. पुरुष माणसें दम टाकीत बसलीं असतां, त्यांतील मोठ्या मिशावाल्या माणसाचें लक्ष मी झोंपलों होतों त्या बाजूकडे गेलें आणि तो उठून माझ्या दिशेनें येऊं लागला. मी जागेवर पडून सर्व पहात होतों. तो माझ्याजवळ आल्यावर त्यानें 'कोणरे तूं ?' असें विचारलें तेव्हां पडल्यापडल्याच 'मी एक वाटसरू आहें. वस्तीला कुठें जागा मिळाली नाहीं म्हणून इथें येऊन पडलों.' असें मी त्याला उत्तर दिलें. 'एकट्यानें असें जंगलांत वस्तीला राहून मरायचें होतें काय तुला ?' असा त्यानें पुन: प्रश्न केला तेव्हां, माझा जीव घ्यायच्या ऐवजीं मी जगावें असें वाटणाराच हा मनुष्य आहे अशी खात्री पटून मी उठून बसलों आणि 'तुम्ही आला नसतां तर कदाचित् मला मरावें लागलें असतें.' असें त्याला उत्तर दिलें. त्यावर त्यानें माझ्याकडे जरा निरखून पाहिलें आणि म्हणाला, "पोरवयाचा दिसतोस ! आईबापावर रागावून घरांतून निघून आलास कीं काय ?'

मग मी त्याला माझी सगळी कथा सांगितली. आणि म्हणालों, 'दिवस मावळतां–मावळतां एक गांव लागलें तिथें वसतीला राहायचा माझा विचार होता. पण तिथले लोक राहूंच देईनात. त्यांनींच मला या धर्मशाळेंत यायला सांगितलें. शेवटीं देवावर हवाला टाकून पडून राहिलों इथें !' 'संध्याकाळीं खाल्लेंबिल्लेंस का कांहीं ?' या त्याच्या प्रश्नाला मी मानेनेंच 'नाहीं' असें उत्तर दिल्यावर तो म्हणाला, "तूं बामण दिसतोस. नाहींतर आमच्याजवळचें दिलें असतें थोडें फार. पण थांब. तुला चालण्याजोगी आहे एक वस्तू माझ्याजवळ." असें म्हणून माझ्याजवळून तो मागें फिरणार तों त्याचा एक तरणा सोबती तिथें आला. त्याला म्हाताऱ्यानें आपल्याबरोबर परत नेलें आणि थोडींशीं कच्चीं रताळीं त्यानें माझ्याकडे पाठवून दिलीं. मग मलाहि अगदीं निर्भय वाटलें आणि ती मंडळी जेवायला बसेपर्यंत मी त्यांच्याशीं

गप्पा मारल्या; त्यानें पोवाडा म्हटला तो ऐकला, बॅ. सावरकर-कृत पोवाड्यांची मीहि त्याला वानगी दाखविली आणि हें सगळें करतांना कच्चीं रताळींहि पोटांत घातलीं. नंतर माझ्या पुढच्या मार्गांत कितीकिती अंतरावर कोणकोणतीं गांवें लागतात तें त्यानें मला सांगितलें आणि 'एक गांव सोडतांना पुढचें गांव गांठण्याची खात्री वाटली तरच पुढचें पाऊल उचल !' असेंहि त्यानें मला बजावलें. मग मी आपल्या जागीं परत गेलों आणि निर्धास्त झोंपलों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मीं उठेतों ही मंडळी धर्मशाळेंतून निघून गेलीं होतीं. कडकलक्ष्मीवाल्यांचें तें कुटुंब होतें !

## खालापुरांत 'ममात्मा' भेटला

त्यानंतर पुढें चालत गेल्यावर दुपारीं खालापूर गांव लागलें. तेथें 'ब्राह्मणवठार' शोधीत ब्राह्मण आळींत गेलों तों एका घरांत बाजाची पेटी वाजत होती आणि कोणी तरी 'ममात्मा गमलाऽऽ' पद म्हणत होता. मी त्या घराच्या दाराशीं गेलों तों १०–१२ तरणे, केंस राखणारे ब्राह्मण तेथें बसलेले पाहिले. कांहीं तरी नांवानें हांक मारायची ती मी 'अहो ममात्मा' अशीच त्यांना हांक मारली. त्यावरोबर घरचे यजमान ( त्यांचें आडनांव 'ठोसर' असल्याचें मग मला समजलें ) आणि दोघेतिघेजण पुढें येऊन त्यांनीं माझी नीट चौकशी केली. त्यांच्याकडे माझी लगेच चांगली सोय झाली. मला आंघोळ करायची होती म्हणून ठोसर मला विहिरीवर घेऊन गेले आणि रहाटाला घागर बांधून ते मला पाणी काढून देऊं लागले. त्यांना वाटलें मी मुंबईचा, मला विहिरीचें पाणी काढतां येत नसेल. पण मी 'मला पाणी काढतां येतें' असें सांगून घागर काढूनहि दाखविली. यथास्थित आंघोळ झाल्यावर, जेवण झालें. ताक–भात आणि ओल्या वालांची उसळ असा बेत होता. नंतर पानसुपारी खायला बसल्यावर मी त्या मंडळीला विचारलें, 'रत्नागिरी जिल्ह्यांतील आम्हां लोकांना घरीं राहणें कठीण होतें,

आणि तुम्हीं घरीं खुशाल बाजाच्या पेटया वाजवीत कसे बसूं शकतां ?' ते सांगूं लागले, 'आम्हांला तरी कुठें रहातां येतें आहे ? आम्हींहि मुंबईंत नोकऱ्या करतों. पण दत्तजयंतीला जें नाटक करायचा आमचा बेत आहे त्याचा आज मुहूर्त करणार आहों.' नंतर दत्ताच्या तसबिरीला हार घालण्यांत आला, नारळ फोडण्यांत आला आणि प्रसाद वांटून नाटकाचें पुस्तक नकलांसाठीं फाडण्यांत येऊन निरनिराळ्या पात्रांचीं भाषणें निरनिराळ्या वह्यांवर चिटकविण्यांत येऊं लागलीं. घराचे मालक श्री. ठोसर यांनीं 'आतां पुढचा मुक्काम तुम्हीं खोपोली गांवांत करा.' असें मला सांगून, त्या गांवचे एक जमीनदार अण्णा पाटणकर यांच्या नांवें माझ्याजवळ एक चिठी दिली. तींत माझी मुक्कामाची आणि जेवणाखाण्याची चांगली सोय करावी असें त्यांनीं लिहिलेलें होतें. त्यांच्या विनंतीचा आदरहि झाला.

खोपोली गांव सोडून चालत निघाल्यावर रस्त्यांत चौक नांवाचें एक गांव लागलें. तेथें सडकेच्या कांठाला एक मोठा दगडी चेंडू किंवा गोळा होता आणि कांहीं मुलें त्या गोळ्याजवळ जमलेलीं होतीं. म्हणून 'कसला रे मुलांनो हा वाटोळा दगड ?' असें मी त्यांना सहज विचारलें. 'तेव्हां नेताजी पालकरचा व्यायाम करायचा हा गोळा होता.' असें त्यांनीं मला सांगितलें. त्यांनीं नेताजी पालकराचें नांव काढतांच मागचा सगळा मराठी इतिहास आठवला आणि तो गोळा आपल्याला निदान जागचा हालवितां तरी येतो कीं नाहीं तें पहावें म्हणून घोंगडी-पिशवी खालीं ठेवून मी त्याला हात घातला. जमिनीपासून सरासरी इंचभरच मला तो उचलतां आला. पण एवढें कांहीं कमी नाहीं असें मला समाधान वाटलें.

त्यानंतर चालतां चालतां दिवस मावळण्याच्या सुमारास मी खोपोली गांवीं पोंचलों. अण्णा पाटणकरांचें घर सांपडायला वेळ लागला नाहीं. मी त्यांच्या दारांत उभा राहून 'अण्णा पाटणकर आहेत का ?' असें विचारलें तेव्हां एका सुवासिनीनें बाहेर येऊन, 'ते शेतावर गेले आहेत. कोण आहांत तुम्हीं ? काय काम आहे त्यांच्याशीं ?' असें मला उलट विचारतांच मी माझ्याजवळची पाटणकरांच्या नांवाची चिठी तिच्या हातावर टाकली. तिनें

घरांत जाऊन ती वाचून पाहिली आणि लगेच बाहेर येऊन मला 'या, आंत बसा.' असें सांगितलें, व 'चहा घेतांना ?' असें विचारलें. मी चहा घेणाराच आहें असें मानेनेंच मी म्हटल्यावर ती लगेच आंत गेली आणि पांच–दहा मिनिटांत तांब्याभर गरम पाणी आणि चहा घेऊन बाहेर आली. 'चालून आलां आहांत. ऊन पाण्यानें पाय शेकून धुतलेत म्हणजे आराम वाटेल.' असें मला सांगून तिनें गड्याला हांक मारली आणि 'पाहुण्यांना ओटीवर एक गादी आंथरून दे.' असें त्याला सांगून ती मला म्हणाली, 'चहा प्या, आणि विश्रांति घ्या. 'त्यांना' यायला आठ तरी वाजतील.' त्या सुगृहिणीच्या सूचनेप्रमाणें ऊन पाण्यानें मी हातपाय धुतले, चहा प्यालों आणि गादीवर आडवा झालों. बघतांबघतां मला झोंपहि लागली, 'अहो परांजपे, उठा. जेवायचं ना ?' असे एका पुरुषाचे शब्द ऐकूनच मी जागा झालों–अण्णा पाटणकरच मला उठवीत होते. ते शेतावरून घरीं आल्यावर कोणी तरी पाहुणा गादीवर प्रशस्त झोंपलेला त्यांनीं पाहिला तेव्हां आंत जाऊन आपल्या सौभाग्यवतीजवळ चौकशी केली, आणि खालापूरच्या ठोसरांनीं माझ्याबरोबर दिलेली चिठी तिनें त्यांना दाखवितांच त्यांचें समाधान झालें 'झोंपले आहेत ते झोपूं देत. एकदम जेवायच्या वेळींच उठवूं.' असें त्या उभयतांत ठरलें होतें. म्हणून पानें मांडलीं जाईपर्यंत मला ते घरीं आल्याची दाद लागूं दिलेली नव्हती.

## 'परांजपे बुडून मेले' असें 'नवाकाळ'ला कळवा

रात्रीं अगदीं कोंकणी पद्धतीचें जेवण झालें. कोळंबा तांदळाचा भात, तांदुळाच्या पिठाच्याच भाकरी, कुळीथांची उसळ, ताक घालून हिंगाची फोडणी दिलेलें उसळींतल्या जादा पाण्याचें कल्हण ( याला कोणी 'कढण' म्हणतात ) आणि पापड असा संच होता. मागून घेतलेल्या भातावर दह्याची मोठीशी 'कवडी'हि वाढली गेली. जेवतांना झालेल्या गोष्टींत माझें प्रवासवृत्त

आणि इतर हकीकत यांची मला पुनः उजळणी करावी लागली. सकाळीं उठल्यावर चहा वगैरे झाला आणि मी पुढचा मार्ग क्रमूं लागण्याची तयारी केली. तेव्हां अण्णा पाटणकर म्हणाले, "तुम्हीं पुण्यापर्यंत पायीं चालत निघाल्या-सारख मार्गांत पाहाण्यासारखें जें जें असेल तें पहात जाणेंच चांगलें नव्हे का? नुसता इतके मैल रस्ता पायांखालीं तुडविला असें होण्यांत काय अर्थ? आमच्या या खोपोलींतहि पाहाण्यासारखें कांहीं आहे. तें पहा आणि मग दुपारनंतर जा. शिवाय आज नव्याची पूर्णिमा असल्यामुळें आम्हाला ब्राह्मण सांगायला हवाच होता. तुम्हीं आयते आलेले आहांतच." नव्याच्या पौर्णिमेला (आश्विनी पौर्णिमेला) भाताच्या लोंगरांचीं आणि झेंडूच्या व कुर्डूच्या फुलांचीं मिळून तोरणें करून तीं दारावर लावण्याची आमच्या रत्नागिरी जिल्ह्यांतहि पद्धत आहे. त्या दिवशीं, नवीन पिकलेल्या तांदुळाचा भात करून देवाला त्याचा नैवेद्य दाखवितात, त्यावेळेपर्यंत भातें पिकलीं नसलीं तर अर्धवट तयार झालेल्या भाताचे चार दाणे तरी खिरींत टाकतात. शेवटीं पाटणकरांच्या म्हणण्याप्रमाणें मी माझ्या खांद्यावरची पिशवी खालीं ठेवली आणि त्यांच्याबरोबर त्यांच्या शेतावर गेलों. भातांचीं लोंगरें, कुर्डूचीं फुलें, झेंडूचीं फुलें, तिळाचीं फुलें वगैरे घेऊन आम्हीं घरीं आलों. त्यांच्या गड्यानें आंब्याचे टाळे आणि बांबूची ताजी तोडलेली काठी तेथें आणून ठेवलीं होतीच. ती काठी पिंजण्यांत आली आणि तिच्या कामट्यांचा उपयोग करून तोरणें तयार करण्यांत आलीं. नंतर पुनः एकदां चहा पिऊन आम्ही फिरा-यला आणि पेशव्यांनीं बांधलेल्या तलावावर पोहायला निघालों. पूर्वींच्या जमान्यांत घाटांवरून कोंकणांत आणि कोंकणांतून घाटांवर जाणाऱ्या सैन्याचा तळ पडण्याची खोपोलीला एक जागा होती. त्या वेळच्या लष्करी तळाची निशाणी म्हणून अजूनसुद्धां त्या माळावर घोड्यांचे पाय बांधून ठेवण्याच्या जमिनींत ठोकलेल्या खुंट्या आढळतात. पाटणकरांनीं ती जागा मला दाखवली आणि मग आम्ही दोघे तळ्यावर आलों. हें तळें 'तलाव' म्हणण्यासारखें मोठें असून चारहि बाजूंनी दगडांनीं (चिऱ्यांनीं) बांधून काढलेलें आहे. पाण्यांत उड्या मारून आम्ही पोहूं लागल्यावर, पोहतां पोहतां अंगा-

जवळ आलेले माझे पाय आंखडले. एकदां जवळ एकदां लांब असें होण्याची त्यांची गति थांबली. मला वाटलें आतां मी बुडून मरणार. माझें कांहीं तरी विनसल्याचें पाटणकरांच्याहि लक्षांत आलें. ते माझ्याजवळ यायला लागले. 'पाणी खाल्लेंत कीं काय ?' असेंहि त्यांनीं विचारलें. तेव्हां "मी पाणी कांहीं खाल्लेलें नाहीं. पण माझे पाय आंखडले आहेत. मी उताणा होऊन कांठाकडे जाण्याचा प्रयत्न करतों. तुम्हीं दूर राहून मला धीर द्या पण अगदीं जवळ येऊं नका. तुम्ही कुटुंबवाले आहांत. मी अविवाहित आहें. तुम्ही मला वांचवायला याल आणि तुमच्या गळ्याला मी चुकून मिठी मारली तर आपण दोघेहि मरूं. म्हणून तुम्ही दूरच रहा. मी बुडालोंच तर तीन पैशांचें कार्ड लिहून 'नवाकाळ' ला कळवा 'तुमचे परांजपे येथें बुडून वारले' असें' असें उत्तर देऊन मी पाण्यांतच उताणा झालों आणि कांठाकडे डोकें करून त्या दिशेनें पोहूं लागलों. कांठापासून फार दूर गेलेलों नसल्यामुळें मला पुन: एकदांचा कांठ गांठतां आला. माझ्या आसपासच पोहत राहिलेल्या पाटणकरांनींहि मग कांठावर पाय ठेवले. तलावाच्या पायऱ्यांवर बसून मी पाय चोळले आणि शिरा मोकळ्या झाल्यावर आम्ही लगेच घरचा रस्ता सुधारला.

## श्रीधरपंत टिळकांची भेट आणि दुग्धप्राशन

दुपारचें भोजन आटोपल्यावर मी पाटणकर कुटुंबाचा निरोप घेतला आणि घाट चढून खंडाळामार्गें लोणावळ्यास आलों. तेथें रस्त्यांत कुवलयानंद यांचा आश्रम होता. तेथें जाऊन स्वामीजींना भेटलों आणि रात्रीं मुक्काम करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनीं परवानगी दिली आणि 'अजून दिवस बराच आहे. येथून जवळच असलेलें 'वल्हवण'चें धरण पाहून या' म्हणून सुचविलें. त्याप्रमाणें मी तें धरण पाहून आलों. रात्रीं मंडळीबरोबर जेवायला बसलों पण पहातों तों कोणत्याच पदार्थांत तिखटहि नाहीं आणि मीठहि नाहीं. मी 'असें कसें ?' म्हणून माझ्या शेजारींच बसलेल्या एका

तरुणाला विचारलें तेव्हां तो म्हणाला, "हा ब्रह्मचारी आश्रम आहे, ब्रह्मचर्याला तिखट, मीठ, तेलकट पदार्थ वर्ज्य आहेत. म्हणून आम्ही ते पदार्थ वापरीत नाहीं. पण तुम्हाला एका पानावर मीठ देववितों.' त्याप्रमाणें मीठ मिळालें आणि मी जेऊं शकलों. मी चालून दमलों होतों म्हणून लवकर झोंपलों. सकाळीं उठल्यावर तेथें चहा वगैरे मिळणार नव्हताच. म्हणून स्वामीजींना नमस्कार करून चालूं लागावें असें मी ठरविलें आणि पिशवी घोंगडी उचलून मी 'स्वामीजी कुठें बसतात ?' असें एका तरुणास विचारलें. तो म्हणाला, 'स्वामीजी रोज सकाळीं समाधी लावण्याचा अभ्यास करीत असतात. तेव्हां त्यांची भेट कांहीं व्हायची नाहीं. तुम्ही पाहुण्यांच्या बुकांत सही करा, तुमचा पत्ता लिहा अन् जा.' त्याप्रमाणें मीं केलें आणि तेथून निघालों. त्यावेळीं बंद असलेला पांचसात खोल्यांतून ॐकाराचा आंत ओढलेला आणि बाहेर सोडलेला असा आवाज मला ऐकूं येत होता.

तेथून पुढें चालत जातांना, खोपोलीच्या पाटणकरांच्या सांगण्याप्रमाणें, मी कार्ल्याचीं लेणीं पाहिलीं (मळवली येथील भाजाचीं लेणीं मीं पूर्वीं पाहिलेलीं होतीं), वडगांव येथें श्रीधरशास्त्री घारे यांची शाळा पाहिली, तळेगांवच्या 'समर्थ विद्यालया'ला भेट देऊन तेथेंच भोजन केलें, आणि असें करण्यांत दोन दिवस घालवून मी चिंचवडच्या माझ्या जुन्या शाळेंत पोंचलों. मी ती शाळा सोडल्यानंतरच्या पांच वर्षांत तेथें पुष्कळच फेरफार झाले होते. पुस्तकी शिक्षण बंद पडल्यामुळें मुलांचा शुकशुकाट होता. शेतीचें आणि हातमागाचें काम करणारी पांच सात मुलेंच तेथें फक्त होतीं. तेथें एक दिवस मुक्काम केला. आमच्या वेळच्या जुन्या आठवणी सांगितल्या आणि मग तेथून कूच केलें. मुंबई सोडल्यापासून आठव्या दिवशीं संध्याकाळीं पुणें शहरांत पोंचलों.

त्यावेळीं लोकमान्य टिळकांचे धाकटे चिरंजीव श्रीधरपंत टिळक गायकवाड वाड्यांत त्यांच्या घरीं रहात असत. त्यांनीं त्यांच्या वडिलांचें स्मारक म्हणून त्यांच्या घरींच लोकमान्यांचा एक अर्धपुतळा बसविला होता. चौपाटीवर देशांतील लोकांनीं बसविलेल्या लोकमान्यांच्या पुतळ्यापासून,

खुद्द त्यांच्या घरीं त्यांच्या चिरंजिवांनीं बसविलेल्या, त्यांच्या (लोकमान्यांच्या) अर्धपुतळ्यापर्यंतच्या माझ्या प्रवासाची समाप्ती करण्यासाठीं मी तेथें गेलेला होतों. श्रीधरपंत टिळकांबद्दल माझ्या मनांत आधींपासूनच प्रेम होतें. लोकमान्य टिळक विलायतेहून परत आल्यावर, 'निषिद्ध' असें परदेश-गमन त्यांच्या हातून घडल्याच्या निरसनार्थ त्यांनीं जें प्रायश्चित घेतलें त्याबद्दल श्रीधरपंतांनीं 'ज्ञानप्रकाश' पत्रांत एक पत्र प्रसिद्ध करून निषेध व्यक्त केला होता. योग्य मुद्यांवर खुद्द वडिलांनाहि जाहीर विरोध करण्याइतकी बुद्धि आणि तितकें धैर्य श्रीधरपंतांत आहे हें मला त्यामुळें दिसून आलें होतें. टिळक व आगरकर यांजमध्यें दुभंगलें गेलेलें सामर्थ्य श्रीधरपंतांच्या रूपानें एकत्र आलें आहे असें मला वाटलें. पण दुदैवानें लोकमान्यांनीं आपल्या चिरंजिवांना हाताशीं धरलें नाहीं, संभाळून घेतलें नाहीं असेंच माझें मत होतें. रामभाऊ टिळकांनाहि मी ओळखीत होतों. श्रीधरपंताइतके ते बुद्धिमान् नसले तरी वडिलांचा आग्रहीपणा—हट्टीपणा—त्यांच्यांत उतरला होता. पण टिळक गेल्यावर 'केसरी'च्या विश्वस्तांशीं झगडण्यांतच बिचाऱ्यांचा जन्म केला. श्रीधरपंतांचें घरच त्यांच्याविरुद्ध जाऊं लागल्यामुळें अखेर त्यांनीं आत्महत्त्या केली. असो.

मी गायकवाड वाड्यांत गेलों आणि श्रीधरपंतांना भेटावयाचें आहे असें सांगितलें. तेव्हां माडीवर निरोप पोचून श्रीधरपंत खालीं आले आणि मला वर घेऊन गेले. तेथें त्यांनीं माझी चौकशी केली, प्रवासवृत्त विचारलें आणि माझ्या इच्छेप्रमाणें मला लोकमान्यांचा अर्धपुतळा दाखविला. त्या पुतळ्याचें दर्शन घेऊन झाल्यावर त्यांनीं मला दूध प्यायला दिलें. त्यांचा मुलगा जयंत (हल्लीचे 'केसरी'चे संपादक जयंतराव) तेव्हां ८–१० वर्षांचा असेल. तो तेव्हां त्यांच्या जवळच होता.

पुढें एक दिवस पुण्याला राहून मी मुंबईला परत आलों.

# दोपैंघांकीं कोणीच आम्हांला मारीना !

एक दिवस रात्रीं 'नवाकाळ' क्लबांतलीं आमचीं जेवणें आटोपलीं होतीं आणि आम्ही गप्पा मारीत बसलों होतों, तेवढ्यांत शीख व मुसलमान यांजमध्यें चकला स्ट्रीटवर दंगा झाल्याची बातमी आम्हाला समजली. महाशब्दे म्हणाले, 'चला, आपण बातमी आणायला जाऊं.' त्यावेळीं तेथें असलेल्या मंडळींतला दुसरा कोणीच उठेना. तेव्हां त्यांनीं माझें मनगट धरलें आणि म्हणाले, 'चला परांजपे ! आपणच दोघे जाऊं या—' त्याप्रमाणें आम्ही दोघे निघालों. गिरगांवच्या नाक्यावरून ठाकुरद्वार, चिराबझार, धोबीतलाव या मार्गानें क्रॉफर्ड मार्केटपर्यंत आल्यावर मग मात्र दंग्याची जाणीव होऊं लागली. कोठें कोणी मुसलमान पळतांना दिसे, तर कोठें शीख पळतांना दिसे, तर कोठें मारो, कोठें पकडो असे आवाज ऐकूं येत. तरी आम्ही पुढेंच चाललों होतों. कोठें मुसलमानांचा जमाव असला तर आम्हां दोघां पांढरपेशा हिंदूंना तिकडे हिंडतांना पहातांना ते म्हणायचे, 'इधर किधर आये हो, भाई ! इधर दंगा है। खालीपीली किधर फत्तर की चोट लगेगी नहीं तो पोलीस का मार पडेगा। अपनी वस्ती में चलें जाना।' कुठें शीखांचा जमाव लाठ्या परजीत असला आणि आम्ही त्यांच्या जवळपास गेलों तर ते आम्हांसा म्हणायचे "इधरसे भाग जाव। अभी इधर लढाई होगी। तुम नाहक मारे जाओगे।" अशा रीतीनें मारामारी करणाऱ्या दोन्ही पक्षांपैकीं कोणीहि आम्हाला मारीत नाहीं असें समजून आल्यामुळें आम्हाला जास्तच धीर आला आणि आम्ही त्या भागांत हिंडून सगळी बातमी गोळा करूं शकलों. शीख लोकांची एक अंत्ययात्रा त्या वाटेनें गेली असतां त्यांची कांहीं खोडी काढली गेली होती. पण त्यावेळीं त्यांच्या खांद्यावर शव असल्यामुळें त्यांनीं गम खाल्ली आणि अंत्यविधि उरकून परत जातांना त्यांनीं 'बदला' घ्यायला सुरुवात केली. त्यामुळें हा दंगा झाला असें आम्हाला समजलें.

पुढें ' नवाकाळ ' क्लब सोडून मी झावबाच्या वाडींत राहात असें. एक दिवस संध्याकाळीं तीन-चार वाजतां हॉटेलांत मी फराळ करीत असतां, ' धोबीतलावला भररस्त्यांत बलात्काराचा प्रकार झाला. ' असें कोणीतरी बडबडलें. त्याबरोबर ती बातमी खरी कीं खोटी हें जाणून घेण्याची मला उत्कंठा उत्पन्न झाली. पण तेव्हां हॉटेलांमध्यें संध्याकाळचीं वर्तमानपत्रें मिळतच असें नव्हतें. म्हणून मी चालत ' नवाकाळ ' कचेरीकडे जात होतों. मार्गांत हल्लींची परशुरामवाडी लागते तेथें तेव्हां ' ऑनेस्टी कंपनी ' ची जुनी इमारत होती व त्या इमारतीच्या एका कोपऱ्यांत एक छोटा कारखाना होता. तेथें विष्णुपंत खेर नांवाचे एक गृहस्थ एक छोटेंसें सायंदैनिक पत्र काढीत असत. 'नवाकाळ' कचेरीपर्यंत चालत जाण्याऐवजीं त्यांच्याकडेच चौकशी करावी म्हणून गेलों आणि ' अशी कांहीं बातमी आली काय तुमच्याकडे ?' असें त्यांना विचारलें. त्यांनीं ' नाहीं ' म्हटल्यावर मी पुढें निघून गेलों. पण संध्याकाळीं खोलीवर येतों तों चाळींतील मंडळी तेंच पत्र वाचीत होती आणि त्यांत माझा आणि ' नवाकाळ ' चा ' उद्धार ' होता. तो मजकूर असा होता:– " आमचा अंक तयार होत आला असतां ' नवाकाळ ' पत्रांत नोकरी करणारे परांजपे नांवाचे गृहस्थ आमच्याकडे आले आणि ' धोबी-तलाववर आतां इतक्यांत एका स्त्रीवर भररस्त्यांत बलात्कार झाला ' असें आम्हांस सांगू लागले. त्यांनीं आणलेली ती बातमी खरी समजून आम्ही छापून प्रसिद्ध करावी असा त्यांचा एकंदर आविर्भाव होता. असल्या खोट्या बातम्या छापल्याबद्दल आमच्यावर खटला व्हावा आणि आमचा ' सेल ' बसावा असा त्यांचा हेतू असावा. ' नवाकाळ 'मध्यें असे आणखी किती ' महापुरुष ' आहेत देव जाणे ! "

## ' नवाकाळ ' पत्रांतील चार माजी सहकारी

मी 'नवाकाळ' पत्रांत नोकरीला असतांना जी संपादक मंडळी होती. तीमध्यें शं. वा. देशपांडे हेच तेवढे मोठे क्रांतिकारक प्रवृत्तीचे ठरले

आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलमध्यें शिक्षक म्हणून नोकरी करीत असतांनाच ' नवाकाळ 'मध्येंहि उपसंपादक म्हणून त्यांना नोकरी मिळाली होती, आणि त्या वेळच्या त्यांच्या एकंदर सहकारी मंडळीपैकीं श्री. गो. बा. महाशब्दे यांच्याशींच त्यांची जास्त मैत्री दिसे. मीरत कटाच्या निमित्तानें–डांगे–निंबकर–जोगळेकर–मिरजकर ही चौकडी पकडली गेल्यानंतर, मास्तर शं. वा. देशपांडे एकदम कॉम्रेड एस्. व्ही. देशपांडे या स्वरूपांत प्रकट झाले आणि मुंबईच्या गिरणीकामगारांचें नेतृत्व त्यांनीं आपल्याकडे घेतलें. १९२८ सालीं मुंबईच्या गिरणी कामगारांनीं केलेला संप सतत सहा महिने चालविला गेला याचें कारण त्याच्यामागें तसेंच खंबीर नेतृत्व होतें. इतके दिवसपर्यंत दुसरा कोणताहि संप टिकलेला नाहीं. त्यावेळीं देशपांडे यांना अटक झाल्यानंतर संपसंचालन समितीच्या कचेरींत देशपांडे यांचे धाकटे बंधु ( तेहि एस्. व्ही. च आहेत. ) व गो. बा. महाशब्दे हेहि आढळूं लागले होते.

देशपांडे मास्तरांची ' उत्तम प्रकारें इंग्रजी भाषा शिकविणारे ' म्हणून प्रसिद्धि होती. गुरुजनांबद्दल आदर बाळगण्याची ' आर्यन ' ची परंपरा होती म्हणूनच केवळ नव्हे, तर व्यक्तिशः देशपांडे यांच्या गुणांमुळें विद्यार्थीवर्ग त्यांजवर प्रेम करीत असे. इंग्रजी भाषेवर देशपांडे यांचें इतकें प्रभुत्व होतें कीं पुढें लॉर्ड लिन्लिथगो यांच्या अध्यक्षतेखालीं विलायतचें शेतकी कमिशन हिंदुस्थानांत आलें असतां येथील शेतकरीवर्गाची बाजू मांडण्यासाठीं ते त्या कमिशनपुढें गेले तेव्हां त्यांचा एकंदर दर्शनी ' अवतार ' आणि इंग्रजी भाषेवरील ' कमांड ' या दोन परस्परविरोधी गोष्टी पाहून कमिशनच्या सभासदांना आश्चर्य वाटलें होतें व लिन्लिथगोंनीं तसें बोलूनहि दाखविलें होतें.

देशपांडे यांनीं ' नवाकाळ 'मध्यें कित्येक गोष्टी–( लघुकथा ) हि लिहिल्या होत्या. कारण तेव्हां दर रविवारीं आणि बुधवारीं ' नवाकाळ ' मध्यें गोष्टी प्रसिद्ध होत आणि प्रत्येक गोष्टीचे लेखकाला ७–७ रुपये मिळत. –'कामगारांना नेणारे मृत्यूचे दूत' या शीर्षकाखालीं अनेक गोष्टी लिहिण्याचा आपला विचार देशपांडे यांनीं एकदां माझ्याजवळ बोलून दाखविला होता. –' श्रीमंत मनुष्य आंथरुणांत लोळत पडून मरतो पण कामगाराचा पोटाचा

उद्योगसुद्धां त्याला मृत्यूच्या दाढेंत लोटणारा असतो.' असें ते म्हणत. निरनिराळ्या प्रकारच्या धंद्यांतील कामगारांचें जीवन कसें धोक्याचें असतें तें या संकल्पित गोष्टींत ते सांगणार होते.

त्यावेळचे 'नवाकाळ' पत्रांतले दुसरे एक संपादक म्हणजे भा. रा. धुरंधर हे होत. 'नवाकाळ' पत्रांत त्यावेळीं खोंचक व बोंचक व रोचक अशा टीकेचें 'संकीर्ण समालोचन' या नांवाचें जें एक सदर 'फरिस्ता' या लेखकाच्या नांवानें चालू होतें त्यांतलें बहुतेक लिखाण धुरंघर यांचें असे; पण मराठी वृत्तपत्रसृष्टीनें धुरंधर यांची जी आठवण ठेवली पाहिजे ती क्रिकेटच्या सामन्यांचें वृत्त देण्याच्या त्यांच्या पद्धतीबद्दल आणि क्रिकेटच्या खेळाबद्दलचे मराठी शब्द रूढ केल्याबद्दलच होय. कर्णधार, यष्टीरक्षक, पायचीत, धांवचीत, चौकार, षट्कार, त्रिफळा उडाला, दांडी उडविली वगैरे कितीतरी शब्द आज सर्वतोमुखी झाले आहेत. पण त्यावेळीं जे चौरंगी–पंचरंगी क्रिकेट सामने होत त्यांचें 'नवाकाळ'मध्यें वर्णन करतांना धुरंधर यांनींच ते शब्द तेव्हां रूढ केले आहेत.

आठवण होण्यासारखे त्यावेळचे 'नवाकाळ' मधले दुसरे एक उपसंपादक म्हणजे उमाजी भिकाजी राऊत हे होत. ते मोठे गांधीभक्त व खादीभक्त होते आणि पुढें दादामहाराज सातारकर नांवाच्या बुवांचेहि भक्त झाले होते. त्यांनीं 'नवाकाळ' मध्यें बऱ्याच गोष्टी लिहून गोव्यांतील राणे नांवाच्या मराठे सरदारांनीं पोर्तुगीजांविरुद्ध ५०–६० वर्षांपूर्वीं जीं बंडें केलीं होतीं त्यांची महाराष्ट्राला माहिती करून दिली होती.

कै. प्रभाकर हरी खाडिलकर ऊर्फ नाना खाडिलकर हे काका खाडिलकर यांचे दुसरे एक पुतणे 'नवाकाळ' मध्यें सहसंपादक होते. ते अर्थविषयक आणि व्यापारविषयक प्रश्नांवरच विशषेंकरून लिहीत. पुढें 'नवाकाळ' सोडून सांगलीकडे ते राहूं लागल्यावर 'महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषदे'च्या प्रमुख कार्यकर्त्यांमध्यें ते गणले जात.

## राम भरोसे 'नवाकाळ' सोडला

'नवकाळ' पत्रांत कांहीं लिहिण्याची मलाहि केव्हां केव्हां जी संधी मिळे ती कांहीं संपादकमंडळीच्या मेहेरबानीनें. त्यामुळें हक्कानें लिहायला मिळण्याचें क्षेत्र मी नेहमींच धुंडीत असे. त्या वेळीं 'संदेश'कार अच्युत बळवत कोल्हटकर यांचें 'सदेश' पत्र चालू होतें पण श्री. गंडभीर या नांवाचे गृहस्थ तेव्हां त्याचे मालक किंवा फिनान्सर होते. ठाकुरद्वार येथें 'सूर्यमहाल'-मध्यें गंडभीर यांच्या प्रेसमध्येंच तें छापलें जाई. तारांचे किंवा इंग्रजी पत्रांतील बातम्यांचें भाषांतर करणारा एक मनुष्य 'संदेश'मध्यें पाहिजे आहे असें मला समजलें तेव्हां मी 'साहेबांना' ( अच्युतरावांना ) जाऊन भेटलों. त्यांनी माझी 'ट्रायल' घेतली आणि मला काम देण्याचें कबूल केलें. पण मी किती जरी बातम्यांचें भाषांतर केलें तरी त्यांतल्या जेवढ्या 'संदेश'मध्यें प्रसिद्ध होतील त्यांबद्दल 'कॉलम'ला आठ आणे या हिशोबानें मला पैसे मिळतील अशी त्यांनीं मला अट घातली. तरीसुद्धां मी तें काम पत्करलें. प्रत्येक अंकांत एक ते दोन कॉलम इतक्याच जास्तींत जास्त बातम्या प्रसिद्ध होत. बाकीचा अंक 'साहेबां'च्या खास सदरांनीं भरलेला असे. 'बेटा गुलाबच्या कानगोष्टी', 'वेलदोड्याचे दाणे' अशीं कांहीं सदरांचीं नांवें होतीं. शिवाय 'साहेबांचा' एक एक अग्रलेखच केव्हां केव्हां दोन दोन पानें भरतील इतका असा लांबलचक असे. पण 'नवाकाळ'मधील ३० रुपयांच्या जोडीला महिन्याकांठीं आणखी २५–३० रुपये जरी मला मिळाले तरी ते मला तेव्हां जास्तच होते. दुपारीं १२ ते ४ 'नवाकाळ'मधलें काम झालें म्हणजे संध्याकाळीं मी 'संदेश'मध्यें कामाला जात असें.

पुढें हळूहळू काकासाहेबांच्या कानावर ही गोष्ट गेली. तेव्हां त्यांनीं मला बोलाविलें आणि म्हणाले, " तुम्हीं 'संदेश'मध्यें कामाला जात असतां हें खरें काय ? " मी मानेनेंच होकार दिला तेव्हां ते म्हणाले, " दैनिक वृत्तपत्रें पुष्कळदां एकेका बातमीवरच खपत असतात. तुम्ही दोन्हीकडे काम करीत राहिल्यास सहजीं इकडचें तिकडे बोलाल. तेव्हां तुम्हाला 'नवाकाळ'-

मध्यें राहायचें असलें तर दुसऱ्या वर्तमानपत्रांत नोकरी करून चालणार नाहीं."

त्यावर मी म्हणालों, " आपण म्हणतां तें खरें, पण मला इथें फक्त ३० रुपयेच मिळतात. अधिक पैशांची मला गरज आहे. संध्याकाळीं ४ वा. नंतर मला फुरसत आहे, आणि अधिक काम करण्याची मला शक्ति आहे म्हणून मी तें काम पत्करलें आहे. शिवाय माझ्या आवडीचें तें काम असल्यामुळें मला त्यांत कष्टसे वाटत नाहींत."

त्यावर काकासाहेब म्हणाले, " तुम्हीं दुसरें कोणतें काम करण्यास माझी हरकत नाहीं. पण इकडे नोकरी करतांना दुसऱ्या वर्तमानपत्रांत मात्र काम नाहीं करतां येणार ! "

त्यावर मी पुन: म्हणालों, " मग आपल्याकडेच मला कांहीं 'एक्स्ट्रा' काम द्या, किंवा नुसताच माझा पगार वाढवा किंवा मला संपादक मंडळींत घेऊन माझा मान तरी वाढवा. म्हणजे 'संदेश' सोडतांना मला दु:ख होणार नाहीं."

तेव्हां काकासाहेब म्हणाले, " तुम्हाला द्यायला माझ्याकडे दुसरें कसलें जादा काम नाहीं. तें असतें तर दिलें असतें. सध्यांच मला कर्ज झालेलें असल्यामुळें तुमचा पगार वाढवितां येणें मला शक्य नाहीं आणि 'फॉर प्रमोशन टु एडिटोरियल स्टाफ, यू वुईल हॅव् टु वेट."

त्यावर जरा काचरतच मी पुटपुटलों, " हातचें काम सोडावें लागूनच्या लागून माझी सर्व बाजूंनीं कुचंबणाच."

त्या शब्दांनीं काकासाहेबांना राग आला असावा. ते एकदम म्हणाले, 'इथल्यापेक्षां कुठें बेटर प्रॉस्पेक्टस तुम्हाला मिळत असले तर आय् वुईल रिलीव्ह यू ॲट एनी टाईम.'

इतक्या थरापर्यंत गोष्टी गेल्यानंतर मी त्यांच्याकडे राहणें म्हणजे माझ्या मनगटावर अगदींच केंस नसल्यासारखें ठरलें असतें. म्हणून 'तर मग मला आतांच जायचें आहे.' असा मी त्यांना जबाब दिला, आणि

त्यांनींहि लगेच माझा हिशोब देऊन मला मोकळा करण्याचा मॅनेजरांना हुकूम केला.

आधीं अशी रामभरोसे नोकरी सोडली आणि मग मी अच्युतरावांच्या भेटीस गेलों. त्यांना सर्व हकीकत सांगितली आणि आतां मला पगारी उप-संपादक म्हणून नेमा असें त्यांना म्हणालों. त्याप्रमाणें ५० रुपये पगारावर माझी नेमणूक झाली.

## नाटकें–सिनेमा पहाण्याची ‘ नवाकाळनें ’ हौस भागविली

मी आजपर्यंत ‘ पैसे खर्च करून असें ’ कोणतेंहि नाटक पाहिलेलें नाहीं. पण ‘ नवाकाळ ’ पत्रांत असतांना गंधर्व नाटक मंडळी व महाराष्ट्र नाटक मंडळी यांचीं बहुतेक सर्व नाटकें काकासाहेबांच्या चिठीमुळें मला पहायला मिळालीं होतीं. सर्वंच नोकरांना त्यांनीं अशीं आपलीं नाटकें दाखविलीं होतीं. जाहिरातींच्या निमित्तानें ललितकलादर्श मंडळी व बलवंत नाटक मंडळी यांचींहि कांहीं नाटकें मी त्यावेळींच पाहिलीं. त्यावेळीं कोणताहि नवा चित्रपट लागला म्हणजे ‘ नवाकाळ ’ ऑफिसकडून संपादक मंडळीला सेकंड क्लासच्या तिकिटाचे ( तेव्हां ७ आण्यांत सेकंड क्लासचें तिकीट मिळे. ) पैसे मिळत. त्यांनीं स्वतः चित्रपट पाहून घ्यावे आणि त्यावर अभिप्राय लिहावा, अशीं तेव्हां ‘ नवाकाळ ’ मध्यें पद्धत होती. त्यावेळीं असे सिनेमा पहाण्याची मला पुष्कळदां संधी मिळे. पुढें १९३१ सालीं वरेरकरमामांच्या-कडे मी कांहीं दिवस त्यांचा लेखक म्हणून असतांना ललितकलेचीं उरलीं सुरलेलीं नाटकें मामांनी मला दाखविलीं, पण शंकरराव सरनाईक आणि रघुवीर सावकार यांच्या कंपन्यांचें एकहि नाटक मी पाहूं शकलेलों नाहीं.

## गीतेंतला प्रत्येक शब्द श्रीकृष्णाचाच !

संदेश ’ पत्रांत नाटकाचीं भाषांतरें करण्यास मी जाऊं लागल्या नंत-रची गोष्ट. तेव्हां मुंबईस ‘ तरुण महराष्ट्रीय संमेलन ’ या नांवाचें

एक संमेलन भरलें होतें. मुंबईचे माजी मुख्यमंत्री कै. बाळासाहेब खेर ( हे तेव्हां नुसते सॉलिसिटर बा. गं. खेर होते ) हे त्या संमेलनाचे अध्यक्ष होते. आणि कै. डॉ. ग. य. चिटणीस हे स्वागताध्यक्ष होते. नर्मदा समर्थ (त्यावेळीं कुमारी ) यांनीं त्या समेलनांत एक ठराव मांडला होता. स्त्रियांना घटस्फो-टाचा अधिकार असावा अशी त्या ठरावांत मागणी करण्यांत आली होती. हें संमेलन भरविण्याचा विचार करण्यासाठीं लॅमिंग्टन रोडवरील तारा टेंपल लेनमध्यें अॅड्. वसंत भगवंत कर्णिक यांच्या घरीं पहिली बैठक झाली तेव्हां तिला मी हजर होतों, आणि नर्मदा समर्थ यांनीं मांडलेल्या ठरावामागची भूमिका मला माहीत होती आणि मान्यहि होती. डांगे, निमकर, जोगळेकर डॉ. काशीकर वगैरेंना मी तेव्हांच प्रथम पाहिलें.

पण, घटस्फोटाच्या हक्काची मागणी करणारा नर्मदा समर्थ यांचा ठराव त्या संमेलनांत मंजूर झाल्याचें समजतांच आमच्या ‘ साहेबांनी ’ ( कै. कोल्हटकर यांचें ‘ साहेब ’ हें सर्वमान्य टोपणनांव होतें ) देशावरच्या सर्व जिल्हापत्रांचे अंक गोळा केले आणि त्यांत काडीमोडीच्या जितक्या नोटिसा सांपडल्या तेवढ्या कापून काढून ‘ कंपोज ’ करायला दिल्या. ‘तुम्हीं मला नीट नांदवीत नाहीं, ’ ‘ तुम्हीं माझे फार हाल करतां, ’ ‘ तुम्हीं बाहेर ख्यालीपणा करणारे आहांत, ’ ‘ तुम्हीं स्त्रीपार्ट करणारे झाल्यापासून पुरुषी विकार तुमच्यांत उरले नाहींत. ’ वगैरे शक्य तों निरनिराळीं कारणें दिलेलीं असतील अशा त्या नोटिसा होत्या. ‘ संदेश ’च्या एका पानावर त्या सगळ्या नोटिसा भरून, शेजारच्या पानावर ‘ मुली तुला घटस्फोट कशाला पाहिजे ’ अशी पानभर हेडलाईन देऊन तिच्याखालीं साहेबांचा अग्रलेख प्रसिद्ध कर-ण्यांत आला होता. शेजारच्या पानावरील काडीमोडीच्या नोटिसांचा उल्लेख करून, ‘ काडीमोड ज्यांना पाहिजे असेल त्यांना ती मिळण्याची आपल्या चालीरीतीमध्येंच व्यवस्था असतांना, घटस्फोटाचा अधिकार देणारा कायदा करण्याची मुली तूं मागणी कां करतेस ? ’ अशा अर्थाचें पुढें त्यांत ‘ अर्ग्युमेंट ’ होतें. नंतर समाजाच्या स्थैर्याची जबाबदारी स्त्रियांवरच कशी आहे याचें विवेचन करतांना “ स्त्रियाच बिघडल्या म्हणजे वर्णसंकर होतो, आणि वर्ण-

संकर झाल्यावर सबंध समाजाचाच नाश होतो असें खुद्द भगवान् श्रीकृष्णांनींच गीतेमध्यें सांगितलेलें आहे." असें 'साहेबांनीं' लिहिलेलें होतें. हा लेख जेव्हां मी वाचला तेव्हां मला नवल वाटलें. 'श्रुतिबोधा' सारखें मासिक चालविणाऱ्या आणि ऋग्वेदाचें भाषांतर करणाऱ्या अच्युतराव कोल्हटकरांनीं अर्जुनाचे शब्द श्रीकृष्णाच्या तोंडीं घातलेले पाहून मला आश्चर्य वाटलें. स्त्रिया बिघडल्या तर वर्णसंकर होतो असें गीतेमध्यें वचन आहे खरें, पण तें श्रीकृष्णाचें नसून अर्जुनाचें आहे.

स्त्रीषु दुष्टासु **वार्ष्णेय** जायते वर्णसंकर:।

असें अर्जुनानें म्हटलेलें असून, हे वार्ष्णेया (म्हणजे वृष्णिकुलोत्पन्ना श्रीकृष्णा) असें कृष्णाला उद्देशून संबोधनहि त्यांत वापरलेलें आहे. दुसऱ्या दिवशीं ऑफिसांत गेल्यावर साहेबांना या चुकीच्या उल्लेखाबात विचारलें तेव्हां ते म्हणाले, 'उं:, त्यांत कांहीं बिघडलें नाहीं. गीतेंतले सगळे शब्द श्रीष्णाचेच असेंच लोक समजतात.

## मोर नाचतो म्हणून लांडोर नाचतो

'संदेश' कार अच्युतराव कोल्हटकर यांनीं 'वत्सला वहिनी' या टोपण नांवानें लिहिलेलीं पत्रें म्हणजे मराठी भाषेंतलें एक लेणें आहे. तसलें बाळबोध वळणाचें, घरगुती वाक्प्रचारांनीं भरलेलें असें लेखन मराठी भाषेंत फारसें झालेलेंच नाहीं. नाहीं म्हणायला 'सख्या हरी' या मथळ्याखालीं स्त्रीच्या टोपण नांवानें दत्तोबा बांदेकरांनीं लिहिलेलीं पत्रें वाचनीय आणि मनोरंजकहि आहेत पण त्यांचे विषय जरा उथळच आहेत.

अशीं पत्रें लिहिण्याचा आणि तीं 'संदेश' पत्रांतच प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न डॉ. माधव मैराळ सुरतकर या नांवाच्या गृहस्थांनीं गेला. ते एक हिंदुत्वाभिमानी पुढारी होते आणि चौपाटीवर खिस्ती मिशनऱ्यांची सभा सुरू झाली कीं हेहि तिथें जवळच हिंदुधर्माबद्दलक्षीं व्याख्यानें देऊं लागत. ज्ञाडजूड व उंचसें शरीर, तसेंच मोठे, डोकें, जाडचा मोठ्या मिश्या, आणि

डोक्यावर उंचशी काळी 'फर कॅप' असें त्यांचें थोडक्यांत वर्णन करतां आलें असतें. तसें ते चांगले होते पण लेखन हें आपलें क्षेत्र नव्हे हे कांहीं त्यांना समजलें नसावें. त्यांनीं "मी 'संदेश' मध्यें कांहीं तरी लिहितों" म्हटलें आणि आमचे 'साहेब' भिडस्त म्हणून त्यांनीं त्यांना परवानगी दिली. 'चिंगीचीं गंगीला पत्रें' या मथळ्याखालीं त्यांचीं चारदोनच पत्रें प्रसिद्ध झालीं होतीं. "मी आतां न्हाती धुती झाल्यें आहे." असें त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या एका पत्रांत चिंगीनें गंगीला लिहिलें होतें. या एका नमुन्यावरूनच त्या पत्रांतील बाकीच्या मजकुराची कल्पना येईल.

## माझ्या पहिल्या अग्रलेखाची कहाणी

संदेश'कार अच्युतराव कोल्हटकरांकडे मी नोकरीस असतांना त्यांनीं मला चारपांच अग्रलेखहि लिहूं दिले होते. 'हार्वे–नरीमन' केसमध्यें नरीमन निर्दोषी ठरून सुटल्याचें संध्याकाळच्या वृत्तपत्रांत जाहीर होतांच 'साहेब' मला म्हणाले, "परांजपे तुम्हीं ही केस 'फॉलो' केली आहेना ? मग त्या त्या केसच्या निकालावर लिहा. अग्रलेख म्हणून घालणार आहें." त्याप्रमाणें मी लिहायला सुरुवात केली आणि एकएक 'कॉपी' वाचून पाहून ते ती लगेच 'कंपोझिंग'ला पाठवूं लागले. हल्लीं 'मरीन ड्राइव्ह' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या जागीं पूर्वीं समुद्र होता. तो मागें हटवून नवी जमीन तयार करण्याची 'बाँबे रिक्लेमेशन स्कीम' नांवाची सरकारी योजना त्यावेळीं अंमलांत येत होती. हार्वे नांवाचा एक इंग्रज अधिकारी त्या योजनेचा मुख्य कार्यवाहक होता. त्याच्या एकंदर कार्यपद्धतीवर वीर. के. एफ. नरीमन यांनीं त्यावेळीं खूप झोड उठविली होती आणि म्हणून त्यानें त्यांजवर अब्रुनुकसानीची फिर्याद केली होती. नरीमन यांनाच शिक्षा होते कीं काय अशी लोकांना भीती वाटत होती पण सुदैवानें ते निर्दोषी ठरून सुटले होते. तेव्हां त्यांचें अभिनंदन या अग्रलेखांत करण्यांत आलें होतें.

'साहेबां'नीं सगळच्या कॉप्या पाहून मजकूर पास केला होता आणि 'रात्री ८ वा. छापावयाच्या पुणें आवृत्तींत तो घालून तो जाऊं द्या.' असें सांगून 'चाबूकस्वार' नांवाच्या त्यांच्या दुसऱ्या एका साप्ताहिकाच्या कामासाठीं ते निघून गेले होते. रात्रीं ८ वा. सुमार असेल. मशीन सुरूं होऊन २–४ शें अंक छापूनहि झाले होते. तोंच एक तरुण गृहस्थ ऑफिसांत आले ( म्हणजे 'साहेबां'कडे फुकट कांहीं तरी लिहायला येणारी जीं मंडळी होती त्यांतलेच ते एक होते आणि 'साहेबां'नीं मला अग्रलेख लिहूं दिला हेंहि त्यांना माहिती होतें. ) आणि मशीनजवळ जाऊन त्यांनीं एक अंक हातांत घेतला. त्यावर जराशी नजर टाकल्यासारखें करून ते खेकसले,, 'कोणी लिहिलें आहे हे असलें ?' मी होतोंच तिथें. म्हणून मी उत्तर दिलें, "मी लिहिलें आहे आणि साहेबांनीं प्रत्येक 'कॉपी' वाचून पाहिली आहे." त्यावर ते म्हणाले, तुम्हांला काय होतें वाटेल तें लिहायला. खटला झाला तर साहेबांवर होईल." त्यांनीं लगेच मशीन थांबवायला सांगितलें आणि फोरमनला उद्देशून ते म्हणाले, "अग्रलेख काढून तेथें दुसरा कांहीं तरी मजकूर भरा. पुणें आवृत्ती तशीच जाऊं दे. तोपर्यंत मी दुसरा अग्रलेख लिहून देतों.' फोरमन जयरामभाई देसाई कंपॉझिटर व मशीनवाले सगळे माझ्याकडे बघायला लागले. मी त्यांना म्हणालों, मशीन बंद राहूं दे. पण 'पेज' सोडवूं नका. मी मशीनवरचा अंक 'साहेबां'कडे नेतों आणि त्यांची सही आणतों. मग दुसऱ्या कोणाचें ऐकायचें कारण नाहीं.' त्याप्रमाणें मी मशीनवरचा अंक घेतला आणि ठाकुरद्वारवरून गिरगांवच्या नाक्यावर जाण्यासाठींहि ट्राम पकडली. साहेबांपुढें जाऊन त्यांना घडलेलें सर्व सांगितलें आणि 'तुमचें अगदीं बरोबर आहे; पण मला सगळीं माणसें सांभाळायचीं आहेत. म्हणून अग्रलेख मी पुनः नीट पहिल्याचें निदर्शक अशी कांहीं तरी दुरुस्ती करतों. तेवढी करवा आणि अंक रवाना करा.' आम्ही त्याप्रमाणें केलें आणि मग तें गृहस्थ मुकाट्यानें घरीं गेले.

## गांगुली–असफअल्ली विवाह हा ‘ डेंजर सिग्नल ’

संदेश मध्यें मी लिहिलेला दुसरा अग्रलेख गांगुली नांवाच्या हिंदु मुलीनें बॅ. असफअल्ली नांवाच्या मुसलमानाशीं विवाह केला त्याबद्दलचा. या विवाहाची बातमी आल्याबरोबर साहेब म्हणाले, ‘ परांजपे, लिहा बघूं भर भर. असफअल्लीला असा झाडून टाकाल कीं यंव ! ‘ आपलाच दाम खोटा, मग असफअल्लीला कसें झाडायचें, साहेब ?’ मी विचारलें. ‘ कसेंहि झाडा. या विवाहाविरुद्ध आपल्याकडे अग्रलेख यायलाच पाहिजे. ’ तेव्हां कॉंग्रेसच्या म्हणजेच देशसेवेच्या कामासाठीं म्हणून हिंदु कुटुंबांतील मंडळींशीं संघटण वाढवून शेवटीं एक हिंदु मुलगी फितविण्याचें असफअल्लीनें जें कृत्य केलें त्यामुळें ‘ मुसलमान म्हणजे धोक्याचा कंदील असें समजून, त्यांना आपल्या समाजापासून चार हात दूरच ठेवलें पाहिजे. ’ असें प्रतिपादन करणारा मी अग्रलेख लिहिला होता. ज्या एका कामासाठीं नेमलें असेल तें करीत असतां किंवा तें करीत असल्याचें दाखवून दुसराच कांहीं उद्योग करणें म्हणजे विश्वासघात होय असें मत व्यक्त करून, आपल्याच विद्यार्थिनीशीं लग्न जमविणाऱ्या एका प्रसिद्ध गणितज्ञ प्रोफेसरांचें मी उदाहरण दिलें होतें. अरुणा गांगुली व असफअल्ली यांच्या विवाहाबद्दल तेव्हां खूपच टीका झाली होती आणि जी एकंदर प्रतिक्रिया झाली होती तिचा ‘ टाइम्स ऑफ इंडिया ’ पत्रांत तेव्हां ‘ थ्रू इंडियन आईज ’ हें सदर लिहिणाऱ्या लेखकानें परामर्षहि घेतला होता. ‘ अरुणा–असफअल्ली विवाहामुळें मुसलमानाला धोक्याचा कंदील समजावें. ’ असें जें ‘ संदेश ’ नें म्हटलें होतें तेवढेंच नेमकें त्यानें ‘ डेंजर सिग्नल ’ या पोट हेडिंगाखालीं घेतलें होतें.

## छत्रपति शिवाजीमहाराजांचें साहेबाच्या हस्तें स्मारक

पहिल्या महायुद्धांत मराठी सैनिकांनीं अगदीं हातघाईच्या लढाईत जर्मनांच्या मनगटावर मनगट घांसून त्यांचा पराभव केला पण त्याचें

इंग्रजांनीं कांहीं चीज केलें नाहीं. त्यामुळें मराठा समाजांत बराच असंतोष माजला होता. मराठा संस्थानिकांचें मराठा समाजांतील वजन घसरत चाललें होतें. तेव्हां सर्वच मराठी जनतेला प्रिय आणि पूज्य असलेल्या छत्रपति शिवाजी महाराजांचें स्मारक करावें असें मराठा संस्थानिकांनीं आणि मराठा समाजांतील इतर कांहीं पुढाऱ्यांनीं ठरविलें होतें. पण पहिलें महायुद्ध संपून दहा वर्षे होत आलीं. तरी तें प्रत्यक्षांत उतरलें नव्हतें. अखेर १९२८ सालीं मुंबईचा तेव्हांचा गव्हर्नर सर लेस्ली विल्सन याच्या हस्तें पुण्याला छत्रपतींच्या पुतळ्याचें अनावरण होण्याचें जाहीर झालें. याच गव्हर्नराच्या कारकीर्दीत बारडोलीमध्यें शेतसारावाढीविरुद्ध जोराचा सत्याग्रह चालू होता, आणि सरदार पटेलांना अटक होऊन कैदेची शिक्षा झाली होती. म्हणून निदान या गव्हर्नरच्या हातून तरी शिवस्मारकाचें उद्घाटन होऊं नये असें पुष्कळांचें मत होतें. मी तेव्हां ' संदेश ' पत्रांतच नोकरीला असल्यामुळें मी साहेबांना म्हणे, ' या समारंभावर वहिष्कार घालण्याचा आपण प्रचार करू या. ' पण तें त्यांना मान्य होईना. ' शिवाजी महाराजांना ' चोर–लूटारू ' म्हणणाऱ्या लोकांतीलच एक जण आतां त्यांचे गोडवे गाणार आहे. म्हणून हा समारंभ स्वागतार्हच आहे. ' असें ते म्हणत. तेच मुख्य संपादक असल्यामुळें ' पुण्याला शिवाजी महाराजांच्या दर्शनास चला ' असें मोठमोठे मथळे घालून त्यांनीं त्या उद्घाटन–समारंभाचा प्रचार केला. पण त्या समारंभावर वहिष्कार घालण्याची जनतेला विनंति करणारें माझें पत्रहि ' संदेश ' च्या त्याच अंकांत प्रसिद्ध करण्याचा दिलदारपणाहि त्यांनीं दाखविला. ' शिवाजी महाराज मोठे आहेत. ' असें म्हणायला कोणी, कोणत्याहि उद्देशानें, तयार होवो; आपले महाराष्ट्रीय लोक कसे हुरळून जातात त्याचा प्रतापगडावरील शिवस्मारकाच्या वेळीहि आपल्याला अनुभव आला आहेच !

## ' श्री लोकमान्य ' मध्यें नोकरी आणि पहिला विवाह

सन १९२९ साल अहमदाबाद येथें आणि ३०–३१–३२ हीं सालें

सत्याग्रहाच्या चळवळींत व तन्निमित्त तुरुंगांत गेल्यावर मी पुनः मुंबईंत नोकरीधंदा करण्यास मोकळा झालों. त्यावेळीं दत्तोपंत सावरकर, घाणेकर व चांदोरकर असे तिघे मिळून ' श्री लोकमान्य ' नांवाचें दैनिक वर्तमानपत्र काढीत असत. ठोसर, परब, बा. ल. साठे या मंडळींबरोबरच मला त्या पत्रांत नोकरी मिळाली होती. पण पगार फक्त २५ रुपये होता. ' सड्या माणसाला एवढा पगार सहज पुरेल. ' असें तेव्हां सावरकर मला म्हणाले होते. अशी तेव्हां मी नोकरी करीत असतां माझा पहिला विवाह झाला. माझ्या सासुरवडच्या मंडळींनें दोन्हीं बाजूंचा खर्च करून मला ६० रुपये हुंडा दिला होता, आणि ' मी नुसता लग्नाला उभा राहीन ' असें मी सांगितलें असतांहि मी लुगडीं–खण, सोंवळें एवढ्याची सोय केली होती. लग्नाच्या वेळी मांडवशोभेपुरते एका मित्रांकडच्या सोन्याच्या बांगड्या आणि नथ नेली होती.

## तत्त्व आणि व्यवहार

सन १९३४ सालीं आचार्य जावडेकर यांच्या संपादकत्वाखालीं मुंबईंत 'नवशक्ति' दैनिक सुरू झालें. चिंचवडच्या शाळेंत माझे शिक्षक असलेले गोपाळ आबाजी ऊर्फ तात्यासाहेब देशपांडे आणि कम्युनिस्ट पुढारी विनायकराव भुस्कुटे हे दोघे त्या पत्रांत सहसंपादक होते. मी तेव्हां ' श्री. लोकमान्य ' पत्रांत नोकरीला असल्याचें तात्या देशपांड्यांना कळल्यावर ते मला भेटले आणि म्हणाले ' अरे अना, तूं कां आमच्याकडे येत नाहींस ? ' मी म्हणालों, ' मला कोण तिकडे घेणार ? 'नवशक्तीं ' तली संपादक मंडळी न. र. फाटकांनीं शिफारस केलेली आहे ना ? ' ते म्हणाले, ' तूं ये. मी सांगतों जावडेकरांना. ' त्याप्रमाणें मी जावडेकरांना जाऊन भेटलों. तात्या देशपांडे यांनींहि त्यांना माझ्याबद्दल सांगायचें तें सांगितलें होतें. तेव्हा आचार्य जावडेकर म्हणाले, ' मी तुमची थोडी ' ट्रायल ' घेतों. हें पहा. हें एन्. एम् जोशींचें पत्रक आहे. त्याचें सबंध भाषांतर केलें तर तें निदान एक कॉलम

होईल. पण आमच्याकडे त्यांना द्यायला एक कॉलममध्यें या पत्रकाचा चांगला सारांश काढून द्या." त्याप्रमाणें मी सारांश काढून दिला आणि ४० रु. पगारावर माझी नेमणूक झाली. तेव्हां मराठी वर्तमानपत्रांत संपादकांना फारच थोडे पगार होते. खुद्द आचार्य जावडेकर हे मुख्य संपादक असूनहि त्यांना फक्त २०० रुपये पगार होता आणि तात्या देशपांडे व विनायकराव भुस्कुटे या दोघा सहसंपाकांना ७५–१०० रुपये पगार होता. तेव्हां माझ्या-सारख्या माणसाला फक्त ४० रु. च दिले गेले यांत नवल नाहीं.

एक दिवस दुपारीं मी ऑफिसांत तारांचीं भाषांतरें करीत असतां, 'नवशक्ती' च्या मॅनेजरखात्यांत जाहिरात–मॅनेजर असलेला एक म्हातारा पारशी माझ्याजवळ आला आणि 'एवढ्या इंग्रजी मजकुराचें मराठी भाषांतर करून द्या.' असें मला सांगूं लागला. त्या इंग्रजी मजकुरावर मी नजर टाकली तों तो एका सिनेमाबद्दल अभिप्रायासारखा मज़कूर (राइटप) असल्याचें मला दिसलें. तेव्हां मी त्या मॅनेजरला म्हणालों, 'या मजकुराचें मराठी भाषांतर जर 'नवशक्तीं' त प्रसिद्ध झालें तर तो आमचा–'नव-शक्ती' च्या संपादकांचा–अभिप्राय आहे असें समजलें जाईल. कोणी तरी अभिप्राय लिहायचा आणि तो आमच्या नांवावर खपायचा हें मला मान्य नाहीं. मी मुळींच या मजकुराचें भाषांतर करणार नाहीं.' त्याबरोबर तो पारशी जावडेकरांकडे गेला आणि त्यानें माझ्याविरुद्ध तक्रार केली. तेव्हां जावडेकर मला म्हणाले, ' अहो, तुमचें तत्त्व बरोबर आहे पण व्यवहार म्हणून कांहीं असतोच ना ! द्या त्यांना हवें आहे तें भाषांतर करून !"

पुढें पुण्याला महाराष्ट्र कॉंग्रेसनें 'लोकशक्ति' पत्र काढायचें ठर-विले तेव्हां जावडेकर, देशपांडे, भुस्कुटे आणि आणि फडके 'नवशक्ति' सोडून पुण्याला गेलेच.

## 'नवशक्तीं' तील 'बॅड बॉय्'

आचार्य जावडेकर पुण्याला 'लोकशक्ति' पत्राचे संपादक होण्यासाठीं

३२०२५ २।१।७५
१०२८ २५६२

गेल्यावर (लोकमान्यांचें स्मारक म्हणून काकासाहेब खाडिलकरांच्या संपादकात्वाखालीं १९२१ सालीं निघालेल्या अगदीं पहिल्या दैनिक 'लोकमान्य' मधील उपसंपादक) दत्तात्रय गणेश सावरकर हे 'नवशक्ती' चे संपादक झाले. जावडेकर 'नवशक्ति' सोडून जाणार असें समजल्यापासूय सावरकर हे 'नवशक्ती' च्या मालकांकडे-एस्. सदानंद यांजकडे खेपा घालीतच होते. पण सावरकरांमध्यें संपादकाचें गुण नाहींत म्हणून नव्हे तर त्या वेळीं एका लांछनास्पद आरोपाखालीं खटला चालू होता म्हणून सदानंद त्यांना होकार देईनात. तथापि सावरकरांवरच्या खटल्याचा लवकरच निकाल लागून ते सुटले आणि 'नवशक्ती' च्या संपादकपदीं त्यांची नेमणूक झाली. पण त्यांचा पगार फक्त १५० रुपये ठरला. 'नवशक्ति' पत्रांत तेव्हां संपादकांना वेळेवर पगार मिळत नसत. केव्हां केव्हां तीन-तीन महिन्यांचा पगार राहिलेला असे, आणि मग संपादकांनाहि संप करावा लागे. आचार्य जावडेवर हे संपादक असतांनाहि असें करावें लागलें होतें. जावडवरांचा अग्रलेख, देशपांडे-भुस्कुटे यांची स्फुटें, आमची तारांची भाषांतरें वगैरे सर्व मजकूर तयार करावयाचा; पण 'आज पगार मिळाला तरच मजकूर कंपोजला दिला जाईल' असें मॅनेजमेंटला कळवावयाचें असें करावें लागे. मग संध्याकाळपर्यंत कांहींतरी हातावर पडे.

सावरकर 'नवशक्तीचे' संपादक म्हणून आले तेव्हां नगरचे दादा चौधरी, कोंकणांतील 'देवाचें गोठणें' येथील बा. ल. साठे, आणि मुंबईचे म. ब. ताम्हणकर व आठवले या चौघांना आपल्याबरोबर घेऊन आले. घाटे, चिंदरकर व मी असे आम्ही मुंबईकर पहिल्या स्टाफपैकीं शिल्लक होतों. सावरकर आल्यानंतरहि पगाराच्या बाबतींतली पूर्वीची तऱ्हा कायम होती. शेवटीं मी एक दिवस सावरकरांना म्हणालों, 'अहो, इथें संप म्हटल्याखेरीज पगार मिळत नाहीं. म्हणून आपण संप करूं या. प्रत्यक्ष काम साफ बंद पाडावयाचें नसलें तरीहि संपाचा मंत्र इथें म्हणावा लागतो. आचार्य जावडेकरसुभां असेंच करीत असत.' पण त्यांना माझें म्हणणें मान्य झालें नाहीं. बाकीची संपादक मंडळीहि कांहीं जोर करीना. शेवटीं

मी एकटयानेंच एस्. सदानंदना पत्र लिहिलें आणि 'तीन महिन्यांच्या पगारापैकीं कांहींतरी पैसे जर तीन दिवसांत माझ्या हातीं पडले नाहींत तर मी संप करीन.' असें त्यांना कळविलें. माझ्या पत्राचा उपयोग तर झालाच नाहीं पण त्याचें कांहीं उत्तरहि मिळालें नाहीं. शेवटीं तीन दिवसांची मुदत संपतांच मी एकटयानेंच संप सुरू केला.

एकटयानेंच संप करणें म्हणजे नोकरीलाच मुकायला तयार होण्यासारखें होतें. पण मी इतका वैतागण्याला तसेंच कारण होतें. मला पगार मिळत असे अवघा ४० रुपये. 'नवशक्ती'च्या १० संपादकांपैकीं त्यावेळीं एक तरी मूल असलेला असा मी एकटा. तेव्हां झावबाच्या वाडींत माझें बिऱ्हाड होतें. खात्यावर किराणामाल व धान्य उधार मिळे, दूधवाला त्याचें बिल तुंबू देई, खोलीचें भाडेंहि थकवितां येई (एकदां माझ्याविरुद्ध स्मॉल-कॉज कोर्टांत 'इजेक्टमेंट सूट' दाखल केला गेला होताच) आणि ट्रामला पैसे नसल्यामुळें ठाकुरद्वारपासून चालतच ऑफिसांत जात असें, आणि चालतच घरी परत येत असें. तरीपण स्वतःची लाज वाटण्यासारखी गोष्ट केव्हां केव्हां घडे. सुटीच्या दिवशीं बायकोला व लहान मुलीला घेऊन पायींच कोठें फिरायला किंवा कोणाला भेटायला जातांना फुलांच्या वेणीसाठीं ती फुलांच्या दुकानाजवळ घुटमळूं लागल्यास, चटकन एक आणा टाकून (एक आण्यांतहि तेव्हां चांगल्या वेण्या मिळत) तिला वेणीसुद्धां जर आपण घेऊन देऊं शकलों नाहीं तर 'कशाला आपण पुरुष आणि कशाला ती नोकरी ?' असें वाटे. म्हणूनच वैतागूनच मी एकटयानें संप केला होता.

संप केल्यावर मी रोज ११ वा. ऑफिसांत जाऊन माझ्या खुर्चीवर बसायचा आणि पांच वाजतां उठून घरीं यायचा. असें आठ दिवस चाललें होतें. सावरकर माझ्या वांटयाचें काम इतर संपादकांत वांटून देऊन काम भागवून घेत. तेव्हां मी त्यांना म्हणालों, 'माझा संप सुरू होऊन आठ दिवस झाले. सदानंद अजून कांहीं दाद देत नाहींत. तेव्हां तुम्ही सहानुभूतीचा संप तरी करा, नाहींतर मी काम न करतां हल्लीं स्वस्थ बसत असतों अशी त्यांच्याकडे तक्रार तरी करा.' सहानुभूतीचा संप करण्यास त्यांनीं नकार

दिला पण तक्रार करायला मात्र ते तयार झाले. ते म्हणाले, 'मी तक्रार करतों पण त्यामुळें तुमची नोकरी सुटली तर?' 'मी एकटयानेंच संप केला तेव्हांच मी नोकरी सोडायची तयारी केली आहे.' असें मी त्यांना सांगतांच त्यांनीं सदानंद यांस चिठी लिहिली. 'परांजपे यांनीं ×× तारखे-पासून काम करण्याचें बंद केलें आहे. पण त्यांनीं पगार न मिळाल्याची सबब सांगितल्यामुळें मला त्यांना सक्तीनें कामाला लावतां येत नाहीं.' असें त्यांनीं या चिठींत सदानंदांना कळविलें होतें त्यावर सदानंदांचें उत्तर आलें, 'आपण त्यांना (परांजपेना) सक्तीनें कामाला लावूं शकत नाहीं हें खरें आहे, पण त्यांनीं केलेल्या संपाच्या दिवसांचा पगार मात्र आम्ही त्यांना देणार नाहीं.'

सदानंदाचें हें उत्तर सावरकरांनीं मला दाखविलें आणि म्हणाले 'आतां काय करणार? त्यांचें उत्तर हें असें आहे.' मी म्हणालों, 'आतां संपाच्या पुढची पायरी?' लगेच मी सदानंदांना दुसरी चिठी लिहिली. "माझा तीन महिन्यांचा पगार येणें असल्यामुळें तुम्हाला आधीं कळवून मी संप केला होता. पण मला कांहीं तरी पैसे देण्याची व्यवस्था करण्या-ऐवजीं, माझ्या संपाच्या दिवसांचा पगार दिला जाणार नाही असें आपण लिहिलें आहे. आपण अगदीं निष्ठुर दिसतां. म्हणून आतां आपल्या 'केबीन-मध्यें सत्याग्रह करण्याचें मी ठरविलें आहे."

या चिठीखालीं मी एक ताजकलम जोडला होता व त्यांत "बाकीचे सगळे संपादक काम करीत असता मी एकटाच असा 'बॅड बॉय' निघालेलों दिसतों. तेव्हां माझा पगार जर मला आजच्या आज मिळेल तर आपली नोकरी सोडण्याचीहि माझी तयारी आहे." असें मी लिहिलें होतें.

सदानंदांना माझी ही चिठी पोचल्यापासून पांच मिनिटांत मला उत्तर आलें. 'तुमचे पैसे संध्याकाळीं ५॥ वा. तुम्हाला मिळतील. इतर सहकाऱ्यांना त्रास देऊं नका.'

त्याप्रमाणें संध्याकाळीं १२० रु. चा चेक घेऊनच मी ऑफिसांतून खालीं उतरलों.

# ' मि. परांजपे, यू आर अन्‌लकी '

मी एकाटयानें संप करून ' नवशक्ति ' सोडल्यानंतर, बाकीच्या उपसंपादकांनीं पगाराशिवाय तसेच आणखी तीन महिने रेटले. पण मग त्यांचाहि नाइलाज होऊन त्यांनीं संप केला. त्यामुळें मुख्य संपादक सावरकर यांनींहि राजीनामा दिला. नोकरी सोडतांना मला जो १२० रुपयांचा चेक मिळाला होता त्या पैशांत पहिलीं बिलें चुकवून मी माझी पत राखली होती. बायकोसह एकदां मी सिनेमा पाहिला होता. तिच्याजवळ दिलेल्या २–४ रुपयांतून पालेभाजी–फळभाजी आणतांना (' नवशक्तीं'तला पगार तुंबलेल्या काळांत झाब्बाच्या वाडींतील वोडसांच्या दुकानांतून खात्यावर मिळणाऱ्या कांद्याबटाटयांचीच भाजी आम्हीं रोज खात असूं.) एकादी वेणीहि ती आतां आणूं लागली होती. नोकरी सुटली तरी पैसे मिळाल्यामुळें आमच्या घरांत आनंदीआनंद होता. तेवढयांत 'श्रीलोकमान्य' पत्रांत तीस रुपये पगाराची मला पुनः नोकरी मिळाली. तीस तर तीस पण ते वेळेवर मिळत. हें पत्र आतां आठवडयांतून फक्त तीन दिवसच प्रसिद्ध होत असे.

अशी परिस्थिति असतां, ता. ३० जुलै १९३५ या दिवशीं ' नवशक्ति ' पत्राच्या कंपोझिंगचे कॉंट्रॅक्टर जयरामभाई देसाई मला, ' श्रीलोकमान्या ' च्या ऑफिसांत भेटायला आले, आणि सदानंदसाहेबांनी तुम्हांला आतांच्या आतां भेटायला बोलाविलें आहे म्हणाले. ' असे काय झालें ? म्हणून मी विचारल्यावर त्यांनीं सर्व हकीकत सांगितली. ' सावरकरानीं राजीनामा दिल्यावर ' नवशक्ती 'साठीं दुसरा कोण मराठी माणूस ' संपादक ' म्हणून मिळेल ?' असें सदानंदनीं देसाईंना विचारलें होतें. आणि ' मोठा नांवलौकिकवाला असा कोणी तुम्हांला मिळणार नाहीं आणि वर्तमान पत्राचा अनुभव असलेला असा जो एक मिळण्यासारखा आहे त्याला तुम्ही नेमणार नाहीं. ' असें देसाईनीं त्यांना उत्तर दिलें होतें. ' मी ज्याला नेमणार नाहीं असें तुम्हांला वाटते तो कोण ?' असें सदानंदांनीं त्यावर विचारतांच देसाईनीं माझें नांव सांगितलें

तेव्हां ' वो, इधरसे झगडा करके गया वो परांजपे !' असें सदानंदाच्या तोंडून एकदम उद्‌गार निघाले होते. पण जयरामभाईंनीं जेव्हां त्यांना सांगितलें कीं ' तुम्हांला संपादक पाहिजे तर तेवढेच एक मिळण्यासारखे आहेत. दुसरा कोणीहि तुमच्याकडे येणार नाहीं. ' तेव्हां ' अच्छा बुलाव उसको ' असें सदानंदांनीं सांगितल्यामुळेंच देसाई मला बोलवायला आले होते.

लगच मी जयरामभाईंच्या बरोबर सदानंदांकडे गेलों. ' मुख्य संपादकाचें काम तुम्हांला करतां येईल ?' असा सदानंदानीं मला पहिला प्रश्न केला. मी म्हणालों ' होय येईल. ' ते म्हणाले, " पूर्वीं कधीं हें काम केलेलें नाहीं तुम्ही ? मग कसें ?' मी म्हणालों, ' नांवलौकिक झालेल्या कोणातरी व्यक्तीचें नांव मुख्य संपादक म्हणून घातलेलें असलें तरी आम्ही उपसंपादक लोक पडद्यामागें राहून सगळें कांहीं शिजवून तयार करीत असतों. बुद्धि अन् मेहनत आमची असते, नांव मात्र त्यांचें होतें. ' तेव्हां सदानंद म्हणाले ' रातको दस बजे मिलो. अभी मुझे बाहर जाना है । ' आमचें बोलणें इथेंच थांबलें आणि सदानंद बाहेर निघून गेले. मी कांहीं वेळ कंपोझिंग खात्यांतच बसून होतों.

सावरकर आणि दुसरी संपादक मंडळी तेव्हां ' नवशक्ती ' ऑफिसजवळच्या एका रेस्टॉरंटमध्यें बसली होती. सावरकरांच्या जागीं संपादक म्हणून नेमण्यासाठीं सदानंदानी मला बोलाविलें आहे आणि मीहि त्यांना भेटायला आलों आहे हें त्यांना कळलें होतें. त्यांनीं कोणाबरोबर तरी निरोप पाठवून मला त्या हॉटेलांत बोलाविलें. मी तिथें गेलों तेव्हां सावरकर म्हणाले, ' आम्हीं सगळे वाहेर पडलों असतां तुम्ही काम करायला तयार झालांत ?' त्यावर मी म्हणालों, ' मागें मला एकट्याला संप करण्याची वेळ आली आणि नोकरीहि सोडावी लागली तेव्हां तुमची कोणाची मला मदत मिळाली नाहीं. तरीपण आतां ज्यांनीं संप केला आहे त्यांच्या जागीं नेमणूक होण्यासाठीं मी जात नाहीं. तुम्हीं स्वतः राजीनामा दिला आहे, म्हणून तुमच्या जागीं नेमणूक झाली तरच मी तें काम करणार आहें. ' ' तुमची

मर्जी ' एवढेंच त्यावर सावरकरांचें उत्तर मिळालें आणि ' नवशक्ति ' छापखान्यात मी परत आलों.

रात्रीं १० वा. सदानंद भेटले तेव्हां 'आठ दिवसांचें काय घ्याल ?' असें तें मला विचारूं लागले. मीं विचारलें, 'आठच दिवसांचें कां ?' ते म्हणाले, 'पुढें ' नवशक्ति ' चालू ठेवावी कीं नाहीं तें आमचें अजून ठरावयाचें आहे. ' त्यावर मी म्हणालों, 'नवशक्ति ' चालू ठेवावयाची नाहींच असें पुढें ठरलें तर ठरलें. पण आज मी हातांत लेखणी घेईन ' तीं मुख्य संपादकाच्या जागेचें 'अपॉइंटमेंट लेटर ' घेऊन घेईन; एरवीं नाहीं.' 'पण तुमचा स्टाफ कुठें आहे ? पहिल्या उपसंपादकांनीं तर संप केला आहे.' सदानंदांनीं त्यावर लगेच प्रश्न केला. 'आजचा अंक मी एकटा काढतों. त्यांतच उपसंपादक पाहिजेत म्हणून जाहिरात दिली तर हवे तितकेजण येतील. ' मी लगेच उत्तर दिलें. इतकें बोलणें झाल्यावर सदानंद म्हणाले, ' मी जरा बाहेर जाऊन येतों. तोंपर्यंत थांबा. ' मला पुन्हां थांबावें लागलें. मनांत विचार केला, आपली नेमणूक झाली तर आपल्याला एकट्याला सगळें काम करावें लागणार आहे. त्यासाठीं आतांपर्यंत बातम्या तरी काय आल्या आहेत त्या पाहून ठेवूं या. म्हणून कंपोझिंग खात्यांतून उठलों आणि वरच्या मजल्यावर संपादक खातें होतें तेथें गेलों. पण संपवाल्या उपसंपादकांपैकीं एक दोघें तेथें बसलेले होते. त्यांनीं मला आंत येण्याची मनाई केली. तेव्हां पुन्हां माझ्या कंपॉझिटर मित्रांत जाऊन बसलों आणि चहा–चिवडा वगैरें मागवून रात्रीच्या जेवणाचें काम भागवून टाकलें.

रात्रीं १२ वा. च्या सुमारास सदानंद परत आले. पुनः आमचें बोलणें सुरू झालें. ते म्हणाले, ' तुम्ही पगार काय घ्याल ?' मी म्हणालों, " पगाराच्या प्रश्नाबाबत तडजोडीला मी तयार आहें. पहिल्या संपादकांना ( जावडेकरांना ) तुम्ही २०० रु. देत होतां, दुसरे संपादक सावरकर १५० रुपये पगारावर काम करीत होते. मला १०० रुपये दिलेत तरी पुरे. ' त्यावर सदानंद म्हणाले, ' तीन महिन्यापूर्वींच ४० रुपये पगारावर तुम्ही माझ्याकडे काम करीत होतां ' आणि आज एकदम १०० रुपये तुम्हांला

पाहिजेत ?' 'अहो पण तेव्हां मी नुसता उपसंपादक होतों. आतां मुख्य संपादक होणार आहे, हें तुम्हीं विसरतां ?' मीहि लगेच प्रत्युत्तर केलें.

शेवटीं रात्रीं १ वा. मला 'अपॉइंटमेंट लेटर' मिळालें आणि कंपॉझिटरांनीं माझी लाज राखण्यासाठीं कमालीच्या तडफेनें काम केल्यामुळें ४ पानी अंक सकाळीं ७ वा. प्रसिद्ध झाला आणि ता. ३१ जुलै ११३५ हा दिवस माझ्या आयुष्यांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखा दिवस ठरला.

त्या अंकावर संपादक म्हणून जरी माझें नांव प्रसिद्ध झालें तरी मुद्रक व प्रकाशक म्हणून सावरकरांचेंच नांव होते. माझ्या नांवानें अंक प्रसिद्ध होतांच त्यांनीं कोर्टांत जाऊन त्यांचें डिक्लेरेशन रद्द केलें. म्हणून नवें डिक्लेरेशन करण्याची आमच्यावर पाळी आली. आजि तें करायला गेलेले गृहस्थ 'मुद्रक म्हणून ३००० रु. आणि प्रकाशक म्हणून ३००० रुपये अशी एकूण ६००० रुपये जामीनकी आधीं भरण्याचा' हुकूम झाल्याचें वृत्त घेऊन आले. त्या दिवशीं संध्याकाळपर्यंत पैशांसाठीं सदानंदांनीं खूप धडपड केली पण जामीनकीची रक्कम भरतां येत नाहीं आणि म्हणून दुसऱ्या दिवशीं 'नवशक्ति' प्रसिद्ध करतां येत नाहीं असें दिसतांच सदानंद मला म्हणाले, 'मि. परांजपे, यू आर अन्लकी.'

'नवशक्ति' पत्र बंद पडलें तरी मला एक महिन्याचा पगार देण्याचें सदानंद यांनीं कबूल केलें होतें. सुमारें ६ महिन्यांच्या अवधींत थोडेथोडे करीत १०० रुपयांतले माझे ६५ रुपये त्यांनीं फेडले !

## 'अमेरिकन जर्नॅलिझम्'चा अनुभव

'नवशक्ति' पत्र बंद पडल्यावर पुण्याचे डॉ. ना. भि. परुळेकर यांचें दैनिक 'स्वराज्य' नांवाचें पत्र मुंबईंत सुरू झालें. गोविंद मंगेश लाड हे त्या पत्राचे संपादक होते. तेथें मी ३–४ महिने नोकरीला होतों. त्यावेळीं, हल्लीं बंद पडलेल्या 'विशाल महाराष्ट्र' चे संपादक हरी विठ्ठल देसाई हेहि माझ्यासारखेच तेथें एक उपसंपादक होते. डॉ. ना. भि. परुळेकर हे अमे-

रिकेंत वृत्तपत्र व्यवसाय शिकलेले असल्यामुळें त्यांचा 'जर्नॅलिझम' अमेरिका–छाप आहे हें आम्हांला माहित होतें. (मला तर त्यांची आधींचीहि कांहीं माहिती होती. ते पुण्याच्या 'अनाथ विद्यार्थी गृहा'चे विद्यार्थी असतांना एम्. ए. च्या टर्म्स भरीत असतां, चिंचवडला बाळूकाका कानिटकराच्या शाळेंत ते आणि डॉ. ग. श्री. खैर हे दोघे निवांतपणें अभ्यास करण्यासाठीं म्हणून येऊन राहिले होते. मी तेव्हां तेथें विद्यार्थी होतों आणि आमचे कांहीं वर्ग हे दोघे घेत असत.) तेव्हां दिवाळीचा मोसम जवळ आला आणि मुंबईंत फटाक्यांचीं दुकानें जिकडेतिकडे दिसूं लागलीं. अशा वेळीं परुळेकरांनीं मला आणि देसाईंना आपल्यापुढें बोलाविलें आणि म्हणाले, 'मुंबईंत फटाक्यांचीं एकूण दुकानें किती आहेत याचा रिपोर्ट आणा.' आम्ही म्हणालों, 'करायचा काय रिपोर्ट? काय उपयोग त्याचा? आणि एकूण दुकानें किती आहेत त्याची माहिती जमवायला हिंडायचें तरी किती? मुंबईचें क्षेत्र काय लहान आहे?' त्यावर परुळेकर म्हणाले, 'अमेरिकेंत एकाद्या नटीचे केंस किती आहेत याचीसुद्धां तेथले पत्रकार बातमी मिळवितात. आपण मुंबईंत फटाक्यांचीं दुकानें एकूण किती आहेत त्याचीसुद्धां बातमी मिळवूं नये?' त्यांचें हें म्हणणें ऐकून आम्हाला हंसूं आलें. पण ते मालक असल्यामुळें आम्ही त्यांच्यासमोर हंसलों नाहीं आणि त्यांनींहि तो विषय मग सोडून दिला.

त्यानंतर एक दिवस माझी रात्रपाळी होती. त्या रात्रीं ज्या बातम्या आल्या होत्या त्यांतलीच जरा बरीशी बातमी बघून तिचीच हेडलाईन (पहिल्या पानावरचा पानभर मथळा) देऊन मीं अंक काढला. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं पुन: मी रात्रपाळीला हजर झालों तेव्हां डॉ. परुळेकर कचेरींत होते. त्यांनीं मला बोलाविलें आणि 'किती पातळ आहे ही तुमची हेडलाईन?' असें म्हणत त्यांनीं सकाळचा अंक माझ्यापुढें ठेवला. त्यावर मीं म्हणालों, 'खालीं जी बातमी आहे तिच्याबद्दलची हेडलाईन देतांना, मीं वापरले आहेत तेवढेच शब्द वापरणें शक्य होतें. शिवाय 'सिक्स लाईन' टाइपांच्या हेडलाइनींत दोन शब्दांमध्यें इतपत 'स्पेस' राहिली तरी कांहीं

९२३८९ ५१

विशेष वाईट दिसत नाहीं.' 'याच हेडलाइनीत, आणखी एकादा शब्द नसता वाढवितां आला?' डॉ. परुळेकर म्हणाले आणि अमेरिकन पेपर्समध्यें हेडिंगें कशीं 'क्लोज' असतात तें मला सांगूं लागले. त्यावर 'अमेरिकेंत कांहींहि असो, आपल्याकडल्या 'जर्नॅलिझम' ची ही पद्धत नाहीं. जागा भरण्यासाठीं अनावश्यक शब्द हेडलाइनींत भरावयाचे कीं काय?' असें मी बोलून जातांच डॉ. परुळेकर चिडले, आणि म्हणाले, 'तुमची स्वत:बद्दल भलतीच कल्पना दिसते!' मी ताडकन् उत्तर दिलें, 'हा धंदा कांहीं मी आजच करीत नाहीं. या पत्राचे मुख्य संपादक म्हणून ज्यांचें नांव आहे ते गो. मं. लाड इंग्रजी शाळेंत शिकत असतील तेव्हां मी वर्तमानपत्रांत प्रत्यक्ष काम करीत होतों.'

येथें हें सांगितलें पाहिजे कीं खुद्द लाड यांच्याकडून असा आमचा कधीं अपमान झाला नाहीं. पण वरिष्ठांचा (परुळेकरांचा) हुकूम खालीं पोंचविणें त्यांना भागच पडत असल्यामुळें, माझ्याकडून सुक्याबरोबर ओल्याचाहि उगाच उद्धार झाला. या प्रकारानंतर परुळेकरांकडे अधिक दिवस काढणें मला शक्य झालें नाहीं.

## 'देवाशिवाय रिकामा झालेला लोकशाही पक्षाचा देव्हारा'

'स्वराज्य' पत्रांतली माझी नोकरी सुटेपर्यंत दत्तोपंत सावरकरांनीं 'लोकमान्य' पत्र सुरूं केलें होतें. फक्त दोन रुपये खर्च करून त्यांनीं एका मराठी वर्तमानपत्रांत 'लोकमान्य' पत्राची जाहिरात दिली आणि साधनसामुग्री जमविण्यास सुरुवात केली. पहिल्याच अंकांत 'नवशक्ती'तील 'बॅड बॉय'बद्दल मजकूर येणार असल्याचेंहि त्या जाहिरातींत म्हटलेलें होतें. पण प्रत्यक्ष 'लोकमान्य' सुरू झाल्यावर, सावरकारांनी माझ्याबद्दल कांहीं लिहिलें नाहीं, एवढेंच नव्हे तर 'स्वराज्य'ची नोकरी सोडून मी त्यांच्याकडे माझ्या कांहीं माजी सहकाऱ्यांचा विरोध असतांहि मला नोकरीस ठेवून घेतलें.

सावरकर स्वतः फार करून अग्रलेख लिहित नसत. मुख्यतः बातम्या खुसखुशीतपणें देण्याकडे त्यांचें विशेष लक्ष असे. वर्तमानपत्रांतलें ' न्यूज एडीटर'चें काम त्यांना आवडे. तसेंच कोर्टांत गेलेल्या 'भानगडीं'च्या खटल्यांचीं सविस्तर वृत्तें वाचकांना आवडतात म्हणून तीं 'लोकमान्यां'त देण्याचाहि ते आग्रह धरीत. त्यामुळें, इंग्लंडचा राजा आठवा एडवर्ड यानें एका अमेरिकन घटस्फोटितेच्या प्रेमासाठीं राज्यत्याग केला त्यावेळच्या सगळ्या घडामोडींचें साग्रसंगीत वृत्त तेव्हां फक्त 'लोकमान्य' पत्रांतच सगळ्यांत जास्त दिलें जात असे.

पण राजकीय पक्षांच्या बातमींत ते उदासीन होते असा त्याचा अर्थ नव्हे. लहान पक्षाच्या बातम्यावर त्यांचें विशेष लक्ष असे. महाराष्ट्रांतील पुढाऱ्यांमध्यें तात्यासाहेब केळकर यांच्याबद्दल त्यांना फार प्रेम वाटे. म्हणून त्यांनीं एकदां एका बातमीच्या मथळ्यांत तात्यासाहेब केळकरांना देवाची उपमा दिली होती. त्याचें असें झालें:—त्यावेळीं लोकशाही स्वराज्य पक्षांत अंतस्थ मतभेद उत्पन्न झाले होते, आणि त्यासाठीं ' सरदार गृहां'त त्या पक्षाच्या पुढाऱ्यांची बैठक भरली होती. त्या पक्षाचे माजी अध्यक्ष अणे, चालू अध्यक्ष केळकर, ल. ब. भोपटकर, दा. वि. गोखले, रामभाऊ मंडलिक, रामराव देशमुख, ना. रा. बामणगांवकर वगैरे त्या पक्षाची बहुतेक सर्व श्रेष्ठ मंडळी उपस्थित होती. पण बैठक गुप्त होती. वर्तमानपत्रांच्या वार्ताहरांना मज्जाव होता, ' तरीसुद्धां तेथें जा आणि बातमी मिळवून आणा. " असें सावरकरांनीं मला सांगितलें. ' केळकर त्यांच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देणार अशी कुणकुण आहे. तेव्हां त्या बातमीवर मुख्य लक्ष ठेवा. ' असें मला सांगून त्यांनीं मला सरदारगृहांत पिटाळलें. मीं तेथें गेलों तेव्हां हातांत कागद-पेन्सील वगैरे कांहीं घेतलें नव्हतें. तरीहि लोकशाही स्वराज्य पक्षाच्या पुढाऱ्यांची बैठक चालू असलेल्या खोलीकडे मला कोणी फिरकूं देईनात. सुदैवानें दुसरे कोणीच वार्ताहर तेथें आलेले नव्हते. म्हणून बैठकीच्या दरवाजावरचा मनुष्य इकडेतिकडे कुठें गेला कीं मी हळूच त्या दरवाजाला कान लावून कांहीं कांहीं वाद ऐकत असें. त्यावरून तात्यासाहेबांनी राजी-

नामा दिला आहे आणि त्यांनीं तो परत घ्यावा म्हणून प्रयत्न चालू आहे, एवढें मला समजलें. पण खात्री करून घ्यायला हवी होती. तेवढ्यांत तात्यासाहेब केळकर दरवाजा उघडून बाहेर आले आणि संडासाच्या बाजूला चालले. मीहि त्यांच्यामागें जाऊन एका ठिकाणीं गॅलरीच्या कठड्याला टेकून उभा राहिलों, आणि तात्यासाहेब संडासाकडून परत आल्यावर 'आपण राजीनामा दिला हें खरें ना ? मला फक्त कन्फर्मेशन पाहिजे आहे.' असें त्यांच्याजवळ जाऊन म्हणालों. तेव्हां 'तसें समजायला हरकत नाहीं' एवढेंच सांगून ते तेथून निसटले. पण माझें काम झालें होतें. ऑफीसांत गेल्यावर लोकशाही स्वराज्य पक्षांतील मतभेदांची (ते मतभेद नक्की काय होते तें मला आज आठवत नाहीं) पार्श्वभूमी देऊन अखेर त्या पक्षाचे अध्यक्ष केळकर यांनीं त्यांच्या पदाचा राजीनामा दिला अशी बातमी लिहून तयार केली.

सावरकरांच्या हातांत तो मजकूर देतांच ते म्हणाले, "हीच आपली उद्यांची हेडलाईनची बातमी." आणि त्यांनींच हेडलाईनीचे शब्द लिहून दिले ते असे होते:—'देवाशिवाय रिकामा झालेला लोकशाही पक्षाचा देव्हारा !'

## 'बातमीचा जोशीबोवा केलात अगदीं !'

दत्तोपंत सावरकर यांनीं 'लोकमान्य' पत्र सुरू केलें तेव्हां 'नवशक्ति' पत्राच्या माजी उपसंपादकांपैकीं घाटे, चिंदरकर, म. ब. ताम्हनकर व आठवले यांच्याखेरीज नामजोशी आणि लक्ष्मण हरि जोशी नांवाचे दोन गृहस्थ होते. त्यांतले नामजोशी हेच पुष्कळदां अग्रलेख लिहीत. श्री. श्रीकांत पालेकर हे वृत्तपत्रव्यवसायांत याचवेळीं शिरले. त्यानंतर मला घेतलें गेलें. पालेकर व घाटे हे रिपोर्टर होते. आम्ही बाकीचे तारांचीं भाषांतरें करीत असूं. नंतर शं. वि. सालये, हरिभाऊ आपटे आणि किनरे हे तिघे ग्रॅज्युएटस् या धंद्यांत आले. त्यावेळीं मुसोलिनीचा फॅसिझम युरोपांत हैदोस

घालीत होता. त्यावेळच्या जगांतल्या प्रमुख व्यक्तींचीं विलायती साप्ताहि-कांत आलेलीं चित्रें पाहून आम्हीं आपटे याना मार्शल ग्रॅझियानी (मुसो-लिनीचा एक सेनापति) आणि किनरे यांना जनरल फ्रँको (स्पेनचा हुकूमशहा) म्हणत असूं. सालये यांनीं एकदां 'लोकमान्य' जो धरला तो त्याच्या अगदीं अखेरीपर्यंत. आपटे यांनीं 'लोकमान्य' पत्रांत कांहीं महिने नोकरी केली आणि मग सरकारी मिलिटरी अकौंटस् खात्यांत त्यांना नोकरी मिळून ते कराचीला गेले होते. पण तेथूनहि ते परत आले आणि नवीनच निघालेल्या 'लोकसत्ता' पत्रांत चिकटले. तेथेंच वाढतां वाढतां आज ते त्या पत्राचे 'न्यूज एडिटर' आहेत. 'लोकमान्य' पत्र 'सौराष्ट्र' ट्रस्टकडे आल्यावरहि बरेच दिवस सालये यांनीं रिपोर्टरचे काम केलें आणि मग ते जे 'न्यूज एडिटर' झाले ते 'लोकमान्या'च्या इतिश्रीपर्यंत त्याच जागीं होते. दत्तोपंत सावरकर यांनीं वृत्तपत्र सुरू केलें खरें पण तो बिनभांडवली धंदा असल्यामुळें, कागद कसा आणायचा? नोकरांचे पगार कसे द्यायचे याची त्यांना नेहमींच विवं-चना करावी लागे. संपादकांचे पगार २–२, ३–३ महिने तुंबत. माझा तीन महिन्यांचा पगार जेव्हां तुंबला तेव्हां मी सावरकरांच्या हाताखालची नोकरीहि सोडली.

त्या वेळीं आमच्याबरोबर लक्ष्मण हरि जोशी नांवाचे एक गृहस्थ (जुन्या काळचे एक कामगार पुढारी व्ही. एच. जोशी यांचे धाकटे बंधु) होते असें मी वर सांगितलेंच आहे. त्यांच्या संबंधीचीच ही गोष्ट आहे. 'लोकमान्य' पत्रांत 'न्यूज एडीटर'चें काम स्वतः दत्तोपंत करीत. त्यावेळीं 'अॅसोसिएटेड प्रेस ऑफ इंडिया' ही कंपनी बातम्या पुरविण्याचें काम करीत असे. त्यावेळीं हल्लींप्रमाणें वृत्तपत्रांच्या कचेऱ्यांत 'टेलिप्रिंटर्स' बसविलेलीं नसत. आपला मनुष्य ए. पी. आय. कडे पाठवून बातम्यांचें पुडकें आणवावें लागे. असें पुडकें आलें कीं सावरकर स्वतः त्यांतल्या बातम्या पहात आणि भाषांतर करणाऱ्या उपसंपादकांना त्यांतल्या बातम्या वांटून देत. ते देतील तेवढ्या बातम्या संपविणें हें भाषांतऱ्याचें काम असे. आमच्याकडे दिलेल्या बातम्या वाचल्यावर त्यांच्या महत्त्वानुसार त्यांतील

मराठा ग्रंथ सं... स्थळप्रत
अनुक्रमांक 32025 दि. ...

मजकुराचें भाषांतर करण्यांत केव्हां आमचे चार–चार तासमुद्धां जायचे, पण जोशीबुवा पहावें तों नेहमीं त्यांचें काम संपवून मोकळे ! बातमीचा संक्षेप–संक्षेप म्हणजे किती करायचा ? संध्येंतील आरंभीच्या 'केशवायनमः' या वाक्यांतील 'के' आणि 'श्रीकृष्णार्पणमस्तु' या शेवटच्या वाक्यांतील 'स्तु' अशीं दोन अक्षरें मिळून 'केस्तु' म्हटल्यानें संध्या झाली असें म्हणणारे पूर्वी कांहीं जण आढळत. त्यांचेंच अनुकरण ल. ह. जोशी हे बातम्यांच्या बाबतींत करीत. त्यामुळें एकादी बातमी अगदीं संक्षिप्तांत ( म्हणजे महत्त्वाचा भाग गाळूनहि ) केली गेल्यास 'बातमीचा अगदीं जोशीबोवाच केलात ? ' असें आम्हीं एकमेकांना म्हणत असूं. एकादी बातमी अगदीं संक्षिप्तांत केली गेल्याचें दिसलें तर आजहि सालये यांना आणि मला त्या जोशीबुवांची आठवण होते !

## काँग्रेस राज्याच्या आदल्या रात्रीं अधांतरीं वसती

दत्तोपंत सावरकरांच्या 'लोकमान्य'ची नोकरी सोडली तेव्हां मुंबईंतील वृत्तपत्रव्यवसायाबद्दल मन विटलें होतें. ठरलेल्या दिवशीं हातांत पगार पडण्याची जेथें शाश्वती नाहीं तेथें नोकरी कशाला करा असें वाटूं लागलें होतें. शिवाय कोंकणांत राहून आपल्या मागासलेल्या भागाच्या उद्धारासाठीं कांहींतरी करावें अशी मनांतली नेहमींचीच तळमळ जागी होती म्हणून 'लोकमान्य' सोडल्यावर कोंकणांत जावयाचें मी ठरविलें. तेव्हां 'लोकमान्य'मधील नामजोशी नांवाचे सहकारी मला म्हणाले, 'रत्नागिरीच्या 'बलवंत'ला एका चांगल्या अनुभवी माणसाची गरज आहे. मीं पूर्वी तेथें काम केलेलें आहे. मी तुम्हांला ओळखपत्र देतों. बहुधा गजाननराव पटवर्धन तुम्हांला ठेवून घेतील' रत्नागिरी हें गांव माझ्या आडीवरें गांवापासून फक्त २२ मैल दूर आहे त्यामुळें रत्नागिरीस राहणें म्हणजे माझ्या गांवीं राहाण्यासारखेंच होय. म्हणून नामजोशींचें ओळखपत्र घेऊन मी सहकुटुंब मुंबई सोडली. तो मार्च महिना होता. घरीं गेल्यावर

थोडी विश्रांति झाली आणि मग रत्नागिरीस जाऊन पटवर्धनांना भेटलों. नामजोशींच्या पत्राप्रमाणें मला त्यांनीं 'बलवंत'मध्यें उपसंपादक म्हणून नेमून घेण्याचें कबूल केलें. पण मुंबईपेक्षां रत्नागिरीची राहणी स्वस्ताईची म्हणून दरमहा २५ रुपयेच पगार देऊं असे सांगितलें. (मुंबईस 'लोकमान्यां'त ४० रुपयेच पगार होता.) अर्थात् मीहि तें कबूल केलें 'ता. १ एप्रिल १९३७ ला कामावर हजर व्हा.' अशी सूचना घेऊन मी आडीवऱ्यास परत आलों.

ता. १ एप्रिल १९३७ रोजीं भारतांत सर्वत्र कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें अधिकारारूढ व्हावयाचीं होतीं. त्या दिवशींच माझी 'बलवंत' पत्रांतील नोकरी सुरू व्हावयाची होती. त्या दिवशीं पहांटे घरांतून बाहेर पडावयाचें आणि गांवखडीस जाऊन मोटार पकडून पुढें रत्नागिरीस जावयाचें असा पहिला बेत होता. पण ता. ३१ मार्च रोजीं दुपारीं वामकुक्षी, चहा वगैरे झाल्यावर गप्पा चालू असतां आई म्हणाली, 'अरे बाळू, उद्यां तूं नोकरी-साठीं घरांतून बाहेर पडणार म्हणतोस, पण उद्यां तर तुझा घातवार! मुद्दाम घातवारींच तूं घरांतून बाहेर पडणार? परवां गेलास तर नाहीं का चालणार?' मी म्हटलें, 'ज्या दिवशीं हजर व्हायला सांगितलें आहे त्या दिवशीं हजर न राहून कसें चालेल? उद्यां बाहेर पडणें बरें नसेल तर आजच बाहेर पडतों. रात्रीं गांवखडीस वस्ती करीन आणि सकाळीं पुढें जाईन.' माझा घरचा मुक्काम एका रात्रीनें कमी झाला याचा अर्थ मी आणि सौभाग्यवती यांनीं एकमेकांना डोळ्यांनींच सांगितला आणि माझ्या प्रवासाची तयारी सुरू झाली. सौभाग्यवती पोळ्या करायला बसली आणि आईनें चिवडा करण्याचें साहित्य पुढें घेतलें. मी माझी पडशी घेऊन तीत धोतर, पंचा, दुसरा शर्ट, सतरंजी आणि चादर हें सामान भरलें. सगळी तयारी झाल्यावर देवांना आईला नमस्कार करून मी बाहेर पडलों. तोंपर्यंत पांच वाजून गेले होते. कांखेला पिशवी आणि हातांत लाठी अशा थाटांत संध्याकाळीं मी घरून बाहेर पडल्यामुळें, आमच्या गांवाबाहेर पडेतों गांवां-तला जो जो मनुष्य भेटे तो तो 'यावेळीं कुठें निघालास?' असें विचारी

आणि त्याला त्रोटक जबाब द्यायचा म्हटलें तरी निदान पांच–सात मिनिटें मोडत. मी गांवाच्या पुरता बाहेर गेलों तेव्हां सहा वाजून गेले होते.

शेवटीं एकदांचा मी गांवखडीचा रस्ता चालू लागलों. अगदीं डोंगर-माथ्यावरून सडकेनेंच जावयाचें होतें. सडकेवर दोन्ही बाजूंस दाट झाडी असलेल्या एका भागांतून जरा पुढें गेल्यावर उतार लागतो. त्या उतारांत सडकेवरून वाहणारा ( अर्थात् या वेळीं तो कोरडाच होता. ) एक ओढा आहे. त्या ओढ्यांत एक लहानसें आंब्याचें झाड आहे. या ओढ्यांतून पलीकडे गेलें कीं सडक पुन: चढणीची आहे. चालत चालत मी त्या ओढ्यांतील आंब्याच्या झाडाशीं आल्यावर, समोरची चढण जेथें पुरी होते तेथें सडकेवरच एक वाघ बसलेला मला दिसला. त्याची माझ्याकडे पाठ होती आणि चढणीनें पुढें गेलेल्या सडकेकडे त्याचें तोंड होतें. त्याच्यांत आणि माझ्यांत सुमारें अर्धा फर्लांग एवढेंच अंतर असेल. मी आजूबाजूस पाहिलें तों आसपास कोणीहि मनुष्य दिसेना. पुढें कसें आणि मागें तरी कसें जावें असा माझ्यापुढें प्रश्न पडला. ' वाघ आपण होऊन माणसाच्या अंगावर येत नाहीं, आपण आपल्या वाटेनें चालत रहावें; तो कदाचित् समांतर रेषेनें दुरून चालत येईल आणि भीति दाखवील पण अंगावर यायचा नाहीं. ' असें कोंकणांतले माहितगार लोक सांगतात तें मी ऐकलें होतें. पण स्वत:वर तो प्रयोग करून पहायला मी तयार नव्हतों. शेवटीं पुढें जातां येत नाहीं आणि मागें जाणेंहि शक्य नाहीं असें दिसतांच मी सगळ्या सामानासह ओढ्यांत असलेल्या आंब्याच्या झाडावर चढलों आणि एका बेखांद्यांत–घोड्यावर बसतात तसा–दोन्ही बाजूंस दोन पाय सोडून बसलों. बराच वेळ मी तसाच गूपचुप बसलों होतों–त्या अवधींत विडीहि ओढली नाहीं. तास दोन तास असेच गेल्यावर चंद्र उगवला आणि सगळीकडे प्रकाश पडला. त्यामुळें वाघ उठून गेल्याचें दिसलें. पण खालीं उतरून अवेळीं कुठें चालत जायचें ? आणि हाच वाघ पुढें पुन: भेटला तर मग काय करायचें ? तेव्हां एकदां झाडावर बसल्यासारखी सबंध रात्र तेथेंच काढायची असें मी ठरविलें. पिशवींतली सतरंजी काढून कुल्ल्याखालीं घातली आणि झोंप येऊन मी खालीं पडूं नये म्हणून पंचानें छातीला

एक गांठ मारून उरलेलीं टोकें झाडाच्या खांदीला बांधून टाकली. झोप येऊं नये म्हणून खूप म्ोठ्यानें भजनें वगैरे म्हणणें चालू होतेंच. पहांट झाली तेव्हां खालीं उतरलों आणि पुढचा रस्ता सुधारला.

## ' कॉंग्रेस हायकमांड कॅन डू नो रॉंग '

रत्नागिरीच्या ' बलवंत ' मध्यें सुमारें १॥ वर्ष मी नोकरीस होतों. पगार थोडा होता एवढेंच, पण बाकीचें सर्व ठीक जमलें होतें. ' बलवंत ' चे मालक गजाननराव पटवर्धन मुंबईस असत. त्यामुळें त्यांच्याशीं माझा संबंध फारच थोडा येई. पण संपादक मोरोपंत जोशी यांच्याशीं माझी चांगलीच गट्टी जमली होती. आम्हीं दोघेंहि बुद्धिबळें खेळणारे हेंहि त्याचें आणखी एक कारण होतें. त्यावेळीं ' राष्ट्रभाषा कोविदच्या ' च्या परीक्षेसाठीं मोरोपंत जोशींनीं जरूर तीं सर्व हिंदी पुस्तकें विकत घेतलीं होतीं. पण वकीली वगैरे त्यांच्या उद्योगांत त्यांना अभ्यासाला वेळच होत नसे. मधल्यामध्यें मीच त्यांच्या पुस्तकांवर अभ्यास केला आणि ' राष्ट्रभाषा कोविद ' बसलों.

कॉंग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर आल्यानंतर मुरारजी देसाई हे महसूल-मंत्री या नात्यानें रत्नागिरी जिल्ह्यांत आले होते. आणि जनतेतला मंत्री कसा असतो तें पहाण्याच्या उद्देशानें लोक त्यांच्या स्वागतासाठीं धांवले होते. त्याच्या सबंध दौऱ्यांत ' बलवंत ' चा ' स्टाफ रिपोर्टर ' म्हणून मी त्यांच्या-बरोबर हिंडत होतों. ' टाइम्स ऑफ इंडिया ' चे रत्नागिरीचे बातमीदार गोगटे हेहि आमच्याबरोबर दौऱ्यांत होते. कॉंग्रेसच्या मोटारींतच आमची सोय होत असे. वेंगुर्ल्यापासून मालवण, देवगड, कणककली, राजापूर, रत्नागिरी, संगमेश्वर, चिपळूण, खेड व दापोली असा दौरा करून ते कुलाबा जिल्ह्यांत शिरले आणि मग आम्हीं रत्नागिरीस परत गेलों.

पुढें कॉंग्रेसच्या राजकारणांत डॉ. खरे–प्रकरणामुळें एक मोठें वादळ उठलें. मध्यप्रदेशांतील कॉंग्रेस–मंत्रिमंडळाचे डॉ. ना. भा. खरे हे मुख्य मंत्री होते त्यावेळीं ' घटना मोडण्यासाठीं'च कॉंग्रेसनें अधिकारग्रहण केलेलें होतें.

म्हणून ' आपल्या म्हणजेच काँग्रेसच्या धोरणानुसार राज्यकारभार चालवीत राहावयाचें, गव्हर्नरची फारशी पत्रास ठेवावयाची नाहीं, त्याला वाटलें तर तो त्याचे खास अधिकार खुशाल वापरो. ' असें ठरलें होतें. तरीहि डॉ. खरे यांनीं गव्हर्नरशीं बोलणें करून, त्यांच्या मंत्रिमंडळांतील तीन महाकोशली मन्त्र्यांना ( डॉ. रविशंकर शुक्ल, पं. द्वारकाप्रसाद मिश्र आणि दुर्गाशंकर मेहता ) ' डिसमिस ' करविलें होतें. त्यानंतर काँग्रेस वर्किंग कमिटीची बैठक भरून तिनें डॉ. खरे यांची मुख्यमंत्रीपदावरून उचलबांगडी करविली तेव्हां मराठी वृत्तपत्रांत आणि काँग्रेसजनांतहि दोन तट पडल्यासारखें झालें होतें. कांहीं जण काँग्रेस हायकमांडची बाजू घेत तर कांहीं जण डॉ. खरे यांची बाजू घेत. आमच्या ' बलवंत ' पत्रानेंहि तेव्हां डॉ. खरे यांचीच बाजू घेतली, आणि त्यांत खऱ्यांच्या बाजूनें काँग्रेसपुढाऱ्यांवर टीका होऊं लागली. मला तें पसंत नव्हतें. काँग्रेस-पुढाऱ्यांनीं खोल विचार करून मगच ज्याअर्थीं डॉ. खऱ्यांना पदच्युत करविलें आहे त्याअर्थीं त्यांचें करणें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें जरूरच असेल असें मला वाटत होतें. नुकत्याच आधीं झालेल्या नरीमन-प्रकरणांमुळें ( आणि पुढें लवकरच झालेल्या सुभाष-प्रकरणामुळें ) काँग्रेस पुढाऱ्यांचे निर्णय योग्यच असतात असें ठरलें होतें. पण मी पडलों साधा उपसंपादक ! माझ्या मताचा प्रभाव ' बलवंत ' च्या मालकांवर आणि मुख्य संपादकांवर कसा पडणार ? पण माझ्या पुढाऱ्यांवरील हल्लें परतविणें माझ्या हातांत नसलें तरी, त्या हल्ल्यांना मदत न करणें तरी माझ्या हातीं खास आहे असें मला वाटलें आणि ' बलवंत ' पत्रांतली नोकरी मी सोडली. ' काँग्रेस हाय-कमांड कॅन् डू नो रॉंग ' असें वाटण्याइतकी काँग्रेस पुढाऱ्यांवर त्यावेळीं माझी निष्ठा होती. १९४२ च्या ' छोडो भारत ' चळवळीच्या वेळीं, ' काय वाटेल तें करा पण इंग्रज सरकारचें राज्य असेतों स्वस्थ बसूं नका. ' असा आधीं स्वतःच आदेश देऊन, ' ज्यांनीं हिंसक कृत्यें केलीं ते आमचे कोणी नव्हते, ' असें म्हणून गांधीजींनीं जेव्हां त्यांची जबाबदारी टाळली तेव्हांच त्यांच्यावरची माझी निष्ठा संपली आणि मी काँग्रेस सोडली. आतां यापुढें

हिंदुस्थानांतली कोणीहि व्यक्ति माझा पुढारी होऊं शकणार नाहीं आणि कोणालाहि माझी निष्ठा आतां वाहिली जाणार नाहीं !

## ‘तुमची आत्मकथा आतां आटोपती घ्या’

रत्नागिरीचें ‘बलवंत’ पत्र सोडल्यावर महाराष्ट्र हरिजन सेवक संघातर्फेच्या रत्नागिरी जिल्ह्यांतील ‘हरिजन सेवका’चें काम मी मिळविलें. त्या कामाचें शिक्षण घेण्यासाठीं धुळें येथें काकासाहेब बर्वे यांजकडे मला एक महिनाभर बोलाविलें होतें. कारण काकासाहेब बर्वे तेव्हां महाराष्ट्र हरिजन सेवक संघाचे अध्यक्ष होते आणि श्री. उपाध्ये हे सेक्रेटरी होते. काकासाहेब हे ‘बोले तैसा चाले’ या वृत्तीचे असल्यामुळें आणि त्यांचें कुटुंबहि तसेंच प्रगत विचारांचें असल्यामुळें, काकासाहेबांच्या घरांत एक हरिजन मुलगा घरच्या माणसांसारखा वावरत असे. श्री. उपाध्ये हेहि निष्ठावंत कार्यकर्ते होते. त्याखेरीज या कार्यांत रस घेऊन भाग घेणारे दोन कार्यकर्ते मला तेथें आढळले. एक डॉ. घोगरे आणि दुसरे कुंभारगुरुजी. मी तेथें असतांना जें हरिजन-कार्य केलें गेलें त्यांत मला नवीन असें कांहींच नव्हतें. बाळूकाका कानिटकरांचा शिष्य आणि सेनापति बापटांचा मुळशी सत्याग्रहांतला अनुयायी असलेल्या माझ्यासारख्याला नवें काय वाटणार ? पण म्हटलें तर एक नवें असें होतें. हरिजनवाड्यांत नऊ दिवस (नवान्ह म्हणून) कीर्तनें व्हावयाचीं होतीं. कुंभारगुरुजी चांगलें कीर्तन करीत. पण त्यांचें कीर्तन टाळावर वारकरी पद्धतीचें असे. त्यांचें कीर्तन झालें. आणखीहि एक दोघांचीं झालीं. तेव्हां एक दिवस मीहि ‘कीर्तन’ केलें. ‘भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास’ हा तुकाराम महाराजांचा अभंग निरूपणाला घेतला होता. पण एकाच जागीं उभा राहून व्याख्यात्याप्रमाणें सगळी बडबड झाली असें श्री. उपाध्ये यांनीं मग मला सांगितलें.

धुळ्याहून रत्नागिरी जिल्ह्यांत परत आल्यावर मी हरिजन कार्याच्या प्रचारार्थ त्या जिल्ह्यांत फिरत असें. महिन्याभरांत केलेल्या कार्याचा लेखी

अहवाल धुळ्याला पाठवावयाचा असे. अप्पासाहेब पटवर्धन हे माझे त्या कामांतले वरिष्ठ अधिकारी होते. मी हरिजन सेवक म्हणून काम करूं लागल्यावर आडीवरें येथें माझ्या घरावर अघोषित बहिष्कार पडला होता. पण तरी माझी आई व सौभाग्यवती या दोघीहि माझ्याविरुद्ध गेल्या नाहींत. जी थोडीफार अडचण त्यांना सहन करावी लागे ती त्या सहन करीत. त्यावेळीं (म्हणजे १९३९ मध्यें) माझ्या घराच्या पडवींत आमच्या गांवच्या एक दोन महार मुलांना बसूं देऊन मी त्यांना इंग्रजीचे धडेहि दिले आहेत. पण एक दिवस अप्पासाहेबांनीं सहज बोलतांबोलतां ' मधून मधून तुम्ही घरीं जातां तेव्हां एकाद्या हरिजनाला पाहुणा म्हणून घरीं घेऊन जावें ' असें मला सुचविल्यामुळें मी हरिजन सेवकाचें कामहि सोडून दिलें. अस्पृश्योद्धार झाला पाहिजे हें खरें; पण त्यासाठीं माझ्या आईच्या मनाला भलतेच कष्ट देण्याची माझी तयारी नव्हती. कारण हिंदु समाजांत शिरलेले स्पृश्यस्पृश्यतेचे विचार हजार–दोन हजार वर्षांचे जुने आहेत. माझी आई फक्त माझ्या याच जन्मांतली आहे. म्हणून तिच्या हयातीपर्यंत तिला झेपेल एवढीच पुढें उडी मारायची असें मला वाटत असे. पण अप्पासाहेब पटवर्धनांची ' सूचना ' म्हणजे एक प्रकारचें ' मॉरल प्रेशर 'च असें मला वाटलें म्हणून मी ती नोकरी सोडून दिली.

अर्थात् कोंकणचा माणूस पुनः जायचा कुठें ?–मुंबईसच ! त्यावेळेपर्यंत दत्तोपंत सावरकरांचा ' लोकमान्य ' ' सौराष्ट्र ट्रस्ट 'च्या हातीं गेला होता आणि संपादक वर्गाची स्थिति सुधारली होती. दत्तोपंत मात्र हिंदुस्थान सोडून इंग्लंडमध्यें जाऊन राहिले होते. (आतां ते अमेरिकेंत आहेत.) श्रीकांत दत्तात्रय पालेकर यांचें नांव संपादक म्हणून ' लोकमान्य ' पत्रावर झळकत असे. पुनः ' लोकमान्यां 'त मला नोकरी मिळाली नाहीं पण ' सौराष्ट्र ट्रस्ट 'च्या मालकीचें वरेरकर–मामांच्या संपादकत्वाखालीं 'पूर्णिमा' नांवाचें जें एक साप्ताहिक निघालें त्यांत मला प्रूफ करेक्टर म्हणून घेण्यांत आलें. या व्यवसायांत माझ्या मागून आलेले अं. शं. अग्निहोत्री व दिनकर साक्रीकर हे ' पूर्णिमे 'च्या संपादकमंडळांत होते. ' डॉ. आंबेडकर यांच्या

कार्यातील ‘ बुवाबाजीबद्दल ’ त्या पत्रांत तेव्हां मामांनीं खूप टीका केलेली आहे. त्यावेळींच ‘ एका सत्याग्रहीची आत्मकथा ’ या मथळ्याखालीं माझी आत्मकथा ‘ पूर्णिमा ’ पत्रांत प्रसिद्ध होऊं लागली होती. पुणेंकरांवरचा मामांचा राग प्रसिद्धच आहे. माझ्याहि अनुभवांत पुण्यांतील राजकारण्यांवर टीका करण्यासारखे कांहीं अनुभव आहेत. म्हणूनच बहुधा माझ्या आत्मकथेला ‘ पूर्णिमा ’ पत्रांत प्रसिद्धि मिळूं लागली असेल. पण पुण्यांतील लोकांवर केवळ टीकाच करणें हा माझा आत्मकथा लिहिण्यांतील उद्देश नव्हता. लवकरच माझ्या आत्मकथेच्या हप्त्यांतील टीकेची हवा गेली असें पाहिल्यावर, ‘ परांजपे, तुमची आत्मकथा आतां आटोपती घ्या ’ अशी मला सूचना होऊं लागली. पांच हप्ते प्रसिद्ध झाले होते. मी तेवढ्यावरच थांबलों. कारण, जीवनाचा शेवट होण्याची वेळ येईल तेव्हांच आत्मकथेचा समारोप करण्याची वेळ येते. पाव–अर्ध्या आयुष्यांतच आत्मकथा आटोपती कशी घेणार ? फार झालें तर तिला प्रसिद्ध मिळणें थांबेल; पण तें पत्करेल. असें म्हणून आत्मकथेचे हप्ते प्रसिद्धीला देण्याचें मी बंद केलें. ‘ पूर्णिमा ’ पत्राचा एक अंक निघाल्यावर मी त्या पत्रांत नोकरीस गेलों आणि तेथली नोकरी मी सोडल्यावर एकच अंक निघून तें पत्र बंद पडलें !

त्यानंतर ( १९४० सालीं ) श्री. वसंत मुकुंद कांदे यांच्या ओळखीनें ‘ प्रकाश ’ नांवाच्या साप्ताहिकांत मला नोकरी मिळाली. डॉ. विठ्ठल बाळकृष्ण गांधी यांचें नांव मुख्य संपादक म्हणून असलें तरी प्रा. न. र. फाटक हेच बहुतेक सर्व संपादकीय मजकूर लिहीत असत. पण अंकाची बाकीची तयारी होऊन केवळ त्यांच्या मजकुरासाठीं अडलें म्हणजे मी त्यांच्याकडे जाऊन त्यांना घाई करीत असें. एकदां त्यांना मुळींच फुरसद नसल्यामुळें ‘ तुम्हींच या अंकासाठीं अग्रलेख–स्फुटें वगैरे लिहून टाका ’ असें फाटकांनीं मला सांगितलें होतें.

## ‘ मला गांधीवादी संपादक मिळवून दे ’

त्यानंतर थोड्याच दिवसांनीं पुनः ‘ नवशक्ति ’ पत्र सुरू करण्यांत येणार

असल्याचें जाहिर झालें. एस. सदानंद यांना कोणीतरी सावकार मिळून त्यांनीं, त्यांच्या पूर्वीच्या नुसत्या ' फ्री प्रस 'ऐवजीं ' फ्री प्रेस ज़र्नल ' नांवाचें इंग्रजी दैनिक सुरू केलें होतें. ते पुनः ' नवशक्ति ' सुरू करणार असें ऐकल्यावर मी त्यांना जाऊन भेटलों आणि ' मागें · नवशक्ति ' सुटली तेव्हां मी संपादक होतों. आतां मला पुनः चान्स द्या ' म्हटलें.

तेव्हां ते म्हणाले, ' तूं मला संपादक मंडळांत पाहिजेस. पण सध्यां ' कॉंपीटिशन 'चे दिवस आहेत, म्हणून मला एकादा नांवलौकिकवाला गांधीवादी संपादक मिळवून दे. '

पूर्वी ' नवाकाळ ' मध्यें असलेल्या का. म. ताम्हनकरांनीं ' नवाकाळ' सोडला होता आणि ते ' मनु ' नांवाचें साप्ताहिक आणि ' प्राविण्य ' नांवाचें मासिक तेव्हां चालवीत असत. मी त्यांना जाऊन भेटलों आणि ' नवशक्ति ' पुनः सुरू होत आहे, तिचे तुम्हीं संपादक व्हाल काय ?' असें विचारलें. त्यांनीं होकार देतांच सदानंदांना मी त्यांचें नांव सुचविलें आणि त्यांची भेटहि करवून दिली.

ताम्हनकरांना ' नवशक्ति 'चे संपादक नेमण्याचें ठरल्यावर, इतर संपादकांच्या जागांसाठीं आलेल्या अर्जांची फाईल सदानंद यांनीं त्यांच्यापुढें टाकली आणि यांतून चार जणांची निवड करा असें त्यांना सांगितलें. त्याप्रमाणें ताम्हनकरांनीं त्यांच्यापुढें चार नांवाची जी यादी टाकलीं तींत माझें नांव नाहीं, असें पहातांच ते ताम्हनकरांना म्हणाले, ' हें काय ? परांजपेचें नांव यांत कसें दिसत नाहीं ? '

' त्यांचें तुमच्याशीं मागें भांडण झालेलें असल्यामुळें ते तुम्हांला चालतील कीं कोणास ठाऊक ? म्हणून मी त्यांचें नांव या यादींत घातलें नाहीं. ' ताम्हनकरांनीं उत्तर दिलें.

त्यावर सदानंद म्हणाले, ' मी त्याचे पैसेच देणें होतों म्हणून भांडला तो. पण म्हणून त्याला नोकरीला ठेवायचें नाहीं असें नाहीं. त्याच्याशिवाय बाकी तिघे कोण ते निवडा. ' तेव्हां पु. बा. कुलकर्णी, र. ना. लाटे आणि नरहरी केळकर या तिघांची निवड करण्णांत आली.

# 'आधी राजीनामा, मग तारेचें भाषांतर'

सन १९४२ च्या मार्चची ती रात्र ! त्या दिवशीं क्रिप्स–योजनेचा मसुदा रात्रीं ए. पी.आय.तर्फे टेलिप्रिंटर मशीनवर येऊं लागला. 'नवशक्ती'त त्या दिवशीं माझी रात्रपाळी होती. आधीं त्रिमंत्री शिष्ट-मंडळ येऊन कॉंग्रेस पुढाऱ्यांशीं वाटाघाटी करून गेलें. पण त्यांना कांहीं यश आलें नाहीं. त्यानंतर सर स्टॅफर्ड क्रिप्स यांनीं एक योजना आणली. कॉंग्रेस पुढाऱ्यांशीं त्यांची त्या योजनेसंबंधानें जी चर्चा होई तिचेहि वृत्तांत वर्तमान-पत्रांत येऊन गेले होते. दुसरें महायुद्ध जोरांत चालू होतें आणि एकीकडे जपानच्या आणि दुसरीकडे जर्मनीच्या लष्करी सामर्थ्यापुढें एक एक राष्ट्र भराभर आडवें पडल्याचें वाचावें लागत होतें. "भारताचासुद्धां फॅसिझम-नाझीझम यांना विरोधच आहे पण, आपल्याला ज्यानें पारतंत्र्यांत ठेवलें आहे अशा राष्ट्राला त्याच्या शत्रूंशीं लढण्याच्या कामीं मदत करा, असें आम्ही आमच्या लोकांना कसें सांगावें ?" असें कॉंग्रेस पुढारी इंग्रज सर-कारला वारंवार बजावीत असत. त्यामुळें स्वातंत्र्याचा जींत 'इसेन्स' आहे अशी योजना सर स्टॅफर्ड क्रिप्स यांनीं आणली असून कॉंग्रेस पुढाऱ्यांना-त्यांतल्या त्यांत पं. नेहरूंना–ती पसंत आहे आणि लवकरच पं. नेहरू भार-ताचे युद्धमंत्री होणार आहेत असे तर्क प्रसिद्ध होत असत. त्यापूर्वींच सुभाषबाबू इंग्रज सरकारच्या कैदेंतून पळून सिंगापूरास गेले होते ( सिंगापूर-ब्रह्मदेश यांजवर जपानची सत्ता तेव्हां प्रस्थापित झाली होती) आणि तेथें त्यांनीं जपानच्या कदेंतील भारतीय सैनिकांची 'आझाद हिंद फौज' नांवाची पलटण उभारली होती आणि तेथें 'चलो दिल्ली'च्या घोषणा ते करीत असल्याचें रेडियोवर ऐकायला मिळत होतें. 'जपानच्या मदतीनें सुभाष-बाबूची सेना जर भारतावर चालून आली तर मी स्वत: त्यांच्याविरुद्ध भारतीय सेनेचें नेतृत्व करीन' असे पं. नेहरूंनीं तेव्हां एका भाषणांत उद्गारहि काढले होते. त्यामुळें फॅसीझम–नाझीझमविरोधी असूनहि, केवळ स्वराज्य नाहीं म्हणून भारताची जी कुचंबणा होते आहे ती थांबवील आणि

त्याला मानानें युद्धांत भाग घेतां येईल अशी परिस्थिति निर्माण करील, अशी योजना क्रिप्स यांनीं ब्रिटिश मंत्रिमंडळाकडून मंजूर करवून आणली आहे असें तेव्हां प्रसिद्ध होत असे.

क्रिप्स–योजनेचे एकामागून एक असे भाग टेलिप्रिंटवर येऊं लागतांच मी ते भराभर वाचले आणि अशीच जर ही योजना असेल तर ब्रिटिश सरकार व काँग्रेस यांजमध्यें नक्की समेट होईल, पं. नेहरू युद्धमंत्री बनतील आणि 'चला लढाईला' असें आपल्याला आवाहन करतील असें माझें नक्की मत झालें. मी अँटीफॅसिस्ट होतोंच. तेव्हां पं. नेहरूंनीं आवाहन करतांच लष्करांत दाखल व्हायला आपण मोकळें असावें म्हणून 'मला सैन्यांत दाखल होऊन लढाईवर जावयाचें असल्यामुळें मला ता. १ मे १९४२ पासून नोकरींतून मुक्त करावें. त्यासाठीं आज आपणाला पूर्ण एक महिन्याची मी नोटीस देत आहे' असें सदानंदांना उद्देशून मी पत्र लिहिलें, तें पाकिटांत घालून बंद केलें आणि सदानंदांच्या टेबलावर तें नेऊन ठेवून मग मी 'क्रिप्स–योजने'च्या तारांचें भाषांतर करावयास बसलों. सरकार व काँग्रेस यांजमध्यें समेट होईलच हा जो मी अदमास केला होता तो पुढें साफ चुकला; पण मी मात्र माझा राजीनामा परत घेतला नाहीं. थेट कोंकणांतल्या घराचा रस्ता धरला.

१९३४ सालीं 'पार्लमेंटरी मेंटॅलिटी हॅज कम टु स्टे' असें गांधीजींनींच कबूल केल्यावर, आतां पांच–सात वर्षें तर हा (म्हणजे पार्लमेंटरी राजकारणाचा) प्रयोग होणारच, तोंपर्यंत आपणाला संसार करायला हरकत नाहीं, असें ठरवून मी जिच्याशीं लग्न केलें ती माझी सौभाग्यवती इंदिरा दोन मुलें माझ्या पदरांत टाकून, ता. ६ ऑगस्ट १९४१ रोजीं मरण पावली. त्यामुळें लढाईवरच जायला जरी नाहीं तरी चळवळींत जायला मी मोकळा झालों होतों आणि लढाईवर जावें लागायच्या ऐवजीं चळवळींत भाग घेण्याचीच माझ्यावर शेवटीं वेळ आली. १९४२ ची चळवळ मला मान्य नव्हती; पण 'ही माझ्या आयुष्यांतली शेवटची चळवळ आहे' असे गांधीजींनीं १९४२ च्या ७–८ ऑगस्टला मुंबईंत अ. भा. काँ. कं. च्या अधिवेश-

नांत जे उद्‌गार काढले त्यामुळेंच मी त्या चळवळींत भाग घेतला. ' १९२० सालापासून १९४२ सालपर्यंत गांधीजींचा अनुयायी म्हणून मी मिरवलों आणि *त्यांच्या आयुष्यांतल्या* त्यांच्या पुढारीपणाखालच्या शेवटल्या चळवळीच्या वेळींच नेमका त्यांना मीं दगा दिला असें घडूं नये. आपल्या मानानें त्यांचें (गांधीजींचें) आयुष्य आतां थोडें उरलें आहे. तेव्हां त्यांच्या-साठीं आपल्या आयुष्याचा थोडा काल फुकट गेला तरी हरकत नाहीं ' असें माझ्या मनानें मला सांगितलें. त्यामुळेंच इंग्रजांच्या मदतीसाठीं लढाईवर जाण्याऐवजीं, त्यांना उद्देशून गांधीजींनीं उच्चारलेला ' चले जाव ' चा मंत्रच मीहि घुमवूं लागलों !

## डोक्यावर चाळिशी आली

चाळीस सालच्या चळवळीनिमित्त ९ महिने सक्तमजुरी आणि १०० रुपये दंड, दंड न दिल्यास आणखी एक महिना स. म. अशी मला राजापूर कोर्टांत शिक्षा झाली आणि रत्नागिरीच्या तुरुंगांत शिक्षा भोगून मी परत घरीं आलों. त्यापूर्वी ३० व ३२ सालच्या चळवळींत मला ६–६ महिन्यांच्या सक्तमजुरीच्या शिक्षा झाल्या होत्याच. शिवाय ३० सालीं वडाळा मिठागरावरील सत्याग्रहानिमित्त वरळीच्या तुरुंगांत असतांना जॉर्ज बादशहाच्या वाढदिवशीं ( ता. २ जून ) तुरुंगांतच पोलिसांनीं केलेल्या लाठीमारांत मला खूप मार बसल्यामुळें जे. जे. हॉस्पिटलमध्यें मला पाठविण्यांत आलें होतें. त्यावेळीं मी ' अत्यवस्थ ' असल्याच्या बातमीमुळें कांहीं जणांनीं माझ्या प्रेतयात्रेचाहि विचार चालविला होता. पण त्या सर्व प्रसंगां-तून जगल्यामुळेंच मी आज हें लिहूं शकत आहें.

१९४३ सालीं रत्नागिरीच्या तुरुंगांतून सुटल्यावर थोडे दिवस घरीं राहून मी पुन: मुंबईस आलों. मी नोकरी बघून बघणार कसली ? कुठें तरी वर्तमानपत्रांतच मी जायचा. त्याप्रमाणें मी पुन: 'फ्री प्रेस जर्नल'चे मालक

सदानंद यांना भेटायला गेलों, मागील इतिहास त्यांना सांगितला आणि कांहीं नोकरी आहे का विचारलें. ते म्हणाले "तुला नोकरी हवी असेल आणि माझ्याकडे जागा रिकामी असेल तर मी तुला केव्हांहि ती देईन. तूं वाटेल तेव्हां नोकरी सोडून जातोस हें मला माहित आहे तरीहि देईन. पण सध्यां 'नवशक्ती'च्या संपादकांत जागा नाहीं. 'फ्री प्रेस'साठी प्रूफ करेक्टर पाहिजे आहे. तें काम करशील?" मी त्यांस होकार दिला आणि ७० रुपये पगारावर फ्री प्रेसमध्यें प्रूफ करेक्टरचें काम मी करूं लागलों. माझी रात्रपाळी असे तेव्हां ८ पॉईंट टाईपाचा इंग्रजी मजकूर वाचतांना मला 'सी' आणि 'ई' यांतील फरक नीट दिसेना. त्या टाईपांतला मजकूर वाचतांना मला त्रास होऊं लागला. त्यामुळें शेवटीं चश्मा विकत घेतला. ४० वें वर्ष लागायच्या आधींच एक वर्ष डोळ्यांवर चाळिशी आली. पण लवकरच हीहि नोकरी मी सोडली आणि १ एप्रिल १९४४ सालीं पुन: 'लोकमान्य' पत्रांत नोकरीस आलों. सदानंदांकडची ही नोकरी सोडतांना, 'आतां पुन: मात्र मी तुमच्याकडे कधीं नोकरी मागणार नाहीं' असें त्यांना सांगून मी त्यांचा निरोप घेतला होता.

## सुखाचा अन् उच्चीचा काल

एक एप्रिल १९४४ पासून एक डिसेंबर १९४९ रोजीं मी 'लोकमान्य' पत्रांतून सेवानिवृत्त होईपर्यंतचा काळ माझ्या जीवनांत अत्यंत सुखाचा आणि उच्चीचा काळ ठरला. अमृतलाल शेठ यांच्यासारखे कडक पण नोकरांच्या गुणांचे चीज करणारे मालक आणि पां. वा. गाडगीळ यांच्यासारखे सहकाऱ्यांना मित्रवत् वागविणारे संपादक मला लाभले होते. या पांचच वर्षांच्या अवधींत मला एकूण १०५ रुपये पगारवाढ झाली. फक्त ७५ रुपये पगारावर लागलेला मी नोकरी सोडतांना १८० रुपये पगार आणि ९० रुपये महागाई भत्ता मिळून दरमहा २७० रुपये घेऊं लागलों होतों. या अवधींत माझ्या नांवानें स्वतंत्र लेखनहि मला खूप करायला मिळालें.

नांत जे उद्‌गार काढले त्यामुळेंच मी त्या चळवळींत भाग घेतला. ' १९२० सालापासून १९४२ सालापर्यंत गांधीजींचा अनुयायी म्हणून मी मिरवलों आणि त्यांच्या आयुष्यांतल्या त्यांच्या पुढारीपणाखालच्या शेवटल्या चळवळीच्या वेळींच नेमका त्यांना मीं दगा दिला असें घडूं नये. आपल्या मानानें त्यांचें (गांधीजींचें) आयुष्य आतां थोडें उरलें आहे. तेव्हां त्यांच्या-साठीं आपल्या आयुष्याचा थोडा काल फुकट गेला तरी हरकत नाहीं ' असें माझ्या मनानें मला सांगितलें. त्यामुळेंच इंग्रजांच्या मदतीसाठीं लढाईवर जाण्याऐवजीं, त्यांना उद्देशून गांधीजींनीं उच्चारलेला ' चले जाव ' चा मंत्रच मीहि घुमवूं लागलों !

## डोक्यावर चाळिशी आली

चाळीस सालच्या चळवळीनिमित्त ९ महिने सक्तमजुरी आणि १०० रुपये दंड, दंड न दिल्यास आणखी एक महिना स. म. अशी मला राजापूर कोर्टांत शिक्षा झाली आणि रत्नागिरीच्या तुरुंगांत शिक्षा भोगून मी परत घरीं आलों. त्यापूर्वीं ३० व ३२ सालच्या चळवळींत मला ६–६ महिन्यांच्या सक्तमजुरीच्या शिक्षा झाल्या होत्याच. शिवाय ३० सालीं वडाळा मिठागरावरील सत्याग्रहानिमित्त वरळीच्या तुरुंगांत असतांना जॉर्ज बादशहाच्या वाढदिवशीं ( ता. २ जून ) तुरुंगांतच पोलिसांनीं केलेल्या लाठीमारांत मला खूप मार बसल्यामुळें जे. जे. हॉस्पिटलमध्यें मला पाठ-विण्यांत आलें होतें. त्यावेळीं मी ' अत्यवस्थ ' असल्याच्या बातमीमुळें कांहीं जणांनीं माझ्या प्रेतयात्रेचाहि विचार चालविला होता. पण त्या सर्व प्रसंगां-तून जगल्यामुळेंच मी आज हें लिहूं शकत आहें.

१९४३ सालीं रत्नागिरीच्या तुरुंगांतून सुटल्यावर थोडे दिवस घरीं राहून मी पुन: मुंबईस आलों. मी नोकरी बघून बघणार कसली ? कुठें तरी वर्तमानपत्रांतच मी जायचा. त्याप्रमाणें मी पुन: 'फ्री प्रेस जर्नल'चे मालक

सदानंद यांना भेटायला गेलों, मागील इतिहास त्यांना सांगितला आणि कांहीं नोकरी आहे का विचारलें. ते म्हणाले "तुला नोकरी हवी असेल आणि माझ्याकडे जागा रिकामी असेल तर मी तुला केव्हांहि ती देईन. तूं वाटेल तेव्हां नोकरी सोडून जातोस हें मला माहित आहे तरीहि देईन. पण सध्यां 'नवशक्ती'च्या संपादकांत जागा नाहीं. 'फ्री प्रेस'साठी प्रूफ करेक्टर पाहिजे आहे. तें काम करशील?" मी त्यांस होकार दिला आणि ७० रुपये पगारावर फ्री प्रेसमध्यें प्रूफ करेक्टरचें काम मी करूं लागलों. माझी रात्रपाळी असे तेव्हां ८ पॉईंट टाईपाचा इंग्रजी मजकूर वाचतांना मला 'सी' आणि 'ई' यांतील फरक नीट दिसेना. त्या टाईपांतला मजकूर वाचतांना मला त्रास होऊं लागला. त्यामुळें शेवटीं चश्मा विकत घेतला. ४० वें वर्ष लागायच्या आधींच एक वर्ष डोळ्यांवर चाळिशी आली. पण लवकरच हीहि नोकरी मी सोडली आणि १ एप्रिल १९४४ मालीं पुन: 'लोकमान्य' पत्रांत नोकरीस आलों. सदानंदांकडची ही नोकरी सोडतांना, 'आतां पुन: मात्र मी तुमच्याकडे कधीं नोकरी मागणार नाहीं' असें त्यांना सांगून मी त्यांचा निरोप घेतला होता.

## सुखाचा अन् उच्चीचा काल

एक एप्रिल १९४४ पासून एक डिसेंबर १९४९ रोजीं मी 'लोकमान्य' पत्रांतून सेवानिवृत्त होईपर्यंतचा काळ माझ्या जीवनांत अत्यंत सुखाचा आणि उच्चीचा काळ ठरला. अमृतलाल शेठ यांच्यासारखे कडक पण नोकरांच्या गुणांचे चीज करणारे मालक आणि पां. वा. गाडगीळ यांच्यासारखे सहकाऱ्यांना मित्रवत् वागविणारे संपादक मला लाभले होते. या पांचच वर्षांच्या अवधींत मला एकूण १०५ रुपये पगारवाढ झाली. फक्त ७५ रुपये पगारावर लागलेला मी नोकरी सोडतांना १८० रुपये पगार आणि ९० रुपये महागाई भत्ता मिळून दरमहा २७० रुपये घेऊं लागलों होतों. या अवधींत माझ्या नांवानें स्वतंत्र लेखनहि मला खूप करायला मिळालें.

माझें दुसरें लग्न होऊन माझ्या मुक्या पत्नीसह माझा फोटो 'लोकमान्यां'त प्रसिद्ध झाला. लग्नाबद्दल अहेर किंवा 'चांदला' म्हणून ऑफिसकडून एक पगार मला बक्षीस मिळाला. 'लीव्ह–बोनस'चा फायदा मलाच घेतां आला. (दर वर्षी मिळणारी एक महिन्याची हक्काची रजा एकदम घेऊन ती उपभोगण्यासाठीं कोठें बाहेरगांवीं जाणाऱ्या नोकराला–तो रजेवर जातांनाच–रजेच्या महिन्याचा पगार तर आधीं मिळेच पण रजेचे दिवस त्याला मजेंत घालवितां येण्यासाठीं त्याच्या पगाराचा तिसरा हिस्सा इतकी जादा रक्कम 'लीव्ह बोनस' म्हणून त्याला दिली जात असे. ही खास सोय 'लोकमान्य'खेरीज दुसऱ्या कोणत्याहि वर्तमानपत्राच्या मालकानें केली नसेल. सबंध महिन्याची रजा घेऊन मी हें 'लीव्हबोनस' मिळवीत असें आणि कोंकणांत सासुरवाडीच्या गांवीं पत्नी–मुलांसह चैन करायला जात असें. माझे बाकीचे सहकारी 'आम्हाला कुठें जायला गांवच नाहीं' म्हणत आणि थोडथोडी रजा घेऊन ती मुंबईंतच घालवीत.) आजारीपणाची अशी निराळी पगारी रजा प्रथम माझ्याच छोटचाशा आजारीपणाच्या वेळीं मंजूर झाली आणि मी सेवानिवृत्त झालों तेव्हां शांतीलाल शहांच्या अध्यक्षतेखालीं निरोप देण्याचा समारंभ होऊन, माझ्या सहकाऱ्यांनीं आणि ऑफीस-बॉईजनीं मला भेटहि अर्पण केली. संपादक पां. वा. गाडगीळ यांनीं माझ्या सेवेचा गौरव करणारा छोटासा अग्रलेखहि 'लोकमान्यां'त लिहिला.

मी म्हातारा झालों नसतां (माझा जन्म १९०५ सालच्या अनंतचतुर्दशीला झालेला आहे) आणि 'लोकमान्य' पत्रांतली नोकरी सुखाची असतां मी ती कां सोडली असें कित्येकांना वाटेल. म्हणून त्याबद्दल खुलासा करणें जरूर आहे. अमृतलाल शेठ यांच्या कारकीर्दींत 'लोकमान्य' पत्रांतील संपादक वर्गांत आम्ही २२ जण झालों होतों. मुंबईंतील वृत्तपत्रांत एकादा तरुण आणि होतकरू असा उपसंपादक आढळल्यास त्याला किंवा एकाद्या राजकीय कार्यकर्त्या तरुणाला 'लोकमान्य' पत्रांत घ्यावें असें आम्ही सुचवायचें आणि त्याप्रमाणें तो घेतला जायचा असें घडत आलें होतें. पुढें अमृतलाल शेठ यांच्याकडचें 'सौराष्ट्र ट्रस्ट'चें मॅनेजिंग डायरेक्टरपद गेलें

आणि शांतीलाल शहा त्या जागीं आले. आल्याबरोबर त्यांनीं काटकसरीला जी सुरुवात केली तिचाच एक भाग म्हणुन संपादकांच्या संख्येवर गदा आली. ज्यांना ज्यांना ' घ्या ' म्हणून आम्हीं सुचविलें त्यांना त्यांना ' काढा ' म्हणून सुचविण्याची पाळीहि आमच्यावरच आली. पहिल्यापासून मला नोकरीचा एकंदरींत वीटच आहे. नोकरी करणें म्हणजें आपण दुसऱ्याची एकप्रकारें बायको बनणेंच होय. वर्तमानपत्राच्या नोकरींत तर एकेका वेळीं दोनदोन नवरे असतात. एक मालक व दुसरा संपादक. माझ्या जीवनांत माझे असे अनेक नवरे झाले. त्यामुळें आतां जो काय थोडा फंड मिळेल त्यावर कोंकणांत आपण कांहीं स्वतंत्र उद्योग करावा असें मला वाटे. मी पूर्वीचा राजकीय कार्यकर्ता असल्यामुळें विधानसभेच्या निवडणुकीला उभे राहून निवडून यावें असेंहि मनांत येई. मला जसें कोंकणांत स्वतःचें घरदार आहे तसें सर्वांनाच असेल असें नाहीं म्हणून जुन्यांतला असूनहि मीच जर गेलों तर नव्यांतल्या एकाद्या उपसंपादकावरची संक्रांत टळेल असाहि एक विचार मनांत होता. म्हणून मीच सेवानिवृत्त झालों. त्यावेळीं मी ' लोकमान्य' सोडला नसता तर बाकीच्या ६ जणांप्रमाणें रा. धों. बाकरे यांचा कदाचित् ७ वा नंबर लागला असता. कारण फक्त १५ जणच ठेवायचे असें ठरलें होतें.

## पैशांचा ' सो टका ' मोबदला घेणारा मालक

अमृतलाल शेठ हे ' सौराष्ट्र ट्रस्ट 'चे मॅनेजिंग डायरेक्टर असतांना ' लोकमान्य ' पत्राचे मालक या नात्यानें त्यांचा आमच्याशीं जो संबंध आला त्यामुळें त्यांच्या स्वभावाचे कांहीं पैलू मला पहायला मिळाले. पहिली गोष्ट म्हणजे कोणत्याहि कामासाठीं जो पैसा खर्च करावयाचा त्याचा पुरेपुर मोबदला वसूल करण्याकडे त्यांचें लक्ष असे. एकदां ' टाईम्स ऑफ इंडिया 'पत्राचीं कागदाचीं रिळें भरून ठेवलेल्या गोडाऊनला आग लागली. अर्थात त्या आगीमुळें कागदांच्या रिळांचें नुकसान झालें. तो कागद ' टाईम्स ' छापण्यासाठीं वापरण्यासारखा नाहीं असें ठरल्यावर त्या कागदाचा लिलाव करण्यांत आला

होता. आमच्या अमृतलाल शेठनीं तो सगळा जळका कागद विकत घेतला. ‘ लोकमान्य ’, ‘ जन्मभूमी ’ हीं पत्रेंहि रोटरी मशीनवर छापलीं जात असतां आणि त्या जळक्या कागदाचा आपल्याला कांहीं उपयोग नसतां यांनीं तो विकत घेतला कशाला ? असेंच आमच्या कंपनींतल्या सगळ्या लोकांना वाटत होतें. पण त्या रिळांचा कागद कापवून त्याचीं रिमें पडलीं, उरलेले अरुंद पट्टे कापवून त्यांची पॅडे ऊर्फ स्क्रिब्लिंग ब्लॉक्स बनले आणि उरलेल्या लंगोटयांचीं पोती भरून तीं हॅटस् बनविणाऱ्या कारखान्यांकडे जाऊं लागलीं. तेव्हां आम्हाला शेठसाहेबांची दूरदृष्टी समजून आली.

आमचा दुसराहि एक असाच अनुभव आहे. ‘लोकमान्य ’चें सायंकाळचें भावंड म्हणून ‘ लोकशाही ’ पत्र निघालें तेव्हां त्याच्या पहिल्या पहिल्या कांहीं अंकांत आम्हीं उपसंपादक मंडळींनीं जें लेखन केलें त्यांवर लेखक म्हणून आमचीं सबंध नांवें आम्हीं घातलीं होतीं. अमृतलाल शेठ यांच्या तें नजरेस आल्यावर त्यांनीं ‘ मजकुरावर स्टाफमधील लेखकांचीं नांवें घालायचीं नाहींत ’ असा हुकूम काढला. ‘ असें कां ?’ म्हणून आम्हीं विचारल्यावर ते म्हणाले, ‘ तुम्हांला जो पगार दिला जातो तो ‘ लोकमान्य ’ पत्राचा नांवलौकिक होण्यासाठीं, तुमचा नांवलौकिक होण्यासाठीं नव्हे ! ’ त्यावर आम्हीं जेव्हां म्हणालों कीं ‘ तुमचा पगार घेतों त्याबद्दल भाषांतर करायला आम्हीं बांधलेले आहोंत. आम्हांला ‘ ओरिजिनल ’ असें जर कांहीं लिहायचें झालें तर तें आम्हीं दुसऱ्या पत्रांकडे पाठवूं. मग तिकडे आमचें नांवहि येईल आणि आम्हाला कांहीं तरी पैसेहि मिळतील. ’ ही गोळी लागू पडली आणि ‘ तुम्ही ‘ ओरिजिनल ’ असें कांहीं लिहाल तेव्हां तुमच्या नांवाचीं आद्याक्षरें घातलींत तरी चालेल ’ असा त्यांनीं त्यांच्या हुकुमांत फेरफार केला.

## मालक खरा पण हाडाचा पत्रकार

अमृतलाल शेठ जरी दोन वर्तमानपत्रांचे मॅनेजिंग डायरेक्टर असले तरी त्यांचा पिंड पत्रकाराचा होता. त्यामुळें मुंबई शहरांत एकादी विशेष

घटना घडली तर आपल्या वर्तमानपत्रांचे रिपोर्टर लोक जो रिपोर्ट आणतील त्यावरच विसंबायची त्यांची तयारी नसे. खुद्द आपल्या नजरेला जें दिसेल, आपण जें पाहूं शकूं तें 'पोटार्थी' रिपोर्टराला दिसणार नाहीं, नमूद करतां येणार नाहीं असें त्यांना वाटे; आणि म्हणून ते स्वतः अशा वेळीं त्या घटना-स्थळीं जाऊन येत, आणि त्यांनीं आणलेला रिपोर्ट लिहून काढून तो आमच्या-कडे पाठवीत. मुंबईंत तेव्हां हिंदुमुसलमानांचे दंगे होत असत. त्यावेळीं एखाद्या लष्करी अधिकाऱ्याच्या पोषाखांत अमृतलाल शेठ दंगलीच्या भागांतहि बेशक फिरून येत आणि परत आल्यावर स्वतःच त्यासंबंधीचा रिपोर्ट लिहीत. निजामाच्या राज्यांतील रझाकार चळवळ ऐन जोरांत असतां, ते मुद्दाम तेथें गेले आणि निजामाची व कासम रझवीची भेट घेऊन आले. खास या दोघांच्या मुलाखतीसाठीं आल्याच्या सबबीवर त्यांना तेथें हवें तिकडे फिरतां आलें आणि रझाकारी जुलुमाला बळी पडलेल्या माणसांच्या कवटयांचे फोटोहि त्यांनीं काढून आणले.

कित्येकदां ते रात्रींहि त्यांच्या ऑफिसांत येत. त्यांच्यासाठीं एक स्वतंत्र 'टेलिप्रिंटर' ठेवलेलें होतें त्याच्यावर आलेल्या सर्व बातम्या पहात आणि कांहीं विशेष बातमी आलेली असली म्हणजे मग 'सहज' म्हणून आमच्या संपादकखात्याकडे चक्कर मारून, 'आज काय बातम्या आहेत, हेडलाईन कसली देणार आहांत ?' वगैरे विचारीत. त्या 'विशेष' बातमीला खूप मोठीं हेडिंगें दिलेलीं नाहींत असें दिसलें तर 'अशा बातम्या पाहिल्यावर तुमचे बाहू फुरफुरत नाहींत कसे ?' असेंहि विचारीत. त्यांचा 'जरनॅलिझम' हा 'हेडलाईन जरनॅलिझम'च होता, आणि मलाहि तोच आवडतो.

प्रे. रुझवेल्ट वारल्याची बातमी रात्रीं ४ वाजतां 'टेलिप्रिंटर'वर आली. दैनिक वर्तमानपत्रांच्या छपाईचें काम साधारणतः रात्रीं २॥–३ ला सुरू होतें. पण महत्वाची बातमी पाहिल्यावर, इतक्या रात्रीं मशीन थांबवून ती बातमी घातल्याबद्दल त्या दिवशींचे आमचे रात्रपाळीवाले संपादक भ. द. टेंबे यांना अमृतलाल शेठनीं २० रु. खास बक्षीस म्हणून दिले होते.

# निष्ठुर परीक्षक पण उदार धनी

एकादा नोकर जरा ताठरपणानें वागणारा आहे असें आठळलें तर तर त्याच्यामध्यें खरोखर कितपत 'स्टफ' आहे त्याची चांचपणीहि ते केव्हां केव्हां करीत. 'लोकमान्य' पत्रांतील आमच्या सहकाऱ्यांपैकीं वि. स. बापट यांचा मुंबईंतील १९४२ सालच्या चळवळीशीं संबंध आहे अशी अमृतलाल शेठ यांना कुणकुण लागतांच त्यांनीं बापटांना बोलाविलें आणि 'नोकरी करायची असली तर चळवळी–बिळवळीशीं संबंध ठेवून चालणार नाहीं.' असें तें बापटांना सांगूं लागले. बापट म्हणाले, 'मला आतां तींतून अंग काढून घेतां येण्यासारखें नाहीं. पण चळवळीसाठीं शक्य तों मी माझ्या कामांत कुचराई करणार नाहीं.' त्यावर शेठ म्हणाल, 'बघ पकडला–बिकडला गेलास तर तुला पुन: नोकरीस ठेवणार नाहीं.' 'बरें आहे' असें म्हणून बापट परत आले.

त्यानंतर पुढें खरोखरच बापटांना अटक झाली आणि शिक्षाहि झाली. तुरुंगांतून सुटल्यावर, 'लोकमान्य' कडचा आपला फंडबिड मागावा म्हणून ते 'लोकमान्य' कचेरींत आले होते. अर्थातच शेठजींच्या भेटीसहि त्यांना जावेंच लागलें. दोघांची भेट झाली, कुशल प्रश्न झाले. त्यानंतर 'आतां मला माझ्या फंडाची रक्कम देण्याची लवकर व्यवस्था होईल तर बरें' असें बापटांनीं सांगतांच 'मी तुमचें अकौंट बघायला सांगतों. ७–८ दिवसांनीं खेप टाका.' असा शेठसाहेबांकडून जबाब मिळाला. तेव्हां त्यांना नमस्कार करुन बापट तेथून निघाले, पण शेठसाहेबांच्या ऑफिसांतून ते बाहेर पडतात न पडतात तोंच शेठनी त्यांना परत बोलावलें आणि म्हणाले, 'आतां पुढें तुम्हीं काय करणार आहांत ?'

'अजून कांहीं ठरविलें नाहीं; पण कुठें तरी नोकरी पहावी लागेल' बापट उत्तरले.

'मग, इथेंच पुन: नोकरीला ठेवतां काय असें मला कां नाहीं विचारीत ?' शेठ म्हणाले.

'तसें मी कसें विचारूं? मागेंच तुम्हीं सांगितलें आहे ना कीं चळवळींत पकडला गेलास तर पुन: नोकरीला ठेवणार नाहीं म्हणून! आतां नोकरी करावी लागली तरी ती दुसरीकडे करीन.' बापटांनींहि रोकडा जबाब दिला.

त्याबरोबर शेठ दोन पावलें पुढें आले आणि बापटांचा हात धरून त्यांना म्हणाले, 'जा, आपल्या पूर्वीच्या जागीं बसून कामाला लागा. तुमची सर्व्हिस सुटलेली नाहीं. चालूच आहे!'

## माझ्यामुळें पां. वा. गाडगीळांचा 'उद्धार'!

मी पक्का हिंदुत्वाभिमानी असतांहि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल मला कधीं विशेष प्रेम वाटलें नाहीं. त्यांच्यामध्यें भलताच 'अहंकार' असल्याचें, १९३७ सालीं रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून ते सुटल्यानंतर 'बलवंत'चा प्रतिनिधि या नात्यानें मी त्यांच्या मुलाखतीस गेलों असतां, 'फक्त शिवाजी महाराजच माझा कान धरूं शकतील. इतर कोणीहि मला कांहीं शिकवूं शकणार नाहींत' असे जे उद्गार त्यांनीं काढले त्यावरून मला दिसून आलें होतें. त्याचें कुठल्याहि पक्षाशीं नीटसें न जमण्याचें कारणहि तेंच. त्यांच्या कांहीं आत्यंतिक भक्तांचा मला जो अनुभव आला त्यामुळेंहि 'शिष्यापराधे गुरोर्दंड:' या न्यायानें सावरकरांबद्दल मला अप्रीति वाटायला लागली.

मागें एकदां (१९२९ सालीं) मी जवळ जवळ एक वर्षभर अहमदाबादेस होतों. पुढें लॅमिंग्टन रोड गोळीबार प्रकरणां'त प्रसिद्ध झालेले ग. र. वैशंपायन हे त्यावेळीं तेथें होते. ते फारच जाज्ज्वल्य सावरकर भक्त होते. 'भद्र'मध्यें (अहमदाबादचा महाराष्ट्रीय वस्तीचा भाग) कोणसा एक गांधी भक्त राहायला आला आहे असें ऐकल्यावरून त्यांनीं मला एक दिवस भेटायला बोलाविलें. चहापाणी होऊन गप्पा सुरू झाल्यावर ते मला

म्हणाले, " आपल्या देशांत चरखा, खादी, हरिजनसेवा, राष्ट्रीय शिक्षण असल्या कामांना ह्वीं तेवढीं माणसें मिळतात; पण इंग्रजाच्या गळ्याला हात घालण्याचें जें मुख्य काम त्यासाठीं मात्र कोणी मिळत नाहीं!' त्यावर मी लगेच म्हणालों, "सांगा हो, इंग्रजाचा गळा केवढासा आहे तो! म्हणजे पांच–दहा कीं पन्नास माणसांनीं जिवाचा धडा करायला पाहिजे आहे तें समजेल! एकदां तेवढें बाहेर पडल्यानें जर सगळ्यांचें कायमचें काम होऊन जाणार असेल तर तुमच्या सूचनेचा विचार करतां येईल! पण तुमची विचारसरणीच मुळांत चूक आहे. इंग्रजाचें येथील राज्य फक्त कांहीं गोऱ्यांवर अवलंबून नाहीं. हें राज्य म्हणजे एक प्रकारचें यंत्र आहे, आणि म्हणून तें उखडायचें तर त्यासाठीं गुप्त कट उपयोगाचे नाहींत, गांधीजी म्हणतात तसा 'ओपन प्लॉट' च करायला पाहिजे." पुढें १९३० सालीं मे महिन्यांत मी आणि लॅमिंग्टन रोड केसमधील माफीचे साक्षीदार मोघे यांचा मुलगा बाळ असे आम्हीं दोघे वरळीच्या तुरुंगांत असतांना हेच वैशंपायन एकाद्या रोहिल्याच्या पोशाखांत आम्हांला भेटायला आले होते आणि ' येथें स्वस्थ बसूं नका, कांहीं तरीं गडबड करा ' असें सांगून गेले होते.

१९४१ साली मीं ' नवशक्ति ' पत्रांत असतांना स्वा. सावरकरांचें कुठेंसें एक भाषण झालें. त्यांत गांधीजींवर टीका करतांना 'शेवगांवच्या झोपडीनें शनवारवाड्याला शहाणपणा शिकवूं नये ' असें त्यांनीं म्हटल्याचें माझ्या वाचनांत आलें. तेव्हां, साताऱ्याला छत्रपतींच्या पायाजवळ राहाण्याचें सोडून, पुण्याला शनिवारवाड्यांत स्वतंत्रपणें राहाण्यास पेशव्यांनीं सुरुवात केल्यानंतर तेथें जीं अनेक वाईट कृत्यें झालीं त्यांची यादीच देणारा एक लेख मी सावरकरांना प्रत्युत्तर म्हणून लिहिला होता आणि असल्या शनवारवाड्याचा कसला अभिमान धरायचा? असा त्यांस सवाल केला होता.

१९४६ सालीं पुन्हां असाच प्रसंग आला. देशाची फाळणी होऊं द्यावी कीं नाहीं या प्रश्नावर तेव्हां देशांत खूप जोराची चर्चा चालू होती.

आपल्या देशांत वाढलेली मुसलमानांची लोकसंख्या आणि हिंदू लोकांसंबंधाचें त्यांचें एकंदरांत धोरण यांचा विचार केल्यास, देशाची फाळणी करून आपण वेगवेगळा संसार थाटणें अपरिहार्य आहे असें कट्टर गांधीवादी राजाजीसुद्धां म्हणूं लागले होते. डॉ. आंबेडकर यांचेंहि तसेंच मत होतें. कम्युनिस्ट पक्षानें तर तसा उघडउघड प्रचार केला होता. कॉंग्रेसचे बाकीचे सर्व पुढारी किंकर्तव्यमूढ बनले होते.

त्यावेळीं 'आपला देश म्हणजे आपली आई. देशाची फाळणी करणें म्हणजे आईच्या शरीराची चिरफाड करणेंच होय.' वगैरे प्रकारचें केवळ भावनोद्दीपक भाषण सावरकरांनीं कोठेंसें केलें होतें. 'गाय ही माता नव्हे; एक उपयुक्त पशू या दृष्टीनेंच ती महत्त्वाची आहे.' असें म्हणणाऱ्या बुद्धिवादी सावरकरांनींच देशाला 'आई' म्हटल्यामुळें आणि त्या आधारावरच बाकीची सर्व फाळणी–विरोधी कल्पना मांडल्यामुळें त्यांचे विचार खोडून काढणें मला आवश्यक वाटलें आणि मी 'लोकमान्य' पत्रांत तसा माझ्या नांवानें एक लेख लिहिला. त्याचा परिणाम असा झाला कीं अनंत हरी गद्रे यांनीं त्यांच्या 'निर्भीड' साप्ताहिकांत 'पांडोबांचा पिचका पांवा' या मथळ्याखालीं संपादक गाडगीळ व मी अशा दोघांचीहि टिंगल केली!

## डॉ. आंबेडकरांच्या सिद्धान्ताचा पडताळा

फाळणी होणें जरूरच आहे, या माझ्या मतामागची भूमिका पुढीलप्रमाणें होती:–हिंदुधर्म व इस्लाम हे परस्परविरोधी धर्म आहेत. त्यामुळें त्या धर्ममतांच्या अनुयायांमध्येंहि नेहमीं विरोधच राहणार हें ब्रह्मलिखित आहे. आपल्या देशांत आपण मुसलमानांना पक्का पाय रोवूं दिला नसता तर आजच्यासारखा देशाच्या फाळणीचा प्रसंग आपल्यावर ओढवला नसता. पण, या देशांत मुसलमानांचा पाय पक्का रोवला जाऊं देण्याचें, इतकेंच नव्हें तर येथें त्यांची लोकसंख्या आठ–नऊ कोटि वाढूं

देण्याचें पाप आपल्या हातून घडलें आहे. आतां इतक्या मुसलमानांना हिंदु बनविणें किंवा देशाबाहेर घालविणें आपल्याला शक्य नाहीं. आपल्या संख्याबलानें त्यांवर नेहमीं सत्ता चालविणेंहि आपल्याला शक्य होणार नाहीं. तसेंच ते आपल्याशीं गुण्यागोविंदानें नांदतील हेंहि कधीं शक्य नाहीं. कारण ते एकदां या देशांत राज्यकर्ते होते. हिंदूंवर हुकुमत गाजविण्याची त्यांच्या रक्ताला संवय जडली आहे. म्हणून आपण आपल्याच कर्मानें आपल्याला अडचणीच्या परिस्थितींत टाकलें याबद्दल आपण केव्हांतरी एकदां तसेंच मोठें प्रायश्चित्त घेणें आपल्याला भाग आहे. आपल्या हातून महापातक झाल्यास काशीला जाऊन मुंडण करतात. पण मग पुन: तसें मुंडण करावें लागण्यासारखें महापातक आपल्या हातून घडणार नाहीं अशीहि काळजी घेतात. त्याप्रमाणें कृत पापाबद्दल देशाची फाळणी एकदांच करावयाची पण ती अशी करावयाची कीं फिरून पुन्नः तसा प्रसंग कधींच येऊं नये. म्हणूनच लोकसंख्येच्या अदलाबदलीच्या अटीवरच देशाची फाळणी मान्य करावी असें म्हणणारा मी होतों. तसें घडलें असतें तर आमच्या देशांत मुसलमान नाहींत आणि मुसलमानांच्या देशांत हिंदु नाहींत असें होऊन भांडणाचें मूळ कायमचें मिटलें असतें. खरें पाहतां कोठलाहि देश म्हणजे त्यांतलीं माणसें, तेथले दगडधोंडे, नद्यापर्वत म्हणजे देश नव्हे. शिवाय भूमि–मातृभूमीहि-तिच्यावर पाय देऊन चालण्यासाठीं, नांगरानें नांगरण्यासाठीं, सुरुंग लावून फोडण्यासाठींच असते. तेव्हां राजकीय दृष्टीनें तिची फाळणी केल्यानें त्या 'आईला' दुखापत केल्यासारखें मुळींच होत नाहीं. आपल्या ३० कोटी हिंदु लोकांचें आणि आपल्याला जवळचे असणारे शीख, पारशी, ख्रिस्ती (आणि आतां बौद्ध) यांचेंच हित एवढें मर्यादित ध्येय डोळ्यांपुढें ठेवून फाळणी केली जावी असें मला वाटत असे.

पण, फाळणीविरोधी लोकांनीं तिला अविचारी विरोध केला आणि फाळणी करायला तयार होणारांनींहि ती अविचारानें केली. फाळणी स्वीकारणाऱ्या कॉंग्रेस पुढाऱ्यांनीं ४ कोटी मुसलमानांना हिंदुस्थानांत राहूं दिलें आणि ३ कोटी हिंदु–शीखांना पाकिस्तानी लांडग्यांच्या स्वाधीन

अनुक्रम 32024 ... 9025

केलें ! त्याचा शेवट काय झाला ? तर आपल्या सैनिकांच्या संरक्षणाखालीं ज्यांना हिंदुस्थानांत–'त्यांच्या' राज्यांत–येतां आलें असतें त्या हिंदू–शीखांना पाकिस्तानी लांडग्यांच्या तोंडांतून वांचण्यासाठीं नागडे–उघडे पळत इकडे यावें लागलें आणि अजूनहि 'निर्वासित' म्हणूनच येथें राहावें लागलें आहे !

"हिंदुसमाजाच्या दृष्टीनें 'क्राइसिस'ची अथवा आणीबाणीची परि-स्थिति जेव्हां जेव्हां उत्पन्न झाली तेव्हां तेव्हां हिंदुसमाजाच्या नेत्यांना योग्य असा मार्ग काढतां आलेला नाहीं (दे हॅव् फेल्ड देअर कम्यु-निटी)" असें डॉ. आंबेडकर यांनीं त्यांच्या 'थॉटस् ऑन् पाकिस्तान' या पुस्तकांत जें म्हटलें आहे तें पुन: एकदां खरें ठरलें आहे !

## 'लोक विश्वासघात करोत, तुम्ही करूं नका'

देशाची फाळणी होऊन स्वातंत्र्य मिळण्याच्या आधीं, बॅ. जिना यांच्याशीं समेट होत असला तर पाहाण्याचा गांधीजींनीं शेवटचा एक प्रयत्न करून पाहिला. त्यावेळीं, गांधीजींनीं जिनांकडे जायचें कीं जिना यांनीं त्यांच्याकडे यायचें इथपासून वाद माजला होता. गांधीजी हे महान् नेते असल्यामुळें आणि ते वयानेंहि वडील असल्यामुळें जिनांनीं त्यांच्याकडे यावें असें लोकमत होतें. याच्या उलट, 'वाटाघाटींची गरज गांधीजींना आहे, त्यांनीं हवें तर माझ्याकडे यावें' असें बॅ. जिना म्हणत. शेवटीं गांधीजींनींच जिनांच्या घरीं वाटाघाटींसाठीं जावयाचें ठरलें. मलबार हिल-वर बॅ. जिनांच्या बंगल्यांत रोज त्यांच्या भेटी व्हायच्या, बोलणीं व्हायचीं, आणि एकमेकांच्या मुद्यांवर ते दोघे एकमेकांना लेखी उत्तरें पाठवायचे. त्यांच्यांत काय बोलणीं झालीं, कोणी काय काय कबूल केलें याबद्दलच्या 'खास बातम्या' म्हणून वृत्तपत्रांत कांहीं वृत्तेंहि प्रसिद्ध व्हावयाचीं. त्यामुळें रोजच्या रोज वातावरणांत खळबळ उत्पन्न होत असे. शेवटीं, एक दिवस 'लोकमान्य' पत्रांत सबंध गांधी–जिना पत्रव्यवहारच प्रसिद्ध झाला.

आपला गुप्त असा असा पत्रव्यवहार फोडला गेल्याबद्दल गांधी व जिना एकमेकांना दोष देऊं लागले. गांधीजी जिनांना म्हणत 'तुमच्या माणसांनीं विश्वासघात केला.' जिना गांधीजींना म्हणत 'तुमच्या माणसांनीं विश्वास-घात केला.'

बॅ. जिनांकडे नोकर असलेल्या आपल्या एका हिंदूनेंच पैशांसाठीं तो पत्रव्यवहार 'लोकमान्य'च्या मालकांना दिला आणि आमच्या मालकांनीं पैशाचें आमिष दाखवून त्याला विश्वासघातास प्रवृत्त केलें हें मला माहित झालें होतें. म्हणून मी गांधीजींना पत्र लिहिलें आणि बॅ. जिना यांचा दोष नाहीं असें त्यांना कळविलें. 'दुसऱ्या कोणी विश्वासघात केल्याचें आपणांला कळविण्यासाठींच मी हें पत्र लिहित आहें. हासुद्धां एकप्रकारें विश्वासघातच आहे. पण मोठ्या कार्याचा विघाड होऊं नये म्हणूनच मी हा छोटा विश्वास-घात केला आहे.' असें मी त्या पत्रांत गांधीजींना कळविलें होतें. पत्र बंद पाकीट होतें. गांधीजींचें मला लगेच त्यावर उत्तर आलें. 'इतरांनीं कोणाचा विश्वासघात केला तरी तुम्ही करूं नका.' असा मला त्यांत उपदेश केलेला होता. पत्राखालीं प्यारेलाल ( गांधीजींचे खाजगी चिटणीस ) यांची सही होती.

## जेवणाच्या डब्यांत पैसे, खिशांत रिकामें पाकीट

एकोणीसशें एकूण पन्नासच्या डिसेंबरच्या एक तारखेस मी 'लोक-मान्य' पत्रांतून सेवानिवृत्त झालों तेव्हां माझी प्रॉव्हिडंट फंड (मालकांच्या काँट्रीब्यूशनसह), डिसेंबरचा पगार आणि एक महिन्याच्या रजेचा पगार मिळून मला एकंदर तेहतीसशें रुपये मिळाले. त्यांतून माझ्या दुसऱ्या लग्ना-साठीं आणि पहिल्या पत्नीनें मुलगी आणि मुलगा अशीं जीं दोन मुलें मागें ठेवलीं त्यांतील मुलाच्या मुंजीसाठीं काढलेलें प्रॉव्हिडंट फंडांतलें कर्ज फेडल्या-वर २९ शें रुपये शिल्लक उरले होते. माझें तेव्हां कल्याणला बिऱ्हाड होतें. इतके पैसे बरोबर घेऊन मी कल्याणला परत जातांना नेमका माझा

खिसा कापला जायचा, आणि सर्व भांडवल नाहींसें व्हायचें ! इतर वेळीं कधींहि खिसा कापला जाण्याची जी मला भीति वाटली नाहीं ती त्या दिवशीं वाटली, आणि म्हणून ते पैसे खिशांतील पाकीटांत न ठेवतां, कल्याणहून सकाळीं मुंबईस येतांना ज्या डब्यांतून मी पोळचा अन् भाजी आणली होती तो डबा घांसून त्यांत मी त्या सगळ्या नोटा भरल्या. मी कल्याणला परत जातांना पिशवींत तो डबा होता आणि खिशांत रिकामें पाकीट होतें. त्यावेळीं कल्याण येथेंहि चोऱ्यांना ऊत आला होता. घारे यांच्या वाड्यांतले आम्ही भाडेकरू रात्रीं पाळीपाळीनें २–२ तास पहारा करीत असूं. म्हणून मी नेलेलें २९ शें रुपये आमच्या मूल्यवान वस्तू ठेवण्याच्या ट्रंकेंत न ठेवतां, लोखंडी मोडतोड भरलेल्या एका जुन्या ट्रंकेंत खोलीच्या माळ्यावर ठेवले होते. पैसे हातांत पडल्याबरोबर भराभर देणीं फेडण्यास मी सुरुवात केली आणि तीं देऊन झाल्यावर कांहीं नवी खरेदी करून, कल्याण येथील बिऱ्हाडाच्या सामानासह ११ डिसेंबरला कोंकणांतील माझ्या गांवीं आडीवरें येथें जाऊन आम्ही जाऊन पोंचलों.

तेथें शके १०२४ पासून ज्या जागेवर आमचा वंश वाढला ( कधींहि दत्तक घ्यावा न लागतां वाढला ) त्या जागीं असलेल्या वडिलार्जित घराचा आमच्या वांट्याचा भाग मोडकळीस आलेला होता आणि म्हणून त्याच गांवीं असलेल्या आमच्या मामांच्या घरांत आम्ही सतत ३० वर्षे वसती केली होती. आतांहि गांवीं गेल्यावर त्याच आजोळघरांत उतरलों होतों. पण आपला चौथरा ( घरबंद ) ओसाड पडूं देऊन आम्ही लोकांच्या ( मामा झाले तरी लोकच ) घरांत दिवे लावीत राहतों हें माझ्या मनाला खटकत असें. म्हणून आमच्या पडक्या घराची जागा साफसूफ करून तेथें नवें घर बांधण्याचें काम मी सुरू केलें. मुंबईहून नेलेले पैसे घरांत होते तोंपर्यंत मला स्वस्थ झोंप लागत नसे. घरासाठीं सामानाची खरेदी करतांना ( सगळेंच मला विकत घ्यावें लागलें. कारण सागाचीं किंवा फणसाचीं झाडेंहि आमच्या वांट्यास फारशीं आलेलीं नव्हतीं. ) रोज १००–१०० रुपयांची नोट मला मोडावी लागे. तेव्हां या नोटा पाहून कोणी चोरबीर तर माझ्या पैशांवर

डोळा ठेवून नसेल ना ? असें वाटे. पण, ' घर बांधून पहावें ' या म्हणीचा अनुभव आला. आमचा मुंबई थाटाचा घरखर्च आणि घर बांधण्याचा खर्च यामुळें माझ्या जवळच्या नोटा एकदोन महिनाभरांतच संपल्या. पण त्यामुळें मला गाढ झोंप लागूं लागली, आणि ( घराचें काम पुरें होण्यासाठीं आणखी आणखी पैशांची जी गरज पडे तीमुळें ) रोज सकाळीं उत्साहानें कर्ज मागण्यासाठीं मी फिरूं लागलों. मध्यंतरीं एकदां मुंबईस येऊन विमापॉलिसी-वरहि कर्ज काढलें. शेवटीं एकदांचें घर बांधून झालें तरी, मला करतां येण्यासारखा आणि दरमहा ६०–७० रुपये मिळतील असा आमच्या गांवीं धंदा नाहीं असें नक्की ठरल्यावर, मी पुन्हां मुबईस आलों. एकूण सुमारें ६ महिने कोंकणांत होतों.

मुंबईस परत आल्यावर पुनः वर्तनानपत्राच्या कचेरीची वाट धरणेंच मला भाग होतें. म्हणून ' कसें काय ?' वगैरेची चौकशी करण्याच्या निमित्तानें ' लोकमान्य ' पत्रांत खेपा घालतांघालतां मी एक दिवस तेथेंच १२०+४० रुपयांवर पुनः चिकटलों. ' लोकमान्य ' पत्रांतली माझी ही तिसरी नोकरी ७ महिनेच टिकली ! कारण ' लोकमान्य ' पत्राचा महाराष्ट्रांत प्रसार करण्यासाठीं व खप वाढविण्यासाठीं संपादक वर्गीतील रा. धों. बाकरे यांना फिरतीच्या कामावर पाठवावयाचें ठरलें होतें आणि ते त्या कामावर असेतोंपर्यंतच संपादकांत एक माणूस वाढवावयाचा होता. त्यामुळेंच माझी तेथें सोय झाली होती. पण पुढें बाकरे फिरतीच्या कामावरून परत येऊन ३–४ महिने झाले तरी माझ्या नोकरीवर गदा आली नव्हती. अखेर एक दिवस रात्रपाळीसाठीं कामावर येऊन बसतों तों ऑफिसचा कारकून दोन कागद घेऊन आला. ती नोटीस होती. एक सही करून परत दिला आणि दुसरा माझ्याजवळ ठेवला. कारकून गेल्यावर आमचे ऑफीस बॉईज मला म्हणाले, ' तुम्हाला किती दिवसांची नोटीस दिली आहे ? ' मी विचारलें, ' कां ! एक महिन्याची आहे, अन् एक महिन्याचीच देतात. ' ' अहो ! तुम्हीं आतां आलांत म्हणून तुम्हाला माहीत नाहीं.' ऑफिस बाईज मला सांगूं लागले, परुळेकर अन् सांखळकर यांनाहि

नोटीस मिळाली पण ती १५–१५ दिवसांची आहे. तेहि टेंपररीच होते ना. वरें झालें तुम्हाला तरी एक महिन्याची नोटीस दिलेनी.'

नोटिशीच्या कागदाची घडी करून मी ती खिशांत ठेवली आणि माझ्या कामाला लागलों. ही सुटली तर दुसरीकडे कोठें तयार होईल माझ्यासाठीं नोकरी, असें माझ्या मनाशीं मी समाधान मानलें. अनेक वर्षांच्या अनेक अनुभवांनीं नोकरी मिळण्याचा आणि सुटण्याचा मला सरावच झालेला होता. त्यामुळें नोटीस मिळाल्यानंतरहि माझ्या हंसण्या–खिदळण्यांत कांहीं कमतरता आली नाहीं.

दुसऱ्या दिवशींहि रात्रपाळीच होती तरी जरा लवकर ( म्हणजे सुमारें ५ वा. ) मी ऑफिसांत गेलों होतों. 'चहा'ला माझा तेथें 'पेट्रोल' हा जो 'कोडवर्ड' होता त्या शब्दांत मी चहा मागविला आणि चहा पिऊन झाल्यावर खिशांतली चंची काढून पानसुपारी खाऊं लागलों. 'परांजपेंना नोटीस मिळाली असेल आणि ते मनांत कष्टी असतील' या कल्पनेनें तेथें हजर असलेल्या मंडळीपैकीं आपणहून माझ्याशीं कोणीच बोलेना. पण सायंकाळच्या वर्तमानपत्रांपैकीं कांहीं वर्तमानपत्रें चाळतां–चाळतां मीच हास्यविनोद करूं लागलों असल्याचें गाडगीळांच्या लक्षांत आलें आणि त्यांनीं सालये यांना आपल्या केबिनमध्यें बोलावून 'परांजप्यांनासुद्धां नोटीस द्यायची असें रतीलाल म्हणाले होते, पण दिली नाहीं कीं काय ?' असें त्यांना विचारलें.

सालये म्हणाले, 'मला कांहीं माहिती नाहीं. मी चौकशी करतों.'

मग बाहेर आल्यावर त्यांनीं मला विचारलें, 'काल रात्रीं तुम्हांला वरचें एकादें पाकीट मिळालें काय ?'

मी म्हणालों, 'वरचें पाकीट नव्हतें, वरचा माणूसच आला होता नोटीस द्यायला. घेतली ती मी.'

मला नोटीस मिळाली असतांहि माझ्यांत कांहीं फरक पडलेला नाहीं हें पहातांच गाडगीळ त्यांच्या खोलींतून बाहेर आले आणि म्हणाले, 'अहो

तुमची नोकरी सुटणार याचा तुमच्यावर कांहीहि परिणाम होत नाहीं कसा? खुशाल–हंसतां–खिदळतां ? तुम्हीं प्रपंचवाले आहांत नां ? '

मागें 'लोकमान्यां'तून मी खुशीनें सेवानिवृत्त झालों तेव्हां 'हा माणूस आहे कीं राक्षस आहे ? आपल्या बायकोमुलांची काळजी कशी नाहीं याला?' असें गाडगीळ यांच्या पत्नी ( सौ. इंदिराबाई गाडगीळ ) गाडगीळांजवळ म्हणाल्या होत्याच. पण 'सकल जीवांचा करीतो सांभाळ, तुज मोकलील ऐसें नाहीं' असें तुकारामांनीं जें सांगितलें आहे त्यामुळें मला, पुढें कसें होईल याची, कधींच काळजी वाटत नाहीं, एवढें खरें !

परुळेकर व सांखळकर यांना १५–१५ दिवसांचीच नोटीस दिली असतां मलाच तेवढी एक महिन्याची कशी, याची चौकशी केल्यावर 'प्रांजपे तो आपणोज छे, एने एक महिनानी नोटीस आपो' असें 'लोकमान्य'चे जनरल मॅनेजर रतीलाल शेठ यांनीं म्हटलें होतें असें समजलें.

## बेकारींत आपल्या संतांनींच मला जेवायला घातलें

तिसऱ्यांदा 'लोकमान्य' पत्राची नोकरी सुटल्यावर बरेच दिवस नोकरी नव्हती. पण त्या अवधींत मला आपल्या महाराष्ट्रीय साधूसंतांनीं जेवायला घातलें. म्हणजे त्याचें असें झालें.

ताडदेवला एक दिवस गेलों असतां, तेथल्या ताडदेव बुक डेपोचे मालक तानवडे मला भेटले आणि म्हणाले, 'तुम्हीं आतांशीं रिकामेच आहांत ना ? मग आमचें थोडेंसे काम करता ? तुम्हाला कांहीं तरी लगेच देऊं ! '

मी म्हटलें 'काय काम आहे ? '

ते म्हणाले, 'आम्हीं फक्त धार्मिक आणि भक्तिपर पुस्तकें प्रसिद्ध करतों. तर एकटया तुकाराम महाराजांचे १०० अभंग, आणि ज्ञानदेव, नामदेव वगैरे बाकीच्या संतांचें मिळून १०० अभंग असे दोन निवडक संग्रह

आम्हाला काढून द्या. त्याशिवाय तुमच्याजवळ स्वतंत्र असें कांहीं असलें तर तेंहि आम्हीं घेऊं.'

मी लगेच होकार देऊन वह्या खरेदी केल्या आणि कामाला लागलों. तुकाराम महाराजांच्या अभंगांतून वेंचे काढायला मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलेला गाथा मला उपयोगी पडला, नामदेवांचा गाथा, पांगारकरांचें भक्तिमार्गप्रदीप आणि जुनें मराठी 'नवनीत' वगैरेंचा उपयोग करून मी बाकीच्या संतांच्या वेच्यांचें पुस्तक तयार करून दिलें. त्यानंतर 'भेंड्या, लावण्याचे श्लोक, बायकोनें नवऱ्याचें अन् नवऱ्यानें बायकोचें नाव घेण्याचे उखाणे आणि 'लोकमान्य' पत्राच्या सायंकालीन भावंडांत म्हणजे 'लोकशाही 'मध्यें प्रसिद्ध झालेलीं माझीं कांहीं पुराणें इतकें 'साहित्य' त्यांनीं मजकडून घेतलें आणि त्याबद्दल थोडथोडे (पण लगेच) पैसे दिले. कवितांच्या भेंड्या लावण्याचे निवडक श्लोक मी जे त्यांना दिले ते त्यांनीं 'संगीत श्लोक' या नांवानें प्रसिद्ध केले. उखाण्यांचें पुस्तकहि लवकर प्रसिद्ध झालें. पण बाकीचें साहित्य त्यांजकडे अजून पडूनच असेल. कारण मध्यंतरीं त्यांच्यावर कौटुंबिक आपत्ती आली होती. माझ्या पुराणांचें पुस्तक निघावयाचें पण संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबद्दलचें एक नवें पुराण रचून तें पहिल्या पुराणांच्या भरीस घालावयाचें आणि मग पुस्तक काढावयाचें असें ठरलें होतें. पण तें नवें पुराण रचण्याचें काम अजून माझ्याकडून झालेंच नाहीं.

'भेंड्यांच्या कवितां' चा विषय निघाला म्हणून त्या बद्दलचा एक जुना अनुभव सांगतों. १९४७ सालीं 'लोकमान्यां 'त असतांना, आमच्या पत्रासाठीं रेडियोचा कार्यक्रम लिहून देण्याची एक दिवस माझ्यावर पाळी आली. रेडियोवर दुसऱ्या दिवशीं जो कार्यक्रम व्हावयाचा असेल त्याचें 'आकाशवाणी 'च्या पुस्तकांतून रोजच्या रोज भाषांतर करून वृत्तपत्रांत दिले जातें. त्याप्रमाणें मी भाषांतर करीत असतां 'इंग्रजी कवितांच्या भेंड्यां 'चा कार्यक्रम होणार असल्याचें वाचलें. त्याबरोबर रेडियो चालकांना मी आधीं एक शिवीच हांसडली. कवितांच्या भेंड्या लावण्याची आपल्या

महाराष्ट्रांत फार जुनी परंपरा असतां, ‘ मराठी कवितांच्या भडचां ’चा कधीं सुद्धां ज्यांनीं कार्यक्रम केला नाहीं ते आमच्यापुढ इंग्रजी कवितांच्या भडचा नाचवितात याचा मला राग आला आणि मी त्या दिवशीं घरीं गेल्याबरोबर, कवितांच्या भेंडचांचें रेडियोवर करतां येण्यासारखें ‘ स्क्रिप्ट ’ तयार केलें, आणि अं. शं. अग्निहोत्री यांना तें दाखवून, मुंबई रेडियोस्टेशंन-कडे पाठवून दिलें. ४ महिने झाले तरी त्याची कोणी दाद घेईना. शेवटीं ‘ तुम्ही रेडियोवर तो कार्यक्रम करतां कीं मी माझा तो मजकूर आमच्या ‘ लोकशाही ’ पत्रांत छापून टाकूं ? ’ असें त्यांना विचारतांच माझें तें ‘ स्क्रिप्ट ’ स्वीकारलें जाऊन त्याबद्दल मला १० रुपये आणि त्यावेळचे गव्हर्नर जनरल श्री. राजाजी यांच्या सहीची ‘ सनद ’ मिळाली. ‘ हा कार्यक्रम पुन्हां जेव्हां जेव्हां रेडियोवर केला जाईल तेव्हां तेव्हां प्रत्येक कार्यक्रमाबद्दल तुम्हांला पांच रुपये मिळतील ’ असें त्या सनदेंत म्हटलेलें होतें. बहुधा तो कार्यक्रम पुनः कधींच झाला नसावा !

कवितांच्या भेंडचा लावायच्या तर भरपूर पाठांतर लागतें. म्हणून पूर्वी शाळामध्यें हा कार्यक्रम अवश्य करीत. विद्यार्थ्यांचे दोन गट पाडायचे. त्यांतल्या एका गटानें एक कविता म्हटली कीं त्या कवितेचें जें शेवटचें अक्षर असेल त्या अक्षराच्या बाराखडींतलें कोणतेंहि अक्षर जिच्या प्रारंभीं असेल अशी कविता दुसऱ्या गटानें म्हणावयाची, असें हें द्वंद्व चालतें. ण, ळ वगैरे कांहीं अक्षरें आरंभीं असणारी कविता असतच नाहीं. अशा वेळीं ‘ अक्षर द्या ’ म्हणून मागणी करावयाची असते आणि जें अक्षर दिलें गेलें असेल तेंच अक्षर आरंभीं असेल अशी कविता म्हणावी लागते. आपल्याला जर त्या अक्षराची कविता आली नाहीं तर आपल्यावर एक ‘ भेंडी लागते. ’ कवितांच्या या ‘ द्वंद्व ’ युद्धांत कांहीं वेळां प्रतिपक्षी लबाडी करतो आणि काम भागविण्यासाठीं भलताच शब्द कवितेंत आरंभीं घालून तो तीं आपल्या तोंडावर फेकतो. अशा वेळीं त्याची लबाडी त्याच्या पदरांत घालण्याइतकें आपलें पाठांतर पक्कें असावें लागतें. पण आजकालच्या शिक्षणाधिकाऱ्यांना पाठांतराचें महत्त्व समजेल तर ना !

# चवथ्यांदा 'लोकमान्य' पत्रांत नोकरी

सन १९५१ च्या जानेवारी अखेर 'लोकमान्य' पत्रांतली माझी नोकरी सुटली आणि १९५४ सालच्या एप्रिलच्या आरंभीं 'लोकमान्य' च्या कोडें खात्यांत मला पुनः नोकरी मिळाली. मधल्या अवधींत २२ दिवस चिमणलाल शहा यांच्या 'चित्रा' पत्रांत, जवळजवळ एक वर्ष वसंतकुमार सराफ यांच्या 'वसुधा' मासिकांत आणि सुमारें दीड वर्षं डाह्याभाई पटेल यांच्या मालकीच्या 'नवभारत' दैनिकांत नोकरी केली. बाकीचे दिवस संतांनीं घातलेल्या अन्नावर गेले. 'वसुधा' मासिकांतली नोकरी सुखाची झाली. 'लोकमान्य' पत्रांतील माजी सहकारी र. ना. लाटे यांच्या ओळखीनें 'वसुधा' मासिकांतली ही नोकरी मला मिळाली होती. श्री. सराफ मालक असले तरी माझ्या 'नोकर'पणाची मला त्यांनीं कधीं जाणीव दिली नाहीं. पगाराचे पैसे एकदम नाहीं तरी दुसरा महिना उलटायच्या आंत थोडेथोडे मिळून पदरांत पडत. तेव्हां 'नवयुग साप्ताहिका' च्या अत्रे प्रिंटिंग प्रेसमध्यें तें मासिक छापलें जात असे. म्हणून मी तेथेंच (कॉंग्रेसहाऊस रोड व लॅमिंग्टन रोड यांच्या नाक्यावरील पेंढारकरांच्या छापखान्याची जागा) कामास जात असें. 'नवयुग' चे त्यावेळचे मॅनेजर नारायण पुराणिक यांनीं 'नवयुग'च्या त्या वर्षीच्या दिवाळी अंकाचीं प्रुफें वाचण्याचें कामहि कंत्राटी पद्धतीनें माझ्याकडे दिलें तेव्हां कित्येकदां माझी त्या प्रेसमध्येंच वसतीहि झालेली आहे. पुढें 'नवभारत' चे शेवटचे संपापक ह. वि. देसाई यांनीं मला 'नवभारत' मध्यें घेतलें. पण 'नवभारत' पत्राचे ते अखेरचे दिवस होते. मी तेथें नोकरीला राहिल्यानंतर थोड्याच दिवसांनीं डाह्याभाई पटेलांकडून त्या पत्राची मालकी बिर्लांकडे गेली. आणि मग तें बंद करण्यांत आलें. बिर्लांच्या कारकीर्दींतला सगळा पगार मिळाला पण डाह्याभाईंच्या कारकीर्दींतला २८ दिवसांचा पगार बुडाला.

'नवभारत' दैनिकांत नोकरी करीत असल्या वेळच्या दोनच आठवणी उल्लेखनीय आहेत. एक म्हणजे मुंबई शहारांतल्या गुन्हेविषयक बातम्यां-

साठीं रोज सायंकाळीं पोलिस स्टेशनांना भेटी देणें आणि एका प्रवचनाचें रिपोर्टिंग. ' नवभारत ' पत्राच्या पहिल्या पानवर त्या पत्राच्या नांवाच्या ब्लॉकखालीं आणि वर अशा दोन ' हेडलायनी ' असत. वरची हेडलाईन मुंबईतल्या एकाद्या गुन्ह्याची आणि खालची राजकीय–सामाजिक विषयाची. पोलीस–अधिकाऱ्यांशीं माझ्या स्वतःच्या अशा ओळखी नव्हत्याच, पण नेहमीं आम्हांला ' पोलीस न्यूज ' देणारे गृहस्थ रोज सायंकाळीं ताडदेवला आमच्या ऑफिसांत यायचे आणि मग त्यांनीं व मी ऑफिसच्या जीप गाडींतून पोलीस–स्टेशनांना भेटी द्यायला जायचें असा कार्यक्रम असे. पोलीस स्टेशनांत सगळेच लोक माझ्या जोडीदारास ओळखणारे आहेत असें मला या भेटींमध्यें आढळून आलें. त्यांनीं विचारलें म्हणजे कांही तरी बातमी मिळे, नाहींतर ' आज रात्रीं एकाद्या चांगल्या बातमीचा चान्स आहे; तेव्हां चौकशी करा ' असें सांगण्यांत येई. कित्येकदां एकादा पोलिस अधिकारी किंवा हेड-कॉन्स्टेबल बातमी प्रसिद्ध करतांना तींत त्याचें नांव अवश्य घालण्यास सांगे.

' स्वराज्यांतल्या पोलिसांनीं आपण जनतेचे नोकर आहोंत हें जसें नेहमीं ध्यानांत ठेवलें पाहिजे तसेंच, स्वराज्यांतल्या जनतेनेंहि पोलिसांशीं मित्रत्वानें आणि सहकार्यानेंच वागलें पाहिजे ' असें माझें मत असल्यामुळें ' पोलीस न्यूज ' चें संपादक करण्याची ज्या ज्या वृत्तपत्रांत मला संधी मिळाली त्या त्या वृत्तपत्रांत पोलिसवर्गाला न्याय करण्यास, त्यांतील कोणी विषेष बहादुरी दाखविली असली तर त्याचा गौरवपूर्वक उल्लेख करण्यास मी कधींहि चुकलेलों नाहीं.' स्वराज्य मिळण्याच्या पूर्वीच्या काळींहि पोलीस लोकांबद्दलचा माझा अनुभव चांगलाच आहे. काल शाळा सोडली अन् आज देशभक्त झाले असलीं पोरें पोलिसांना ' इंग्रजांचे गुलाम ' ' इंग्रजांचे कुत्रे ' म्हणत. तें मला कधींच आवडलेलें नाहीं. ' तुमचे वडील, काके–मामे काय करतात रे ?' असें मी त्यांना विचारी तेव्हां त्यांचेहि नातेवाईक सरकारी नोकरच असल्याचें हटकून उघडकीस येई. मग बिचाऱ्या पोलिसांनींच तेवढ्या आपापल्या नोकऱ्या कां सोडाव्या ? उलट, सत्याग्रह्यांबद्दल

त्यांच्या मनांत सहानुभूति असल्यामुळेंच, सत्याग्रह्यांच्या अंगावर फटके न मारतां, त्यांच्या मागें जमिनीवरच लाठ्या आपटून, लाठीमार केल्याचें नाटक मुंबईच्या पोलिसांनीं कित्येकदां केलें आहे.

१९३० सालच्या चळवळींत नाशिक जिल्ह्यांत नामपूर गांवाजवळ मला पोलिसांनीं अटक केली. गुलाबसिंग नांवाचे नापिक जातीचे फौजदार तेव्हा तिथें हजर होते. मला घेऊन ते आणि त्यांच्या बरोबरचे पोलीस सटाण्याकडे चालले होते. पायीं चालतच जायचें होतें. दुपारीं १२ वाच्या सुमारास जें एक गांव लागलें तेथल्या धर्मशाळेंत आम्ही उतरलों. माझी दुपारच्या जेवणाची काय सोय करावी असा फौजदारसाहेबांपुढें प्रश्न होता. ते मला म्हणाले, 'तुम्ही ब्राम्हण ना हो ?' मी 'होय' म्हटलें. तेव्हां ते म्हणाले, 'या गांवांत ब्राम्हणाचें कांहीं घर नाहीं. फक्त सोनाराचें एक घर आहे. त्यांच्याकडचें जेवण तुम्हाला चालेल काय ?' त्यावर मी उत्तर दिलें, 'मी ब्राम्हण आहें याचें तुम्हाला एवढें संकट वाटायला नको. शाकाहारी जेवणच फक्त मला चालतें. मग तें कोणत्याहि हिंदूकडचें असो.' माझें हें उत्तर ऐकतांच फौजदारसाहेबांना आनंद झाला आणि ते म्हणाले, 'मी शाकाहारीच आहें. माझा जेवणाचा डबा आलेला आहे. त्यांतलें जेवण आपणा दोघांना सहज पुरेल. आपल्याजवळच सोय असतांना उगीच गांवांतल्या लोकांना कशाला त्रास द्या ?'

आणि आम्ही ओढ्यावर जाऊन हातपाय धुतले, लोटा भरून घेतला आणि धर्मशाळेंत परत आलों. तेथें फौजदारांनीं जेवणाचा डबा उघडला आणि त्याचें झांकण माझ्यापुढें ठेवून आंतल्या वस्तूंची वांटणी केली. भाजी, भाकरी, भजीं, लसणीचें तिखट आणि थोडा शिरा असें तें जेवण होतें. भोजनोत्तर त्या धर्मशाळेच्या एका खोलींतल्या दोन गाद्या पोलिसांनीं उघडून दिल्या आणि त्यांवर फौजदारसाहेब व कैदीसाहेब यांनीं खुशाल ताणून दिली. कांही तरी कलम लावून अटक करायचीच म्हणून मला उडाणटप्पूचें कलम लावून त्यांनीं पकडलें होतें. पण वागणूक मात्र फार चांगल्या प्रकारची दिली.

म्हणून 'नवभारत' पत्रांत आणि पुढें 'लोकमान्य' दैनिकांत पोलीस न्यूज देतांना मी पोलीस खात्यांतील माणसांना नेहमीं उचलून धरलेलें आहे.

## गुप्त वार्ताहरानें प्रगट व्हावें

'नवभारत' पत्रांत नोकरीला असतांना दादर येथील कीर्तनविद्यालय संस्थतर्फे 'दासनवमी' निमित्त वे. शा. सं. गाडगीळ शास्त्री यांची सतत १० दिवस प्रवचनें झालीं. त्यांतलें पहिल्या दिवसाचें प्रवचन झाल्यावर, दुसऱ्या दिवशीं सकाळीं 'नवभारत' चे संपादक ह. वि देसाई मला म्हणाले, 'राजकीय किंवा सामाजिक पुढाऱ्यांचीं अथवा वाङमय–नाट्य वगैरे विषयांतल्या अधिकारी व्यक्तींचीं भाषणें आपण वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करतों. पण कीर्तनकार–प्रवचनकार यांच्या विचारांना वृत्तपत्रांमध्यें कधींच प्रसिद्धी मिळत नाहीं. तर यावेळीं गाडगीळ शास्त्रींच्या प्रवचनांचा 'रिपोर्ट' आपण प्रसिद्ध करून पाहूं या.' मला त्यांची कल्पना पसंत पडली आणि त्या रिपोर्टचें काम त्यांनीं माझ्याकडेच सोपविलें. त्या रात्रीं ९ वा बाँबे सेंट्रलवर गाडी पकडून मी दादरला गेलों, आणि प्रवचन सुरू होण्याच्या वेळींच कीर्तन विद्यालयांत जाऊन पोचलों. श्री. गाडगीळशास्त्रींचें प्रवचन सुरू झालें होतें. आदल्या दिवशींच्या विवेचनाचें थोडक्यांत सार सांगून गाडगीळ शास्त्री पुढें बोलूं लागले तेव्हां हिंदुकोड बिलावर बोलत आहेत हें चटकन माझ्या लक्षांत आलें आणि मी लक्षपूर्वक त्यांचें प्रवचन ऐकूं लागलों. मी रिपोर्ट नण्यासाठीं आलों होतों तरी कागद–पेन्सिल बाहेर काढली नव्हती कीं प्रवचनकारांच्या पुढेंहि जाऊन वसलों नव्हतों. सभागृहांत शांतता असल्यामुळें मला शास्त्रीबुवांचें भाषण नीट ऐकूंहि येत होतें. प्रवचन आटोपतांच लगेच मी तेथून मागें फिरलों आणि गाडी पकडून ऑफिसांत परत आलों. देसाई ऑफिसांत होतेच. त्यांनीं विचारलें, 'प्रवचन कसें काय झालें?' मी म्हणालों, 'प्रवचन ठीक झालें पण तें सगळें सनातनी दृष्टीकोनांतून केलेलें आहे म्हणून त्या

प्रवचयाचा सटीक अहवाल द्यावा असें मला वाटतें. हिंदुकोड बिल हा आजचा ज्वलंत प्रश्न आहे. त्यावरची एकपक्षीय टीकाच वाचकांपुढें जाणें बरें होणार नाहीं. हिंदुत्वाभिमानी पण समाजसुधारणावादी हिंदु लोकांची त्या बिलाकडे पाहाण्याची दृष्टीहि वाचकांना समजली पाहिजे.'

देसाईंनीं माझ्या म्हणण्याला मान्यता दिली आणि सुरुवातीला गाडगीळ शास्त्री यांनीं त्या दिवशीं केलेलें भाषण आणि त्याच्याखालीं लगेच त्यांतील ( माझ्या मताप्रमाणें चुकीच्या ) मुद्याबद्दलची टीका असा वृत्तांत मी लिहून दिला आणि तो दुसऱ्या दिवशीं सकाळीं 'नवभारत' मध्यें प्रसिद्ध झाला. असें लागोपाठ दोन–तीन दिवस या प्रवचनाचें वृत्त 'नवभारत'मध्यें प्रसिद्ध झाल्यावर ती बातमी कीर्तनसंस्थेच्या चालकांनीं गाडगीळशास्त्रींना सांगितली आणि मग पुढें प्रत्येक दिवशीं प्रवचनाच्या दिवशीं प्रवचनाच्या आरंभीं विषयाचा उपन्यास करतांना आमच्या वृत्तपत्रांतील अहवालाचाहि ते परामर्ष घेऊं लागले. कुठें बसून कोण रिपोर्ट लिहून घेतो हें पाहण्यासाठीं श्रोते लोकहि चहूंबाजूंस नजर टाकून पाहूं लागले. पण त्या ८–९ दिवसांत मी तेथें कोणाशींहि बोललों नाहीं कीं माझ्याजवळ कागद–पेन्सिल कोणाला दिसली नाहीं. शेवटीं प्रवचनमालेच्या समारोपाच्या दिवशीं समारोपाचें भाषण करतांना वे. शा. सं. गाडगीळशास्त्री म्हणाले, 'आज मला आणखी एका व्यक्तीचे आभार मानावयाचे आहेत. ती व्यक्ति म्हणजे रोज इतक्या रात्रीं संपणाऱ्या माझ्या प्रवचनांचा रोच्या रोज 'नवभारत' पत्रांत अहवाल प्रसिद्ध करणारा गुप्त वार्ताहर. हा वार्ताहर येथें कागद–पेन्सिल घेऊन बसलेला कोणालाच दिसला नाहीं. म्हणजे मी मांडलेला सगळा विषय नुसता ऐकून डोक्यांत ठेवण्याइतका तो तल्लख बुद्धीचा आहे. मी उपयोगांत आणलेलीं संस्कृत वचनें जशीच्या तशीं उद्धृत करूं शकण्याइतका आपल्या संस्कृतीचाहि त्याचा अभ्यास दिसतो. माझ्या सनातनी मतांबद्दल त्या अहवालांत टीका असली तरी तींत सहृदयता आहे. आमच्याबद्दल तुच्छताबुद्धि नाहीं. म्हणून त्याचे मला मुद्दाम आभार मानावयाचे आहेत. तेव्हां वार्ताहराचें काम करणारे हे जे कोण गृहस्थ आहेत त्यांनीं आज तरी प्रकट व्हावें अशी माझी

त्यांना विनंति आहे. ' इतकें म्हणून ते थांबल्यावर ' कुठें कोण उभा राहातो' हें पाहाण्यासाठीं सगळ्या श्रोत्यांचे डोळे इकडे तिकडे फिरूं लागले. तेवढ्यांत मी पुढें झाल्याबरोबर कीर्तनसंस्थेचे श्री. न. वि. खांडके यांनीं मला ओळखलें आणि एकदम उद्‌गारले, ' तुम्हींच का ते ? रिपोर्टसाठीं रोज येत होतांत तर आम्हांला सांगायचें. आम्हीं तुमची बसायची व्यवस्था नसती केली ? '

त्यानंतर मग मीहि छोटेंसें भाषण करून, शास्त्रीबुवांच्या प्रवचनांचें रिपोर्टिंग करण्याची ज्यांनीं मला संधी दिली आणि मी लिहीत गेलों तसाच्या तसा अहवाल ' नवभारत 'मध्यें ज्यांनीं प्रसिद्ध होऊं दिला त्या ह. वि. देसाईंचे प्रथम आभार मानले.

त्यानंतर, बेकार असल्या वेळच्या काळांत मी ठाकुरद्वार येथील बहिऱ्या व मुक्या मुलांच्या शाळेचे मालक व चालक असलेले अच्युतराव दाते यांच्या बिऱ्हाडीं राहात असें. आमच्या गांवचेच ते असल्यामुळें व थोडा नातेसंबंध असल्यामुळें त्यांजकडे माझी राहण्याची सोय झाली होती. तेथ असतांनाच माझ्या मुलीचें चि. प्रमिला ऊर्फ बाबी हिचें लग्नहि जमलें आणि बेकार असतांहि माझा पाठचा भाऊ सदाशिव (युनायटेड इंक सप्लाइंग कंपनी, विलेंपार्ले या कारखान्याचे मॅनेजर) याची मदत आणि वृत्तपत्रव्यवसायांतील जुने सहकारी र. ना. लाटे आणि विलेंपार्लें येथील माझे एक प्रभु ज्ञातीच मित्र सदाशिव रंगराव कुलकर्णी यांजकडून उसनवार घेतलेल्या रकमा यांमुळें तें लग्न थाटांत पार पाडलें...

## हाहि मुलाचाच बाप

मामा वरेरकरांच्या ' हाच मुलाचा बाप ' नाटकांत, ' अमूक इतका हुंडा पाहिजेच ' असें म्हणणाऱ्या त्या बापाला त्याच्या मुलानेंच फसविल्याचें दाखविलें आहे. पण माझ्या मुलीच्या लग्नाच्या बाबतींत उलटा प्रकार घडला आहे. लग्नाचा ठावठराव होण्याच्या आधीं आमच्या व्याह्यांच्या घरीं ते स्वतः, त्यांचे वडील चिरंजीव, त्यांच्या मुली आणि जांवई यांची किती हुंडा